
« १३७ कोटींच्या पुलांसाठी निधीचा ठणठणाट « नाशिक आज

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी


« महावितरणची दिरंगाई; इलेक्ट्रिक बसचे स्वप्न भंगले « शेवटचे पान

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : २३८ ■ नाशिक, शुक्रवार, दि. ३० मे २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १२ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा


## संक्षिप्त ▸▸

### देशात कोरोनाचे १२०० रुग्ण

**नवी दिल्ली :** देशात १२०० पेक्षा जास्त कोरोनाचे रुग्ण सापडले आहेत. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालसह इतर राज्यांत कोरोना पसरत आहे. महाराष्ट्रात कोविड-१९ चे ८६ रुग्ण सापडले आहेत. तर पश्चिम बंगाल, दिल्ली, राजस्थान आणि इतर राज्यांतसुद्धा सातत्याने कोरोना व्हायरस पसरत आहे. यामुळे राज्य सरकारकडून रुग्णालयांसाठी मार्गदर्शक तत्त्वे देखील जारी करण्यात आली आहेत. देशात सर्वांत जास्त कोरोनाचे रुग्ण हे केरळ राज्यात आहेत. यानंतर महाराष्ट्र आणि दिल्ली येथे रुग्ण आहेत. पश्चिम बंगालमध्ये नव्याने कोरोनाबाधित ५ रुग्ण झाले आहेत. राजस्थानमध्ये कोरोनाचे ७ नवीन रुग्ण सापडले आहेत. तर, संपूर्ण राज्यात एकूण संख्या ३९ पर्यंत पोहोचली आहे.

### पाक-अफगाण सीमेवर तणाव

**इस्लामाबाद :** अफगाणिस्तान आणि पाकिस्तानी सैन्य यांच्यातील तणाव वाढला असून, बरमाचा सीमेवर दोन्ही सैन्यांमध्ये संघर्ष पेटला आहे. दोन्ही बाजूंनी गोळीबार झाला. हा परिसर पाकिस्तानच्या बलुचिस्तान प्रांताला समांतर आहे. बलुचिस्तान-हेलमंद सीमेवर जवळपास दोन तास गोळीबार सुरू होता. पाकिस्तानी सैन्याने अफगाणी चौक्यांवर बॉम्ब टाकले. गोळीबारानंतर पाकिस्तानी सैन्याने नव्या चौक्यांचे काम थांबवले. डुरंड लाइनवर कोणत्याही परिस्थितीत पाकिस्तानला नव्या चौक्या उभारू देणार नसल्याची स्पष्ट भूमिका अफगाणिस्तानातील तालिबान सरकारने घेतली आहे. सीमेवरील वाढता तणाव पाहता पाकिस्ताननं या भागातील सैनिकांची कुमक वाढवली असून, रणगाडेही तैनात करण्यात आले आहेत. पाकिस्तान डुरंड लाइनला अफगाणिस्तानसोबतची आपली अधिकृत सीमा मानतो. पण यावर अफगाणिस्तानला आक्षेप आहे.

### निधी वळवला नाही : मुख्यमंत्री

**परभणी :** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसाठी शासनाच्या विविध विभागांचा निधी वळवला नाही. ज्यांना अर्थसंकल्प कळत नाही, त्यांनी माझ्याकडे यावे, असे ते म्हणाले. लाडक्या बहीण योजनेसाठी निधी वळल्याचा आरोप अतिशय चुकीचा आणि खोटा आहे. अर्थसंकल्पाची पद्धती ज्यांना कळत नाही, तेच अशाप्रकारे आरोप करतात. कारण, अर्थसंकल्पाच्या नियमानुसार वैयक्तिक लाभासाठी जो निधी दिला जातो, तो आदिवासी विभागातच दाखवावा लागेल, अनुसूचित जाती व सामाजिक न्याय विभागातच तो दाखवावा लागेल. यासंदर्भात अर्थमंत्री अजित पवार यांनीही सभागृहात खुलासा केला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. तसेच, या विभागांचे बजेट पावणे दोन पटींनी वाढले आहे, त्यामुळे ही अकाउंटिंगची पद्धत आहे. कुठलाही पैसा पळवलेला नाही, कुठलाही पैसा वळवलेला नाही, असे म्हणत त्यांनी निधी वळवल्याच्या आरोपावर प्रत्युत्तर व स्पष्टीकरण दिले आहे.

# वारकऱ्यांना टोलमाफी, विम्याचे संरक्षण

## आषाढी वारीसाठी एकनाथ शिंदे यांची घोषणा

**मुंबई :** आषाढी वारीनिमित्त वारीत सहभागी होणाऱ्या वारकऱ्यांना संरक्षण देण्यासाठी त्यांचा समूह विमा काढण्यात येईल, तसेच त्यांना दरवर्षीप्रमाणे यावर्षीही वैद्यकीय सेवा पुरवण्यात येतील, अशी घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.

आषाढी वारीनिमित्त केलेल्या उपाययोजना आणि वारकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांचा आढावा घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि. २९) सह्याद्री अतिथीगृहात विशेष बैठक पार पडली. त्याविषयीची अधिक माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांना दिली. आषाढ महिना जवळ येत असल्याने आता पंढरीच्या वारीचे वेध वारकऱ्यांसह शासन आणि प्रशासनालाही लागले आहेत. त्यादृष्टीने सरकारने वारीच्या तयारीला सुरुवात केली आहे.

नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे वारी मार्ग कुठेही खराब झाला असल्यास मुरूम, खडी आणि डांबरीकरण करून त्याची तातडीने डागडुजी करावी, वारकऱ्यांना मुबलक पाणी, विजेची जोडणी, पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून द्यावे. तसेच वारीसाठी जाणाऱ्या गाड्यांना दरवर्षीप्रमाणे टोलमध्ये सवलत दिली जाईल, असेही उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

गतवर्षीप्रमाणे याही वर्षी आषाढी वारीनिमित्त राज्याच्या आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे आयोजित केली जातील, वारकऱ्यांसाठी कार्डीयाक रुग्णवाहिकेची सोय उपलब्ध करून दिली जाईल, पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा उपलब्ध करून दिली जाईल, या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी स्वतः पंढरपूरला जाऊन आढावा घ्यावा, असे निर्देश शिंदे यांनी यावेळी त्यांना दिले. तसेच प्रत्येक जिल्ह्यातून निघणाऱ्या मोठ्या दिंड्यांना वारीच्या काळात पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून द्यावी, असेही उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. यंदाची वारीही स्वच्छ वारी, निर्मल वारी, हरित वारी म्हणून आपल्याला पार पाडायची असल्याने त्यासाठी लागेल ते सर्व सहकार्य शासनाकडून केले जाईल, असेही उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

दरम्यान, जिल्हाधिकाऱ्यांनी पालखी मार्गासंदर्भात मंगळवारी पाहणी केली. त्यात हडपसर ते दिवे घाट या रस्त्याचे राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून काम सुरू आहे. वारीपूर्वी हे काम संपणार नसल्याने तात्पुरता उपाय म्हणून रस्त्यावरील खड्डे बुजवण्यासाठी हॉट मिक्स डांबराचा वापर करावा, असे निर्देश त्यांनी दिले आहेत. तसेच वारीच्या काळात रस्त्यात असलेली यंत्रे तात्पुरत्या स्वरूपात मागे घेण्याचे संबंधितांना सांगितले आहे. पाऊस उघडल्यानंतर तीन दिवसांत खड्डे बुजवण्याचे काम करावे, अशा सक्त सूचनाही डुडी यांनी दिल्या आहेत.



- वारी मार्गाची तातडीने डागडुजी करावी
- मुबलक पाणी, विजेची जोडणी
- पालखी तळावर वॉटरप्रूफ तंबू उपलब्ध करून द्यावे
- आरोग्य विभागाकडून भव्य आरोग्य शिबिरे
- वारकऱ्यांसाठी कार्डीयाक रुग्णवाहिकेची सोय
- पंढरपुरात तात्पुरती आयसीयू सुविधा
- प्रत्येक दिंडीला पूर्णवेळ सुसज्ज रुग्णवाहिका
- स्वच्छ, निर्मल, हरित वारी उपक्रम राबविणार

### नोडल अधिकारी नेमणार

यासोबतच गतवर्षी वारीदरम्यान झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या वारकऱ्यांना शासनाद्वारे मदत केली जाईल, पोलिसांशी व्यवस्थित समन्वय व्हावा यासाठी नोडल ऑफिसर नेमण्यात येईल. वारकऱ्यांचे भोजन आणि इतर प्रथा-परंपरा वेळच्या वेळी पार पाडाव्यात यासाठी वारी कुठे जास्त वेळ खोळंबणार नाही, यासाठी प्रयत्न केला जाईल.

# राज्यात पुन्हा जुनी पीकविमा योजना

## कृषिमंत्री कोकाटे यांची परभणीत घोषणा

**मुंबई :** यावर्षीपासून राज्यात जुनी पीकविमा योजना लागू होणार असल्याची माहिती राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली. योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांना विमा हप्त्याच्या २ टक्के रक्कम भरावी लागणार आहे. पीकविमा योजनेत कोणत्याही प्रकारे गैरप्रकार होऊ नयेत म्हणून हा बदल केल्याची माहिती कोकाटे यांनी दिली.

परभणीच्या वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात ५३ वी संयुक्त कृषी संशोधन व विकास समितीची बैठक पार पडली. या बैठकीचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना कृषिमंत्र्यांनी याबाबतची घोषणा केली. पीकविम्याबाबत बैठक घेऊन प्रश्न सोडवणार असल्याचेही त्यांनी सांगितले. यावर्षी कधी नव्हे तो मेमध्ये रेकॉर्डब्रेक पाऊस होत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मदतीचा विषय धोरणात्मक आहे. तो ते धोरण ठरवून शेतकऱ्यांना मदत दिली जाईल. शेतकऱ्यांनी पेरणीसाठी घाई न करता आयएमडी आणि कृषी विभागाच्या सल्ल्यांची वाट पाहावी, अशी माहिती कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिली.

### वैष्णवीच्या पती, सासूला न्यायालयीन कोठडी

**पुणे :** वैष्णवी हगवणे प्रकरणी शशांक हगवणे, लता हगवणे आणि करिश्मा हगवणे या तिघांना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी शिवाजीनगर कोर्टाने दिली आहे. या तिघांची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली आहे. वैष्णवीचे वडील अनिल कस्पटे म्हणाले, आरोपीचे वकील बोलले ते चुकीचे बोलले आहेत. माझ्या मुलीचा बळी गेला, त्याला वेगळी कलाटणी दिली जात आहे. आजही मी आरोपीला दिलेल्या मोबाइलचे हप्ते भरत आहे. हुंड्यासाठी छळ केला नाही म्हणता, गाडी नाही मागितली म्हणता, फॉर्च्यूनर देण्याअगोदर मी एमजी हेक्टर ही गाडी बूक केली होती. त्यांनी वादावादी केली, मला फॉर्च्यूनर नाही दिली तर मी यांची हेक्टर पेटवून देईन, असे सांगण्यात आले. आरोपीकडे ५ कोटींच्या गाड्या नाहीत, त्यांना दिलेली एकमेव फॉर्च्यूनर आहे.

# डोनाल्ड ट्रम्प यांचे टॅरिफ वॉर कोर्टाने ठरवले घटनाविरोधी

**नवी दिल्ली :** अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सत्तेवर आल्यानंतर जगभरातील देशांवर विविध दराने आयात शुल्क (टॅरिफ) लादले. या निर्णयामुळे अमेरिका आणि अनेक राष्ट्रांमधील व्यापारसंबंध ताणले गेले होते. मात्र, आता यूएस कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेडने त्यांच्या या निर्णयाला घटनाविरोधी ठरवत त्यावर स्थगिती दिली आहे.

जगभरातील अनेक देशांनी या टॅरिफ धोरणाला विरोध केला होता, मात्र ट्रम्प यांनी आपली भूमिका बदलण्यास नकार दिला होता. अमेरिकेने चीनसारख्या देशावर तब्बल २०० टक्क्यांहून अधिक आयात शुल्क लादले होते. ट्रम्प यांचा दावा होता की, अमेरिकन नागरिकांचं जीवनमान सुधारण्यासाठी हा निर्णय आवश्यक होता. यूएस कोर्ट ऑफ इंटरनॅशनल ट्रेडने आपल्या निर्णयात स्पष्टपणे नमूद केले आहे की, राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी टॅरिफ लादताना घटनात्मक अधिकारांच्या सीमा ओलांडल्या आहेत. राष्ट्राध्यक्षांना आयात नियंत्रित करण्यासाठी जे अधिकार दिले आहेत, त्याचा वापर त्यांनी चुकीच्या पद्धतीने केला आहे. टॅरिफ लादण्याचे निर्णय 'इंटरनॅशनल इमर्जन्सी इकोनॉमिक पॉवर्स ॲक्ट' अंतर्गत घेण्यात आले असून, याचा गैरवापर झालेला आहे. फक्त राजकीय कारणांसाठी राष्ट्राध्यक्षांना अशा अधिकारांचा वापर करू देणे हे न्यायालय स्वीकारू शकत नाही.

ट्रम्प प्रशासनाकडून न्यायालयात असा युक्तिवाद करण्यात आला की, या निर्णयामुळे आंतरराष्ट्रीय तडजोडीच्या वाटाघाटी सुरू झाल्या असून, न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे त्या अडथळ्यात येतील. याचा परिणाम अमेरिकेच्या जागतिक प्रतिमेवर होईल. मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावत राष्ट्राध्यक्षांनी केलेल्या टॅरिफ आदेशावर स्थगिती देण्याचा निर्णय कायम ठेवला आहे.

# गतवर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक

**मुंबई :** महाराष्ट्राने पुन्हा एकदा परकीय गुंतवणुकीत देशपातळीवर आघाडी घेतली आहे. २०२४-२५ या आर्थिक वर्षात एकूण १,६४,८७५ कोटी रुपयांची विक्रमी परकीय गुंतवणूक झाली आहे. ही गुंतवणूक देशात आलेल्या एकूण ४,२१,९२९ कोटी रुपयांपैकी तब्बल ४० टक्के आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा महाराष्ट्रात ३२ टक्क्यांनी अधिक गुंतवणूक झाली आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

गत आर्थिक वर्षात (जानेवारी ते मार्च २०२५) शेवटच्या तिमाहीत २५,४४१ कोटी रुपयांची गुंतवणूक महाराष्ट्रात झाली. हे वर्ष महाराष्ट्रासाठी विक्रमी ठरले असून, मागील १० वर्षांतील सर्वोच्च परकीय गुंतवणुकीचा नवा उच्चांक प्रस्थापित झाला आहे. विशेष म्हणजे, हा उच्चांक आर्थिक वर्षाच्या पहिल्या ९ महिन्यांतच पार झाला असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**मागील दशकातील परकीय गुंतवणूक (कोटींमध्ये)**

| | |
|---|---|
| २०१५-१६ | ६१,४८२ कोटी |
| २०१६-१७ | १,३१,९८० कोटी |
| २०१७-१८ | ८६,२४४ कोटी |
| २०१८-१९ | ५७,१३९ कोटी |
| एप्रिल ते ऑक्टोबर २०१९ : २५,३१६ कोटी | |
| २०२०-२१ | १,१९,७३४ कोटी |
| २०२१-२२ | १,१४,९६४ कोटी |
| २०२२-२३ | १,१८,४२२ कोटी |
| २०२३-२४ | १,२५,१०१ कोटी |
| २०२४-२५ | १,६४,८७५ कोटी |

# ज्यांच्या घरात पावसाचे पाणी शिरले, त्यांना दहा हजारांची मदत

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा

**पुणे :** राज्यात पाच दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून, अनेकांच्या घरांतही पाणी शिरले आहे. काही जिल्ह्यांत नुकसानीच्या पंचनाम्याला सुरुवात करण्यात आली आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पावसामुळे झालेल्या नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली व ज्यांच्या घरात पावसाचे पाणी शिरले, त्यांना १० हजार रुपये देणार असल्याची घोषणा केली आहे.

अजित पवार यांनी गुरुवारी पुन्हा एकदा बारामती मतदारसंघातील नुकसानग्रस्त भागांची पाहणी केली. तालुक्यातील सिद्धेश्वर निंबुडी येथे पावसामुळे नुकसान झालेल्या ठिकाणांच्या पाहणीदरम्यान त्यांनी शेतकरी, गावकऱ्यांशी संवाद साधला. अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत योग्य त्या उपाययोजना केल्या जातील, असे आश्वासन दिले. गावातील नुकसानीचे पंचनामे उरकले की, धान्य द्यायला सुरुवात केली आहे. आता ज्यांच्या ज्यांच्या घरात पावसाचे पाणी शिरले, त्यांना १०-१० हजार रुपये मदत दिली जाईल, असे म्हणत अजित पवारांनी पावसामुळे नुकसान झालेल्या कुटुंबीयांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे.

# निमात टाटा कंपनी स्किल सेंटर सुरू करणार

## सामंजस्य करारावर स्वाक्षरी; नव्या औद्योगिक युगाचा प्रारंभ : नहार

**नाशिक : प्रतिनिधी**

'निमा'मध्ये कौशल्य विकास केंद्र (स्किल सेंटर) उभारून त्याद्वारे प्रगत उत्पादन क्षेत्रात कामगारांना सक्षम बनवण्याचा तसेच कौशल्य विकासात नाशिकला भारतात अग्रस्थानी नेण्याचा मार्ग मोकळा झाला असून, टाटाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स आणि नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) यांच्यात काल निमा सभागृहात याबाबत परस्पर सामंजस्य करार (एमओयू) झाला.

या करारावर निमाचे अध्यक्ष आशिष नहार तर टाटा इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्सचे सीएफओ मयांक पलान यांनी स्वाक्षऱ्या केल्यानंतर उपस्थित सर्वांनी त्याचे जोरदार स्वागत केले. हा करार म्हणजे एका नवीन औद्योगिक पर्वाचा प्रारंभ असून, त्यामुळे नाशिकला औद्योगिक क्षेत्रात वेगळ्या उंचीवर नेण्यास मदत होणार असल्याचे आशिष नहार यांनी या कराराबाबत आनंद व्यक्त करताना सांगितले.

नाशकात कुशल कामगारांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. आता या स्किल सेंटरमुळे आंतरराष्ट्रीय दर्जाचे कुशल मनुष्यबळ उपलब्ध होईल आणि नाशिकच्या औद्योगिक जगताला त्यामुळे एक नवीन दिशा मिळेल, असेही नहार यांनी पुढे नमूद केले.

टाटाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किल्स(आयआयएस)चे सल्लागार श्रीनिवासन यांनी नुकताच नाशिकचा दौरा केला होता. त्यावेळी निमाच्या पदाधिकाऱ्यांनी त्यांची भेट घेऊन टाटाने निमात स्किल सेंटर सुरू करावे, अशी विनंती त्यांना केली असता, त्याबाबत श्रीनिवासन यांनी सकारात्मकता दर्शवून निमाच्या पदाधिकाऱ्यांना मुंबईतील टाटांचे कौशल्य विकास केंद्र पाहण्यासाठी निमंत्रण दिले होते. त्याला प्रतिसाद देत निमाच्या शिष्टमंडळाने मुंबईला जाऊन त्या स्किल सेंटरची पाहणी केली होती आणि आता परस्पर सामंजस्य करारावर सह्या झाल्याने टाटा समूहाशी निमाचे असलेले नाते अधिक दृढ होईल, असे श्रीकांत पाटील यांनी सांगितले.

कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी आयटीआय तसेच विविध शैक्षणिक /-...४


नाशिक महानगरपालिका, नाशिक

५ जून

जागतिक पर्यावरण दिन २०२५ च्या निमित्ताने

जागतिक स्तरावर प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन

(Ending Plastic Pollution Globally)

एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिकचा वापर बंद करणेबाबत

काय वापरू नये?

केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने ऑगस्ट २०२१ मध्ये अधिसूचित केलेल्या सुधारित प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०२१ नुसार खालील एकल वापर (सिंगल युज) प्लास्टिक वस्तू प्रतिबंधित आहेत.

- सजावटीसाठी प्लास्टिक व पॉलिस्टीरिन (थर्माकोल)
- मिठाईचे बॉक्स, आमंत्रण कार्ड व सिगारेटची पाकिटे यांची प्लास्टिक आवरणे
- प्लास्टिकच्या काड्यांसह कानकोरणी, फुग्यांसाठी प्लास्टिकच्या काड्या, प्लास्टिकचे झेंडे, कँडी कांड्या
- आईस्क्रीम कांड्या
- प्लेट्स, कप, ग्लासेस, कटलरी जसे काटे, चमचे, चाकू, पिण्यासाठीचे स्ट्रॉ, ट्रे, ढवळण्या (स्टिरर्स)
- १०० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीचे पीव्हीसी बॅनर्स यावर बंदी आहे

याबरोबरच, महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अधिसूचना २०१८ अंतर्गत खालील गोष्टी प्रतिबंधित आहेत.

- कंपोस्टेबल प्लास्टिक (कचरा व नर्सरीसाठीच्या पिशव्या सोडून)
- सर्व प्रकारच्या प्लास्टिकच्या पिशव्या (कॅरी बॅग्स, नॉन वोवन बॅग्स सह) हॅण्डल असलेल्या व नसलेल्या
- डिश, बाउल, कॅन्टेनर (डबे)

प्लास्टिक मुक्त नाशिक करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे


ग्रीन बिन
ओला कचरा
स्वयंपाक घरातील कचरा, चहाचा गाळ, फळे, नखे, अंड्याचे साल, मासे, हाड

नाशिक परिसरातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की त्यांनी आपल्या घरातील कचऱ्याचे वर्गीकरण करून कचरा घंटगाडीत द्यावा.


ब्लु बिन
सुका कचरा
प्लॅस्टिकच्या पिशव्या व डबे, कागद, धातूचे तुकडे, केस, बाटल्या, काच, कापडाचे तुकडे

जा.क्र.९९/२०२५ दि.२९/०५/२०२५

## महत्त्वाचे

### शेतजमीन विक्रीसाठी इच्छुकांना आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी** कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत शासनास आपली शेतजमीन विक्रीसाठी इच्छुक असलेल्या शेतजमीन मालकांनी विहित नमुन्यात अर्ज सादर करण्याचे समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त देवीदास नांदगावकर यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे. शासनाच्या सामाजिक न्याय विभागाकडून राज्यातील दारिद्र्यरेषेखालील भूमिहीन अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील कुटुंबांसाठी कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजना २००४ पासून राबवण्यात येत आहे. जमिनीच्या दरातील वाढ लक्षात घेता, या योजनेचा लाभ अधिकाधिक लाभार्थ्यांना देण्यासाठी जिरायत जमिनीसाठी प्रति एकर रुपये ५ लाख तर बागायती जमिनीसाठी प्रति एकर रुपये ८ लाख इतक्या कमाल मर्यादेपर्यंत खरेदी करण्याबाबत १४ ऑगस्ट २०१८ च्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन निर्णयानुसार निर्देशित केले आहे. विक्रीसाठी इच्छुक जमीन मालकांनी विहित नमुन्यातील अर्ज सहाय्यक आयुक्त समाजकल्याण, सामाजिक न्याय भवन, बी विंग, २ रा मजला, नासर्डी पूल नाशिक कार्यालयात सुटीचे दिवस वगळून उपलब्ध करून घेता येतील. या अर्जासोबत ७/१२ उतारा, ८ अ उतारा व दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयाकडील मूल्यांकन पत्रक इत्यादी कागदपत्र जोडणे आवश्यक आहे.

### 'परवानाधारक कंपन्यांकडून पेस्ट कंट्रोल सेवा घ्यावी'

**नाशिक : प्रतिनिधी** अलीकडील काळात घरगुती व व्यावसायिक स्तरावर पेस्ट कंट्रोल (कीटक नियंत्रण) सेवांची मागणी वाढली आहे. काही परवानाधारक नसलेल्या कंपन्या अप्रभावी किंवा अनधिकृत रासायनिक उपाय वापरून पर्यावरणीय धोका निर्माण करीत आहेत. त्यामुळे नागरिकांनी केवळ जिल्हा कृषी अधिकारी तथा परवाना अधिकारी नाशिक यांच्याकडून देण्यात आलेल्या मान्यताप्राप्त आणि परवानाधारक पेस्ट कंट्रोल प्रदात्यांकडूनच किटक नियंत्रण सेवा घ्यावी, असे आवाहन नाशिकचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अभिमन्यू काशिद यांनी केले आहे. अनधिकृत सेवा वापरल्यामुळे अपुरे नियंत्रण, रासायनिक प्रदूषण किंवा आरोग्यास धोका यासारख्या गंभीर समस्या निर्माण होऊ शकतात. नागरिकांनी पेस्ट कंट्रोल सेवा बुक करतांना प्रदात्याचा परवाना आणि मान्यतापत्र मागवून पहावे. अनधिकृत कंपन्यांबाबत तक्रार असल्यास, नागरिकांनी कृषी विभागाच्या तक्रार केंद्राच्या दूरध्वनी क्रमांक ०२५३-२५०४०४२ वर तक्रार नोंदवावी, असेही आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी काशिद यांनी केले आहे.



### सुयोजित ट्रेड सेंटरतर्फे मनपा आयुक्तांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी** शरणपूररोड येथील बाफणा ज्वेलर्स ते तनिष्क-राका सर्कलदरम्यान रस्ता संपूर्ण मोकळा ठेवावा, वाहतुकीची होणारी कोंडी टाळण्यासाठी डिव्हायडर टाकू नये, अशा आशयाचे निवेदन सुयोजित ट्रेड सेंटरच्या वतीने मनपा प्रभारी आयुक्त करिश्मा नायर यांना देण्यात आले. सुयोजित ट्रेड सेंटर, युटिलिटी सेंटर, क्राऊन कॉम्प्लेक्स, सुयोजित संकुल आदी या ४/५ बिल्डिंगमध्ये शासकीय, खासगी बँका, हॉस्पिटल्स, तसेच खासगी कार्यालये अशी ४०० / ५०० कार्यालये आहेत. त्यामुळे कॅशव्हॅन, रुग्ण, रुग्णवाहिका, बँकेचे ग्राहक यांची ये-जा असते. दुभाजक (डिव्हायडर) टाकल्याने रस्ता छोटा होईल. त्यामुळे महापालिकेसमोरील रस्त्यावर दुभाजक टाकू नये, असे निवेदन सुयोजित ट्रेड सेंटर अपार्टमेंटच्या वतीने अनिल बाफणा, स्वप्निल अमृतकर, अजित बोथरा, नितिन राका, राजेंद्र महाले, मधुकर भंडारे, निरंजन बटाविया, कमलेश कोठारी, माधुरी भंडारे यांनी दिले.



### मोहगाव-बाभळेश्वर ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंचपदी मोहन टिळे बिनविरोध

**नाशिकरोड : प्रतिनिधी** मोहगाव-बाभळेश्वर या ग्रुप ग्रामपंचायत उपसरपंचपदी मोहन लक्ष्मण टिळे यांची बिनविरोध निवड झाली. सरपंच सुरेखा योगेश टिळे याच्या अध्यक्षतेखाली निवडप्रक्रिया पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी ग्रामसेवक ज्ञानेश्वर भोर यांनी काम पाहिले. निवड होताच फटाक्यांची आतषबाजी व गुलालाची उधळण करत निवडीचे नागरिकांनी स्वागत केले. तत्कालीन उपसरपंच आकाश लगड यांनी राजीनामा दिला होता. रिक्त जागेवर ही निवड करण्यात आली.निवडीप्रसंगी बोलताना नवनिर्वाचित उपसरपंच मोहन टिळे म्हणाले की, माझ्यावर जो विश्वास माझ्या सर्व सहकाऱ्यांनी टाकला आणि गावाची सेवा करण्याची संधी मला दिली. त्यांच्या या विश्वासाला कदापि तडा जाऊ न देता सर्वांना सोबत घेऊन विकासात्मक काम करेल, असा विश्वास व्यक्त केला. निवडीसाठी ग्रामपंचायत सदस्य संजय साळवे, योगेश टिळे, ललिता टिळे, निर्मला गांगुर्डे आदींसह संजय तुंगार, मोहन टिळे, बहिरू टिळे, पंडित टिळे, धनंजय टिळे, कैलास टिळे, भास्कर टिळे, संजय टिळे, भाऊसाहेब टिळे, मुकुंद टिळे, लखन टिळे, योगेश टिळे, अंकुश टिळे, गोरख टिळे, सुदर्शन टिळे, मयूर टिळे, संदीप टिळे, ज्ञानेश्वर टिळे, अशोक टिळे, विश्वास टिळे, सागर टिळे, गणेश टिळे, हिरामण टिळे, मधुकर टिळे, गोकुळ टिळे आदी उपस्थित होते.

### महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्त विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन

**नाशिक : प्रतिनिधी** महावितरणच्या वर्धापन दिनानिमित्ताने 'शून्य अपघात महावितरण, शून्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन दि. १ ते ६ जून २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दि. ६ जून रोजी महावितरण कंपनीचा २० वा वर्धापन दिन साजरा होत आहे. यानिमित्ताने आयोजित विद्युत सुरक्षा सप्ताहादरम्यान मॅरेथॉन, रॅली, निबंध व चित्रकला स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. तसेच ग्राहकांना सुरक्षाविषयक ई-मेल व एसएमएस पाठविण्यासोबतच भित्तिपत्रके, चित्रफिती अशा विविध माध्यमांव्दारे विद्युत सुरक्षेविषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. मागील काही वर्षांमध्ये वीज अपघाताचे प्रमाण कमी करण्यात महावितरणला यश आले आहे. मात्र, तरीही विविध कारणास्तव अपघात होतात. विद्युत अपघाताचे प्रमाण अजून कमी करण्यासाठी महावितरणने विद्युत सुरक्षा सप्ताह आयोजित करून व्यापक जनजागृती कार्यक्रम हाती घेतला आहे. रविवार दि. १ जून रोजी सर्व परिमंडळ कार्यालयाच्या मुख्यालयाच्या शहरात मॅरेथॉन 'रन फॉर सेफ्टी' आयोजित करण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थी, ग्राहक व जनमित्र यांच्यासाठी विद्युत सुरक्षा प्रश्नमंजुषा जाहीर करण्यात आली आहे. या प्रश्नमंजुषेत सहभागी होणाऱ्यांना ऑनलाईन प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. सोमवार, दि. २ जून रोजी राज्यातील ६५० उपविभाग अंतर्गत शहर व ग्रामीण भागातील रहिवासी परिसरात विद्युत सुरक्षाविषयी जनजागृती करण्यात येईल. मंगळवार, दि. ३ व ४ जून रोजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांसाठी आणि कुटुंबीयांसाठी तसेच शालेय विद्यार्थ्यांसाठी विद्युत सुरक्षा विषयी निबंध / चित्रकला स्पर्धा, महावितरण कर्मचारी / अधिकारी यांच्यासाठी विद्युत सुरक्षाविषयी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. दि.५ जून वसुंधरा दिनी १५० विभागीय स्तरावर विद्युत सुरक्षा व वीज बचतविषयी रॅली काढण्यात येणार आहे. दि.६ जून रोजी सकाळी १० ते १०.१५ या वेळेत राज्यातील सर्व शाखा कार्यालयातील जनमित्र यांच्यासाठी विद्युत सुरक्षा प्रतिज्ञा कार्यक्रम घेण्यात येणार आहे.

# अतिक्रमणमधील आउटसोर्सिंग कर्मचाऱ्यांसाठी चार कोटींचा खर्च

## नोकरभरतीअभावी मनुष्यबळाची वानवा

**नाशिक : प्रतिनिधी**

अपुरे मनुष्यबळ असल्याने महापालिकेच्या अतिक्रमण विभागाकडून आउटसोर्सिंग पद्धतीने कर्मचारी घेण्यासाठी निविदा काढण्यात आली आहे. या ठेक्यासाठी ३ कोटी ८७ लाखांचा खर्च महापालिका प्रशासन करणार आहेत. अतिक्रमणमधील कर्मचाऱ्यांची संख्या रोडावल्याने मोहिमा राबवण्यापासून ते इतर कामांवर परिणाम होतो आहे. नोकरभरती होत नाही तोपर्यंत खासगी संस्थेच्या माध्यमातून अतिक्रमण विभागात कर्मचारी घेतले जाणार आहेत.

सिंहस्थ काळात अतिक्रमण विभागाची मोलाची भूमिका असणार आहे. शहर व विशेषत: पंचवटी, नाशिकरोड रेल्वेस्थानक परिसर, तपोवन येथे कोणीही अतिक्रमण करणार नाही. ही जबाबदारी पालिकेला घ्यावी लागणार आहे. शहरात २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा होतो आहे. त्यादृष्टीने महापालिका कामाला लागली आहे. इतर विभागांप्रमाणेच अतिक्रमणला नोकरभरती न झाल्याचा मोठा फटका बसतो आहे. दैनंदिन कर्तव्यासह अतिक्रमणविरोधी मोहिमेलाही फटका बसतो आहे. हे लक्षात घेऊन तत्कालीन उपायुक्त मयूर पाटील यांनी गेल्या वर्षी आउटसोर्सिंगद्वारे कर्मचारी घेण्याचा प्रस्ताव शासनाला सादर केला होता. काही दिवसांपूर्वी महापालिकेने वादग्रस्त सातपीर दर्गा हटविली. यावेळी सहाही विभागांतील अतिक्रमण विभागातील कर्मचाऱ्यांना बोलावूनही मनुष्यबळ तोकडे पडले होते. शहरात तब्बल दीडशे अनधिकृत धार्मिक स्थळे आहेत. त्यामुळे एखादी कारवाई करण्यासाठी मनुष्यबळाची आवश्यकता भासणार आहे. पुन्हा फेरनिविदा काढली जाणार आहे. बाजारपेठांतील रस्त्यांवर ठाण मांडणाऱ्या व्यावसायिकांवर कारवाई करण्याबरोबरच अनधिकृत बांधकामे हटवण्यासाठी अतिक्रमणात मनुष्यबळाची नितांत आवश्यकता आहे. पालिकेने तांत्रिक आणि अतांत्रिक मनुष्यबळ व यंत्रसामग्री पुरविण्यासाठी निविदा मागविल्या असता पालिकेने निविदा प्रसिद्ध केली असता ठेकेदाराने याकडे पाठ फिरवल्याचे चित्र आहे.

> **इतर विभागांतही लवकरच आउटसोर्सिंग**
>
> अतिक्रमण विभागाप्रमाणेच महापालिकेतील इतर विभागातही आउटसोर्सिंगद्वारे कामे करून घेतली जाणार आहे. आरोग्य विभागात मानधनावरील डॉक्टरांकडून काम सुरू आहे. अग्निशमनमध्ये कर्मचाऱ्यांची वानवा असल्याने तेथेही आउटसोर्सिंगद्वारे प्रशिक्षित मनुष्यबळ भरले जाणार आहेत.

## बाळा दराडेंच्या टीकेला प्रत्युत्तरसाठी काँग्रेसची बॅनरबाजी करून गांधीगिरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्यावर बाळा दराडे यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर म्हणून काँग्रेसने सिडको भागात बॅनर लावून गांधीगिरी केली.




राहुल गांधींनी मांडलेले विचार इतिहासातील काही संदर्भांवर आधारित असून, त्यावरून त्यांच्यावर होत असलेली टीका ही अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या विरोधात असल्याचा आरोप काँग्रेस पक्षाच्या वतीने करण्यात आला.

या निषेधामध्ये कार्यकर्त्यांनी शहरात ठिकठिकाणी बॅनर लावून बाळा दराडे यांना प्रत्युत्तर दिले. राहुल गांधी न्यायप्रविष्ट विषयावर बोलत होते. त्यांनी सावरकरांच्या माफीनामा व ब्रिटिश सरकारकडून घेतलेल्या पेन्शनचा उल्लेख ऐतिहासिक पुराव्यांच्या आधारे केला आहे.

त्यामुळे त्यांच्या वक्तव्यावर आरोप करणे चुकीचे आहे, असे सिडको ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष विजय भैया पाटील यांनी केले आहेत.

कार्यकर्त्यांनी संविधानातील कलम १९(१)(अ) अर्थात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे स्मरण करून देत दराडेंना उद्देशून लिहिले की, मतभिन्नता म्हणजे राष्ट्रद्रोह नव्हे. सावरकर हे निश्चितच स्वतंत्र भारताच्या इतिहासातील प्रभावशाली व्यक्तिमत्त्व आहेत.

मात्र, त्यांचे संपूर्ण जीवन व विचार सर्वार्थाने आदर्श होतेच, असे म्हणणे ऐतिहासिकदृष्ट्या अचूक नाही. इतिहासात नोंदलेले माफीनामे, कारागृहातील पत्रव्यवहार आणि त्यानंतरचा राजकीय प्रवास हे सर्व तपशील सत्याच्या चौकटीतूनच पाहावे लागतात, असेही विजय पाटील यांनी यावेळी सांगितले.

## ऑलिंपियाडमध्ये नाशिकच्या विद्यार्थ्यांची उत्कृष्ट कामगिरी




**नाशिक : प्रतिनिधी**

जगातील सर्वांत मोठे ऑलिंपियाड असलेल्या सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय ऑलिंपियाड परीक्षेत नाशिकमधील तीन विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर यश संपादन केले. पोद्दार इंटरनॅशनल स्कूलच्या आरव अनिरुद्ध नेवस्करने पहिला क्रमांक पटकावला. फ्रावशी अकादमीच्या अरातिका सिकंदरनेही आंतरराष्ट्रीय गणित ऑलिंपियाडमध्ये दुसरा क्रमांक मिळवला. पोदार इंटरनॅशनल स्कूल ज्युनिअर विंगच्या अनिरुद्ध अमोल बुधवंतने आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिंपियाडमध्ये तिसरा क्रमांक मिळवून आंतरराष्ट्रीय कांस्यपदक जिंकले.

या वर्षीच्या एसओएफ ऑलिंपियाडमध्ये ७२ देशांतील लाखो विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. नाशिकमधील ३९,१०० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता. सहभागींमध्ये पोदार इंटरनॅशनल स्कूल, क्वालिटी इंटरनॅशनल अकादमीसह नाशिकमधील नामांकित शाळांचा समावेश होता.

सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशन (एसओएफ)ने दिल्लीतील डॉ. आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर येथे २०२४-२५ च्या ऑलिंपियाड परीक्षेतील टॉपर विद्यार्थ्यांचा सत्कार केला. या कार्यक्रमात विविध शाळांमधील ७५० हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती जे. के. माहेश्वरी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावर्षी आंतरराष्ट्रीय स्तरावर २२२ विद्यार्थ्यांना सन्मानित करण्यात आले. आंतरराष्ट्रीय रँक-१ मिळवणाऱ्या ७४ विद्यार्थ्यांना ५०,००० रुपये आणि सुवर्णपदके, आंतरराष्ट्रीय रँक-२ मिळवणाऱ्यांना २५ हजार रुपये आणि रौप्यपदके, तर आंतरराष्ट्रीय रँक-३ मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना १० हजार रुपये आणि कांस्यपदके देण्यात आली. यासोबतच सायन्स ऑलिंपियाड फाउंडेशनने शिक्षकांचा सन्मानही केला. यावेळी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश जे. के. माहेश्वरी, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विजय कुमार शुक्ला आणि भिवानी हरियाणा येथील सीबीएलयूचे डीन डॉ. सतीश आर्य उपस्थित होते.

## रूपाली चाकणकर यांच्या उपस्थितीत आज जनसुनावणी

**नाशिक : प्रतिनिधी**



जिल्ह्यातील समस्याग्रस्त, पीडित महिलांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी 'महिला आयोग आपल्या दारी' या उपक्रमांतर्गत आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्या उपस्थितीत ३० मे रोजी सकाळी ११ ते दुपारी २ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन सभागृहात जनसुनावणी होणार आहे. जिल्हा महिला व बालविकास अधिकारी सुनील दुसाने यांनी ही माहिती दिली. या सुनावणीत तक्रारदार, पीडित महिलेला स्थानिक पातळीवर तत्काळ मदत व्हावी, कोणतीही पीडित महिला कोणतीही पूर्वसूचना न देता थेट जनसुनावणीस उपस्थित राहून आपली समस्या लेखी स्वरूपात आयोगापुढे मांडू शकेल. यावेळी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, पोलीस विभाग, समुपदेशन केंद्राच्या सुविधा उपलब्ध असतील. पोलीस विभागाकडील महिला व मुलांकरिता असलेल्या सहाय्य कक्षाकडे प्राप्त असलेली प्रकरणे, महापालिका व नगरपरिषद येथील समुपदेशन केंद्रांकडील प्राप्त प्रकरणे या जनसुनावणीत ठेवण्यात येणार आहेत.

जिल्ह्यातील महिलांनी आपल्या समस्या लेखी स्वरूपात घेऊन उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालय, नासर्डी पुलाजवळ, नाशिक्लबसमोर, नाशिक येथे संपर्क साधावा.

## निमाणी परिसरात अवैध वृक्षतोड

**पंचवटी : वार्ताहर**



पंचवटी परिसरातील निमाणी भागातील गुलमोहर, उंबर तसेच इतर झाडे अनधिकृतपणे तोडण्यात आली असून, अनधिकृतपणे झाडे तोडणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्याची मागणी मनपा आयुक्तांना अनिकेत निकाळे यांनी दिलेल्या निवेदनात केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, नाशिक महानगरपालिका हद्दीतील निमाणी पंचवटी येथील गुलमोहोर, उंबर, पिंपळ व इतर झाडे हे अनधिकृतपणे तोडण्यात आली आहे. झाडे तोडणाऱ्या व्यक्तींना झाडे का तोडली विचारले असता, त्यांनी महानगरपालिका पंचवटी विभागातील वृक्ष प्राधिकरण विभागातील वैभव वेताळ यांनी आम्हाला झाडे तोडण्याची परवानगी दिलेली आहे. तुम्ही त्याना भेटून त्यांच्याशी बोला. त्यामुळे पंचवटी विभागातील नगरपालिकेत जाऊन वेताळ यांना भेटण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी वेताळ भेटले नाही व त्यांचा फोन नंबर मिळाला असून, त्यांना फोन केल्यानंतर त्यांना झाडे का तोडली याची विचारणा केली असता, ते उडवाउडवीची उत्तरे देत होते व सदर झाडे तोडण्याची परवानगी ऑनलाइन मिळालेली आहे, असे सांगितले.

दरम्यान, या ठिकाणीची तोडलेली झाडे ही कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण करत नाही व त्यांना या अगोदरही त्यांचा कोणाला काही त्रास अथवा अडचण निर्माण होत नव्हती. पण वेताळ यांच्या ओळखीतील काही लोकांना तेथे काही खासगी कामानिमित्त झाडांची अडचण निर्माण होत होती. म्हणून ती झाडे तोडून टाकण्यात आली. या सर्व प्रकरणात वेताळ यांचा पूर्णपणे समावेश दिसत असल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे झाडे तोडणाऱ्या व्यक्तीवर व वेताळ साहेबांवर योग्य त्या ती कारवाई करण्यात यावी, अशी मागणी अनिकेत प्रवीण निकाळे यांनी मनपा आयुक्तांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

## मुक्त विद्यापीठात महाराणा प्रतापसिंह जयंती साजरी

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत झालेल्या कार्यक्रमात मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी महेंद्र बनसोडे यांनी केले. यावेळी वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे, प्रा. दत्ता पाटील, सुनील निकम, सचिन शिंदे यांच्यासह विद्याशाखा संचालक, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी कर्मचारी, विद्यार्थी आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## महाराणा प्रतापसिंह यांचे शौर्य मोठे : आ. हिरे

**नाशिक :** वीरशिरोमणी, हिंदू कुलसूर्य, महापराक्रमी राजे महाराणा प्रतापसिंह यांच्या ४८५व्या जयंतीनिमित्त महाराणा प्रतापसिंह जयंती उत्सव समिती नवीन नाशिक यांच्या वतीने प्रतिमापूजन सोहळा नाशिक पश्चिम विधान मतदारसंघाच्या आमदार सीमा महेश हिरे यांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात पार पडला. आमदार सीमा हिरे या सोहळ्यात सहभागी होत्या. महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांच्या विचारांना वंदन केले. महाराणा प्रतापसिंह यांच्या शौर्यपूर्ण आणि त्यागमयी जीवनकार्याची आठवण करून देत उपस्थित समाजबांधवांना प्रेरणादायी विचारांनी संबोधित केले. यावेळी प्रमुख उपस्थित आ.सीमाताई महेश हिरे,पोलिस आयुक्त संदीप कर्णिक,अंबड पोलीस निरीक्षक हांडे साहेब,नाना महाले,शिवाजी चुंभळे,डी.जी. सूर्यवंशी,सुवर्णा मटाले,साहेबराव आव्हाड,गणेश बोलकर महाराणा प्रतापसिंह जयंती समिती अध्यक्ष मनीष अजबसिंह गिरासे,राजेंद्रभाऊ महाले, समाजबांधव, स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## महाराणा प्रतापसिंह जयंती प्रभाग ९ मध्ये साजरी

**नाशिक : प्रतिनिधी**

सातपूर येथील प्रभाग क्रमांक ९ मध्ये भारतीय जनता पार्टी आणि छावा क्रांतिवीर सेना महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमानाने संत शिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन भाजपाच्या सामाजिक कार्यकर्त्या सविता करण गायकर यांच्या धर्माजी कॉलनीतील जनसंपर्क कार्यालयात करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून नाशिक पश्चिमच्या आमदार सीमाताई हिरे, माजी महापौर दशरथ पाटील, छावा क्रांतिवीर सेनेचे संस्थापक अध्यक्ष करण गायकर, सातपूर मंडल अध्यक्ष नारायण जाधव, राणा की सेना संस्थापक अध्यक्ष वाल्मीक राजपूत यांच्या प्रमुख उपस्थितीत जयंती महोत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून दिनकर कांडेकर, भगवान काकड, रवींद्र जोशी, प्रमोद जाधव, विजय वाहुळे, नवनाथ शिंदे, विलास गायकवाड, शिवाजी सहाणे, वैभव दळवी, मंगलताई खोटरे, गुलाब माळी, बजरंग शिंदे, बाळासाहेब जाधव, बाळा जारे, महेश तुपलोंढे, सुजित पवार, ड.महेंद्र शिंदे, सागर वैष्णव, प्रितेश पाटील, अमोल देवरे, दत्ताजी पवार,कणसे महाराज,शरद शिंदे,दादा आरोटे,गौरव घोलप,रोहित पाटील, युवराज धात्रक, हेमंत नागरे, गणेश मौले, निखिल राजपूत, तुषार पवार, शरद काळे,राजू जाधव,प्रकाश साळवे, संजय पवार, दिलीप पवार, अंबादास अहिरे, सुनील पवार, राकेश पाटील, मानसिंग जाधव,दत्ता पवार,संजय पवार, गौरव बोधले उपस्थित होते. आमदार सीमाताई हिरे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, महाराणा प्रताप हे केवळ मेवाडचे राजा नव्हते, तर ते स्वराज्य आणि स्वाभिमानाचे मूर्तिमंत प्रतीक होते. माजी महापौर दशरथ आप्पा पाटील यांनी सांगितले की, थोर महापुरुषांचे विचार आत्मसात करून तरुण पिढीला योग्य दिशा देणे हीच खरी अभिव्यक्ती आहे. या जयंती महोत्सवाचे आयोजन भारतीय जनता पार्टीचे सामाजिक कार्यकर्ते प्रेम दशरथ पाटील, सविता करण गायकर,माजी नगरसेविका हेमलता कांडेकर,अर्चना तुपलोंढे यांच्या वतीने करण्यात आले होते. प्रास्ताविक अविनाश गायकर यांनी केले तर आभार भगवान काकड यांनी मानले.

## महाराणा प्रतापसिंह यांची जयंती भाजपा कार्यालयात साजरी

**नाशिक :** महाराणा प्रतापसिंह यांची जयंती भारतीय जनता पार्टी वसंतस्मृती कार्यालय येथे साजरी करण्यात आली.



यावेळी महानगर सरचिटणीस ॲड. शाम बडोदे, मध्य मंडल अध्यक्ष वसंत उशीर, बबलूसिंह परदेशी यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी भास्कर घोडेकर, राहुल कुलकर्णी, सुजाता करजगीकर, अभय छल्लानी, अनिता भामरे, ललित नहार, सचिन मोरे, आकाश बागूल, रवींद्र गांगुर्डे, सुधीर नाईक, नवाब जहागीरदार, आजिनाथ नागरगोजे, प्राध्यापक चव्हाण, गजरात देवतवाल, हर्षल पवार, दीपाली भूमकर, ईशा भूमकर, अक्षय गांगुर्डे, आरिफ काजी, दयाराम पाटील, महेश भामरे, धीरेंद्र नेवारे, संग्राम राठोड, नीलेश तुरे, लक्ष्मणसिंह परदेशी, पवन खंडारे, सुनील गोरे, प्रल्हादसिंह रघुवंशी, मिथिल परदेशी, कल्याणसिंह परदेशी, हर्षल पवार, सुधीर नाईक, भूकु परदेशी, अनिल राठोड, विठ्ठल परदेशी, गौरव राजपूत, सुनील राठोड, सूरजसिह तुरे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराणा प्रतापसिंह जयंती हिंदू एकतातर्फे साजरी

**सिडको : विशेष प्रतिनिधी**




मेवाड रत्न, हिंदूसूर्य महाराणा प्रतापसिंह यांची ४८५ वी जयंती हिंदू एकता आंदोलन पक्ष व अखिल महाराष्ट्र कातारी शिकलकर समाज संघाच्या वतीने शहीद भगतसिंह चौक, द्वारका सर्कल येथे साजरी करण्यात आली.

याप्रसंगी प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. अनिरुद्ध धर्माधिकारी, जयंती उत्सव समिती अध्यक्ष मनीष गिरासे व हिंदू एकता आंदोलन पक्ष तथा अखिल महाराष्ट्र कातारी शिकलकर समाज संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामसिंग बावरी यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संपूर्ण द्वारका परिसर महाराणांच्या आरतीने व जयघोषाने दुमदुमून गेला होता. याप्रसंगी हिंदू एकता व कातारी शिकलकर समाजाचे सुरेश पवार, प्रसाद बावरी, किरणसिंग पवार, प्रकाश खिची, मंगला पवार, विजय पवार, भारत सदभैया, विकी राठोड, करणसिंग बावरी, अनिल जाधव, कृष्णा औटी, राजेंद्र समशेर आदी उपस्थित होते.

# अकरावीसाठी राज्यात आतापर्यंत ७.६२ लाख नोंदणी

**नाशिक : प्रतिनिधी**

अकरावी प्रवेशाच्या चौथ्या दिवशी राज्यभरातून तब्बल ७ लाख ६२हजार २८९ विद्यार्थी नोंदणीकृत झाले आहेत. या प्रक्रियेला २६ मेपासून सुरुवात झाली असून, पहिल्या दिवशी दोन लाख ५८ हजार ८८७ विद्यार्थी, दुसऱ्या दिवशी २लाख ०७ हजार ६१२, तिसऱ्या दिवशी १ लाख ४४ हजार ०५७ आणि चौथ्या दिवशी १लाख ५१ हजार ७३३ इतक्या विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

शासनाने यावर्षीपासून संपूर्ण राज्यात एकच केंद्रीय ऑनलाईन प्रणाली https://mahafyjcadmissions.in या संकेतस्थळावरून सुरू केली आहे. राज्यभरातील ९,३४२ कनिष्ठ महाविद्यालये आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये एकूण २० लाख ८८हजार ४७० जागा उपलब्ध आहेत, त्यातील कॅप फेरीसाठी १८लाख ०७ हजार ५९७ जागा आणि कोटा प्रवेशासाठी २ लाख १३ हजार ३७३ जागा आहेत.

आतापर्यंत ५ लाख ८१ हजार ७७६ विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क भरले आहे. ५ लाख ३५हजार ९०७ विद्यार्थ्यांनी अर्ज अंतिम करून लॉक केले आहेत. ४ लाख २८हजार ८४२ अर्ज कॅप राउंडसाठी. १५ हजार८१५ अर्ज इनहाऊस कोटासाठी. ७ हजार ६७२ अर्ज व्यवस्थापन कोटासाठी, १२ हजार ४१६ अर्ज अल्पसंख्याक कोटासाठी करण्यात आले आहेत. विद्यार्थी व पालकांनी ११ वी प्रवेशासाठी नोंदणी करण्याची अंतिम मुदत ३ जून २०२५ सायंकाळी ६ वाजेपर्यंत असल्याची महत्त्वाची सूचना शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे. अधिक माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळ https://mahafyjcadmissions.in किंवा हेल्पलाईन क्रमांक ८५३०९५५५६४ वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### नाशिक विभागात उत्स्फूर्त प्रतिसाद

**नाशिक विभागातील अकरावीच्या प्रवेशप्रक्रियेसाठी जिल्हानिहाय नोंदणीची आकडेवारी जाहीर करण्यात आली आहे. जिल्ह्यानुसार नोंदणी आणि अर्जाची संख्या अशी आहे:**

**जळगाव जिल्हा (२८५)- नोंदणी : १८,२०० अर्ज भाग १ : १५,३५२ अर्ज भाग २ : १३,४८०, नंदुरबार जिल्हा (२८६) नोंदणी: ७,२४९ अर्ज भाग १ : ६,३९३ अर्ज भाग २ : ५,६०९, धुळे जिल्हा (२८७) नोंदणी : १०,७५१ अर्ज भाग १ : ८,९३५ अर्ज भाग २ : ७,९११, नाशिक जिल्हा (२८८) नोंदणी : ३१,४१३ अर्ज भाग १ : २५,९६५ अर्ज भाग २ : २१,४३२**

# जि.प. पशुसंवर्धन विभागामार्फत दुधाळ गायी-म्हशींचे वाटप

## २ जूनपर्यंत अर्ज करण्याची संधी

**नाशिक : प्रतिनिधी**

राज्यातील शेतकरी आणि दुग्धव्यवसाय करणाऱ्यांसाठी पशुसंवर्धन विभागामार्फत दुधाळ गायी-म्हशींचे अनुदानावर वाटप करण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. ३ मेपासून सुरू झालेली ही अर्ज प्रक्रिया २ जून २०२५ पर्यंत चालणार आहे.

दुग्धव्यवसायाला चालना देण्यासाठी आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी शासनाने ही योजना राबवली आहे. या योजनेंतर्गत ८ ते १० लिटर दूध देणाऱ्या गायी किंवा म्हशींच्या खरेदीवर ५० टक्क्यांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. खरेदी केलेले जनावर किमान ३ वर्षे विकता येणार नाही. राज्यातील शेतकरी आणि दुग्ध व्यवसायात रुची असणारे व्यक्ती या योजनेसाठी अर्ज करू शकतात. जि.प. पशुसंवर्धन विभाग नवीन नावीन्यपूर्ण योजनेतून दोन गायी किंवा दोन म्हशी खरेदीसाठी अनुदान देतो. ऑनलाइन अर्ज प्राप्त झाल्यावर कृषी विभागाकडून नियुक्त समिती त्याची छाननी करेल. पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी २ जून रोजी कृषी कार्यालयाद्वारे जाहीर केली जाईल. त्यानंतर अनुदानाची रक्कम थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यावर जमा केली जाईल. शेतकरी आणि दुग्ध व्यवसायिकांनी या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी आपल्या तालुक्यातील कृषी कार्यालय किंवा पशुसंवर्धन विभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन जि.प. पशुसंवर्धन विभागाकडून करण्यात आले आहे.

**आवश्यक कागदपत्रे**

आधारकार्ड, बँकपासबुक, जमीन मालकीचा पुरावा, जातीचा दाखला, पशुपालनाचा अनुभव दर्शवणारे प्रमाणपत्र, पशुधन अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, ग्रामपंचायतीचे शिफारसपत्र पासपोर्ट आकाराचा फोटो.

## संक्षिप्त



### महावितरणमध्ये महाराणा प्रतापसिंह यांची जयंती उत्साहात साजरी

**नाशिक:** महावितरणच्या नाशिक परिमंडल कार्यालयात विद्युत भवन येथे आज गुरुवारी (२९ मे) रोजी महाराणा प्रतापसिंह यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्य अभियंता सुंदर लटपटे यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेचे पूजन व माल्यार्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी सहाय्यक महाव्यवस्थापक महेश बुरंगे, कार्यकारी अभियंता योगेश निकम, उपमुख्य औदयोगिक संबंध अधिकारी प्रमोद राजेभोसले, अतिरिक्त कार्यकारी अभियंता हर्षवर्धन जगताप, व्यवस्थापक हेमंत भामरे, जनसंपर्क अधिकारी विकास आढे, उपकार्यकारी अभियंता सुरेंद्र उन्हाळे, सहाय्यक अभियंता भूषण पाटील, उपव्यवस्थापक सदू जाधव व प्रवीण गटकळ यांचेसह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

### कविता हे आनंदी जगण्याचे उत्तम माध्यम : बकुळगंधकार

**पुणे : प्रतिनिधी** कविता हा साहित्याचा आत्मा आहे.साहित्य वाचनाने विचार प्रगल्भता वाढते. जगण्याचा दृष्टिकोन बदलतो आणि हा बदल स्वागतार्ह असतो कारण जगण्यात वेगळेपण येतं.आनंद येतो आणि या आनंदाच्या वाटेवर कविता असतील तर आनंद द्विगुणित होतो म्हणून कविता हे आनंदी जगण्याचे उत्तम माध्यम होय, असे महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवडचे अध्यक्ष बकुळगंधकार राजन लाखे यांनी सांगितले. निमित्त होते महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड आणि आनंद ज्येष्ठ नागरिक संघ आयोजित कविसंमेलन जे साहित्यिकांच्या तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडले.व्यासपीठावर,आनंद ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष ज्ञानेश्वर खेडकर,उपाध्यक्ष,ए.जी.नागणे,पाहुणे डॉ. दिगंबर इंगोले तसेच राजाभाऊ गोलांडे उपस्थित होते.देशभक्ती, आयुष्य, झाडे, शब्द, पाऊस, पर्यावरण, निसर्ग, वेळ आदी विविध विषयांवर कविता सादर होताना रसिकांकडून मिळालेली उत्स्फूर्त दाद यामुळे कविसंमेलनाला अधिक रंगत आली. कविसंमेलनात जयश्री श्रीखंडे योगिता कोठेकर,रजनी दुवेदी,अशोक होनराव, अस्मिता कुलकर्णी,प्रा.शांताराम सोनार, नागेश गव्हाड, सीमा गांधी, अनिल कुलकर्णी, तेजश्री देशपांडे, कैलास भैरट,अश्विनी कोटस्थाने, दत्तात्रय म्हस्के,हेमांगी बोंडे,दत्तात्रय पुजार, हेमंत जोशी,डॉ. अनुपमा जाधव,सुनीता बोडस,प्रकाश परदेशी,शोभा जोशी,किरण जोशी यांनी सहभाग घेतला. खेडकर यांनी प्रास्ताविक केले.रवींद्र झेंडे,नृसिंह पाडुळकर,शशांक देशपांडे यांनी संयोजन केले.स्वाती काकडे यांनी सूत्रसंचालन केले तर कलाल यांनी आभार मानले.

### सिलिंडरचा स्फोट, दहा झोपड्या जळून खाक

**शहापूर : प्रतिनिधी** मिरा रोड येथे कामगारांसाठी बांधण्यात आलेल्या पत्र्याच्या झोपड्यांना गुरुवारी दुपारी बाराच्या सुमारास भीषण आग लागल्याची घटना घडली. या आगीमुळे दोन ते तीन गॅस सिलेंडरचा स्फोट झाला. अग्निशमन दलाने वेळेवर घटनास्थळी पोहोचून आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मिरा रोड येथील शीतल नगर परिसरात एका विकासकाची मोकळी जागा आहे. या जागेत विकासकाने आपल्या कामगारांसाठी सुमारे वीस ते पंचवीस पत्र्याच्या झोपड्या उभारल्या होत्या. गुरुवारी दुपारी बाराच्या सुमारास यातील एका झोपडीत शॉर्ट सर्किट झाल्यामुळे आग लागली. त्यावेळी या झोपड्यांमध्ये दोन-तीन मजूर उपस्थित होते.मात्र शहरात झोपड्यांना लागणाऱ्या आगी व त्यामुळे होणाऱ्या सिलेंडर स्फोटांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहे. काही महिन्यांपूर्वी अशीच आग रामदेव पार्क येथील नव्या गृहनिर्माण संस्थेच्या बांधकाम स्थळी लागली होती. तर दीड वर्षांपूर्वी आगीत झालेल्या सिलेंडर स्फोटात एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. त्यामुळे पुन्हा एकदा मोकळ्या जागेत असलेल्या झोपड्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.भर दुपारी लागलेल्या आगीने झपाट्याने पसरण्यास सुरुवात केली. त्यामुळे झोपड्यांमध्ये ठेवण्यात आलेल्या दोन ते तीन सिलेंडरचा स्फोट झाला. या स्फोटांमुळे संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. घटनेची माहिती मिळताच महापालिकेच्या अग्निशमन दलाने तातडीने घटनास्थळी दाखल होऊन सुमारे तासाभरात आग नियंत्रणात आणली. मात्र या लागलेल्या आगीत आठ ते दहा झोपड्या जळून खाक झाल्या आहेत. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती महापालिकेचे अग्निशमन अधिकारी प्रकाश बोराडे यांनी दिली.

# फॅन्सी, ड्युप्लिकेट नंबरप्लेट, काळ्या फिल्मवर बंदी घालावी; अन्यथा मनसेस्टाइल आंदोलन



**नाशिक : प्रतिनिधी**

फॅन्सी, ड्युप्लिकेट नंबरप्लेट व काळ्या फिल्मवर त्वरित बंदी घालावी, या मागणीचे निवेदन मनसेने प्रादेशिक परिवहन अधिकारी प्रदीप शिंदे यांना दिले.

नाशिक जिल्ह्यात वाहतूक नियम व मोटार वाहन कायद्याचे सर्रास उल्लंघन होत आहे. प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे ही परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. नाशिकमध्ये मोठ्या प्रमाणावर वाहनधारक त्यांच्या वाहनांवर नियमबाह्य व फॅन्सी नंबरप्लेट वापरताहेत. अशा प्लेट अनेकदा गुन्हेगारी घटनांत वापरण्यात येतात. त्यामुळे अधिकाऱ्यांना तपास करण्यात अडचण येते. या प्रकाराला आळा घालण्यासाठी शहरभर तपासणी मोहीम राबवावी. फॅन्सी व डुप्लिकेट नंबरप्लेट असलेली वाहने थांबवून दंडात्मक कारवाई करावी. अधिकृत हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेटच मान्य आहेत, याबाबत जनजागृती अभियान हाती घ्यावे.

वाहनांवर काळ्या रंगाच्या फिल्मवर बंदी घालणे सार्वजनिक सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. पण आजही अनेक वाहनधारक त्यांच्या वाहनांच्या काचांवर काळ्या फिल्म लावून बिनधास्त फिरतात. ही बाब केवळ कायद्याचे उल्लंघन नाही, तर

पोलीस, गुन्हे शाखा, तपास यंत्रणांसाठी अडथळा ठरते. अशा वाहनधारकांकडून फिल्म काढून घेण्यात यावी. या मागण्यांवर आठ दिवसांच्या आत ठोस कारवाई झाली नाही, तर आरटीओ कार्यालयासमोर आंदोलन छेडण्यात येईल. ही बाब फक्त कायद्याच्या अंमलबजावणीसाठी नसून, शहरातील जनतेच्या सुरक्षेसाठी व नागरी कर्तव्याच्या पालनासाठी असेल. त्याचे पूर्ण उत्तरदायित्व आरटीओ विभागावर राहील, असा इशारा मनसेने दिला.याप्रसंगी मनसेचे प्रदेश सरचिटणीस दिनकर पाटील, प्रदेश उपाध्यक्ष सलीम शेख, शहराध्यक्ष सुदाम कोंबडे, महिला सेना प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे, जिल्हा उपाध्यक्ष नामदेव पाटील, विभाग अध्यक्ष सत्यम खंडाळे, योगेश दाभाडे, नितीन माळी, सचिन सिन्हा, तुषार गांगुर्डे, प्रफुल बनभैरू, किरण क्षीरसागर, राकेश परदेशी, अमोल चांदवडकर, शैला शिरसाट, स्वागता उपासनी, शहर उपाध्यक्ष गणेश कोठुळे, विशाल भावले, पुरुषोत्तम जगताप, अमोल गोजरे, लक्ष्मण साळवे व पदाधिकारी मनसैनिक उपस्थित होते.

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**कार्यकारी अभियंता, सा. बां. (आदिवासी) विभाग नाशिक**
इमारत क्र. अ-३ आदिवासी विकास कॉलनी, आरटीओ ऑफीस जवळ, सैन्य व पोलीस पूर्व प्रशिक्षण केंद्र समोर पेठरोड नाशिक
**ई-निविदा क्र. ४ सन २०२४-२०२५**

कार्यकारी अभियंता सा. बां. (आदिवासी) विभाग, नाशिक (दूरध्वनी क्रमांक ०२५३-२९९२०५३) हे त्यांच्या अधिपत्याखालील कार्यक्षेत्रातील **स्थापत्य** विषयक बांधकामा करीता आदिवासी विकास विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत स्थापत्य विषयक ठेकेदारांकडून ब-१ नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) मागवित आहेत.

ई निविदा सूचना **क्रमांक ०४ सन २०२५ २०२६ मध्ये (रुपये ६००.०० लक्ष च्या आतील) एकूण १६ (सोळा) कामे** समाविष्ट आहेत. निविदा विषयक संपूर्ण माहिती खालील संकेत स्थळावर **दिनांक** ०२/०६/२०२५ पासून ऑनलाईन पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

**संकेतस्थळ-** https://mahatenders.gov.in

जा.क्र.लेखा/निविदा/१६७६/सन-२०२५
कार्यकारी अभियंता, सा. बां. (आदिवासी) विभाग, नाशिक जि. नाशिक यांचे कार्यालय
**दिनांक:-** २६/०५/२०२५.
आरओसी-2024-25/क्र-5/C२००२

**सही/-**
**(निरजे पु. चोरे)**
**कार्यकारी अभियंता**
**सा. बां. (आदिवासी) विभाग नाशिक**

# कुंभमेळ्यात विद्यार्थ्यांना अकॅडमिक क्रेडिट गुण द्यावे

## सागर वैद्य यांची विद्यापीठाकडे मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या दिशादर्शक तत्वांनुसार, कुंभमेळ्यात स्वयंसेवक म्हणून मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यासाठीच्या क्रेडिट प्रणालीचा वापर करून अकॅडेमिक क्रेडिट (गुण) देण्यात यावे. यासंबंधीचा ठराव आगामी अकॅडमिक कौन्सिलच्या बैठकीत घ्यावा अशी मागणी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य यांनी विद्यापीठाकडे केली आहे.

यासंबंधीचे निवेदन वैद्य यांनी नुकतेच कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांना दिले आहे.

नाशिक येथे २०२६-२७ दरम्यान कुंभमेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. कुंभमेळा हा दर बारा वर्षांनी येणारा एक राष्ट्रीय स्तरावरील भव्य धार्मिक आणि सांस्कृतिक सोहळा असून, या सोहळ्यास लाखो भाविक देशभरातून तसेच परदेशातूनही भेट देतात. या महाउत्सवात विद्यार्थ्यांची विविध कार्यक्षेत्रांमध्ये जसे की, वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन ,आरोग्य सेवा, सीसीटीव्ही नियंत्रण, माहिती तंत्रज्ञान, एन सी सी एन एस एस , संशोधन, सुरक्षा, पर्यावरण, नदी संवर्धन आदी अनेक व्यवस्थापकीय कार्ये यात मदत घेता येईल. किंबहुना यापूर्वीच्या कुंभमेळ्यात स्वयस्फूर्तीने विद्यार्थी शिक्षक घटकांनी असे योगदान दिलेलेही आहे.

विद्यार्थ्यांच्या या सहभागामुळे प्रशासनाला आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध होईल. त्याचबरोबर, विद्यार्थ्यांना नागरी शिस्त, संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, आणि सामाजिक जबाबदारी यासारख्या क्षेत्रातील प्रत्यक्ष अनुभव मिळेल. अशा प्रकारच्या अनुभवामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होईल. नाशिकचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनी यासाठी कौतुकास्पद पुढाकार घेवून शैक्षणिक समन्वय समितीही याकामी स्थापन केली आहे. पोलिस प्रशासनानेही विद्यापीठाला यासंबधीचे पत्र पाठवले आहे. विद्यापीठाने त्या अनुषंगाने, नाशिक कुंभमेळ्यामध्ये सामाजिक कार्यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याच्या स्वरूपानुसार अकॅडमिक क्रेडिट्स प्रदान करावे जेणेकरून एनइपी चा यथोचित उद्देशही सफल होईल आणि विद्यार्थ्यांसाठी हा केवळ धार्मिक उत्सवातील सहभाग न राहता शैक्षणिक उपक्रमही ठरून त्यांच्या ज्ञान परंपरेत वाढ होईल.



**नाशिक महानगरपालिका,नाशिक**
**वृक्षप्राधिकरण**
**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ चे कलम ८(३) अन्वये**

**जाहिर नोटीस**

नाशिक महानगरपालिका हद्दितील नवीन नाशिक विभागाअंतर्गत धोकादायक, वाळलेले व बांधकाम बाधितवृक्ष तोडणे/ पुर्णरोपण/ छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील कलम ८ (२) अन्वये वृक्षप्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करणेत आले आहेत.

त्याचप्रमाणे नाशिक महानगरपालिकेल्या हद्दितील नवीन नाशिक मनपा मालकीच्या रस्त्याच्या कडेची धोकेदायक रहदारीस अडथळा ठरणारी, विद्युत पथदिव्यांना व सिग्नलला अडथळा ठरणारी वृक्षांची छाटणी बाबत वर नमुद अधिनियमातील ८(२) अन्वये वृक्ष प्राधिकरणाकडे लेखी अर्ज सादर करण्यात आले आहेत.

ज्या अर्थी, वृक्ष प्राधिकरणाकडे व वृक्ष अधिकारी यांचेकडे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत अधिनियमातील कलम ८(३) अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन कमाल ०७ (सात) दिवस कालावधी मध्ये हरकती तथा सूचना मागविणेचे सुचित केले आहे. त्याअनुषंगाने अधिनियमातील अटी व शर्ती अधिन राहून प्राप्त अर्जांची छाननी झाल्यानंतरच त्याबाबतचा प्रस्ताव मा. वृक्ष प्राधिकरण सभा ठराव ३९ दिनांक २४/१२/२०१९ अन्वये त्याबाबतचा अहवालासह वृक्ष अधिकारी नवीन नाशिक यांनी प्रस्ताव तयार केले आहे. सदरचे प्रस्ताव नवीन नाशिक विभागीय कार्यालय उद्यान विभागात उपलब्ध असून प्रस्तुत प्रकरणी हरकती तथा सुचना असल्यास लेखी स्वरुपात नवीन नाशिक विभागीय कार्यालय येथे जाहिरात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे मुदतीत दयाव्यात, मुदतीनंतर प्राप्त झालेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

जनसंपर्क/जा.क्र./१००/२०२५
दि.२९/०५/२०२५

मुलगा–मुलगी भेद नको, मुलगी झाली खेद नको.

**सही /–**
**वृक्ष अधिकारी तथा विभागीय अधिकारी,**
**न.ना विभागीय कार्यालय**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक.**



# बेताल वक्तव्य करणाऱ्या बाळा दराडेंवर गुन्हा दाखल करा

## काँग्रेसचे पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांना निवेदन

**नाशिक: प्रतिनिधी**

बेताल वक्तव्य करणाऱ्या बाळा दराडेंवर गुन्हा दाखल करण्याची मागणी काँग्रेसने पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे, विरोधी पक्षनेते व काँग्रेस पक्षाचे खासदार राहुल गांधी यांच्याबद्दल शिवसेनेच्या बाळा दराडे नामक कार्यकर्त्याने राहुल गांधी नाशकात आल्यास त्यांच्यावर व त्यांच्या ताफ्यावर दगडफेक करू, असे वक्तव्य करून एका प्रकारे जीवे मारण्याची धमकी देण्याचा प्रयत्न केला.

विरोधी पक्षनेतेपद हे संविधानिक असून, या आधीच राहुल गांधी यांच्या जीवाला धोका असल्याचं वेळोवेळी निष्पन्न झाले आहे. धमकी देणाऱ्या व्यक्तीवर गुन्हा दाखल करून त्यास शासन करावे. अशा प्रवृत्तींना जेरबंद केल्याशिवाय कायदा व सुव्यवस्थेचा धाक बसणार नाही असे निवेदनात म्हटले आहे. आयुक्त संदीप कर्णिक यांची भेट घेतल्यानंतर काँग्रेस पक्षाचे शिष्टमंडळ अंबडचे पोलीस निरीक्षक राकेश हांडे यांची भेट घेऊन बाळा दराडेंवर गुन्हा दाखल करावा म्हणून ठिय्या मांडला. पोलीस निरीक्षक हांडे यांनी वरिष्ठांशी चर्चा करून तसेच काँग्रेस शिष्टमंडळाशी चर्चा करून इसमावर गुन्हा दाखल करून घेतला आहे. काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते अत्यंत संयमी आहे.

लोकशाही मार्गाने व कायद्यानुसार कारवाई व्हावी म्हणून प्रशासनाला विनंती केली आहे परंतु यापुढे असे प्रकार काँग्रेस पक्षाचा कार्यकर्ता आता सहन करणार नाही, असा इशारा पण यावेळेस शहर काँग्रेसचे अध्यक्ष आकाश छाजेड यांनी दिला. या शिष्टमंडळात माजी नगरसेवक लक्ष्मणराव जायभावे, उपाध्यक्ष संदीप शर्मा, सेवा दलाचे अध्यक्ष वसंत ठाकूर गौरव सोनार, पंचवटी ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष उद्धव पवार , सिडको ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष विजय पाटील, शहरी व काँग्रेसचे अध्यक्ष स्वप्निल पाटील, शहर अनुसूचित जमाती विभागाचे अध्यक्ष संतोष ठाकूर, मतीन पटेल राजकुमार जेफ, पंचवटी ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष उद्धव पवार, सातपूर ब्लॉक काँग्रेसचे अध्यक्ष कैलास कडलक, फारूक मन्सुरी, देवा देशपांडे, अनिल बोहोत, अण्णा मोरे, भालचंद्र पाटील, अशोक लहांगे, धोंडीराम बोडके, सिद्धार्थ गांगुर्डे, नितेश निकम, इसाक कुरेशी, प्रकाश माळी आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**नाशिक कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक.**
नाशिक कृषि उत्पन्न बाजार समिती, नाशिक. आनंदऋषीजी महाराज मार्ग, दिंडोरी रोड मार्केटयार्ड, पंचवटी, नाशिक-३ कार्यालय फोन नं. (०२५३) २५१४९२२/२५१०४७४ फैक्स नं. २५१४९२३
E-mail - apmcnasik@rediffmail.com / am nashik@msamb.com

बाजार समितीचे **सन २०२५-२०२६** करीता छपाई कामासाठी सिलबंद निविदा मागविणेत येत आहेत. याबाबतची सविस्तर माहिती **दि. ०३/०६/२०२५ दु. ४.०० वाजेपर्यंत** (सुट्टीचे दिवस सोडून) छपाई विभागाकडे समक्ष मिळेल. तसेच समितीचे ना.रोड मार्केट यार्डमधील संपूर्ण ड्रेनेज लाईन साफसफाई करणे व निघालेली संपूर्ण घाण मार्केट बाहेर वाहून टाकणेच्या कामाकरीता **दि.०३/०६/२०२५ दु. ४ वाजेपर्यंत** बाजार देखभाल विभागाकडे सिलबंद कोटेशन मागविणेत येत आहेत. वरील कामांचे संपूर्ण अधिकार बाजार समितीने राखून ठेवले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **निवृत्ती बागुल** | **विनायक माळेकर** | **सौ. कल्पनाताई चुंभळे** |
| **सचिव** | **उपसभापती** | **सभापती** |

**दस्त गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका सिन्नर पैकी **मौजे सिन्नर** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **सर्व्हे नं.१८६/४अ** यामधील **प्लॉट नं.१७** यांसी **एकूण क्षेत्र १९८.०० चौ.मी.** व त्यावरील बांधीव **द्विन बंगलो** पैकी **बंगलो नं.अे** यांसी **बांधीव क्षेत्र ५२.९७ चौ.मी.** व **प्लॉटेड क्षेत्र ९९.०० चौ.मी.** ही मिळकत यांसी चतु:सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे.

उपरोक्त नमुद केलेली मिळकत आजरोजी **श्री.अनिल बबनराव काजळे** यांचे खरेदी मालकीची व कबजे उपभोगातील असून त्यांनी सदर मिळकत पुर्वाश्रमिचे मालक **श्री.सुरेश मुरलीधर वाघ** यांचेकडून **दिनांक ३/४/२००२** रोजी मे.दुय्यम निबंधक सो. सिन्नर यांचे कार्यालयात नोंदविलेले **विक्री करारनामा/ॲग्रीमेंट टू सेल** यांसी **दस्त क्रमांक ११६४/२००२**, या दस्तान्वये विकत घेतलेली असून **सदर दस्ताची मुळप्रत व नोंदणी पावती मिळकत मालक यांचेकडून सिन्नर परिसरात हरविली / गहाळ झालेली आहे** व शोध घेतला असता सापडुन आलेली नाही. मिळकत मालक यांनी उपरोक्त मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे सांगुन सदर दस्ताचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला नसल्याचे खात्रीशीरपणे सांगितले आहे.

तत्राप, उपरोक्त नमुद मिळकतीचे मालकी हक्क व निर्वेधपणाबाबत कोणास काहीही हरकत / तक्रार असल्यास अगर उपरोक्त नमुद दस्ताची व नोंदणी पावतीची मुळ प्रत कोणासही सापडून / मिळुन आल्यास त्यांनी कृपया खालील पत्त्यावर **०७ दिवसांचे आत** संपर्क साधावा. कळावे, ही दस्त गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस. नाशिक. दि.२९/०५/२०२५.

**समीर चंद्रशेखर रत्नपारखी,ॲडव्होकेट**
ऑफीस नं.३१०,सारडा संकुल,एम.जी.रोड,नाशिक.मो.९६२३१९३७८५,९१७५७२६५२९

**AUTHUM ऑथम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**
शाखा कार्यालय: ऑफिस क्र. २०९ व २१०, दुसरा मजला, सिटी स्क्वेअर, प्राईड हॉटेलच्या जवळ, शिवाजीनगर, पुणे-४११००५
कार्पोरेट कार्यालय-द रुबी, ११ वा मजला, नॉर्थ वेस्ट विंग, प्लॉट क्र.२९, सेनापती बापट मार्ग, दादर (प), मुंबई-४०००२८

**खासगी करारावारे विक्रीची सूचना**

रिलायन्स होम फायनान्स लिमिटेडच्या धनकोंनी स्वीकृत केलेल्या योजनेस रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने जारी केलेल्या तणावग्रस्त मालमत्तांच्या सामजस्य वसुली प्रक्रियेसाठी जारी केलेल्या दिनांक ७ जून २०१९ च्या परिपत्रकाप्रमाणे मार्च ३, २०२३ रोजी मे सुप्रिम कोर्टाने पारित केलेल्या आदेशाप्रमाणे व दिनांक २५ मार्च २०२३ रोजी रिलायन्स होम फायनान्स लिमिटेडच्या भागधारकांनी विशेष ठराव पारित केल्याप्रमाणे RHFL यांनी आपला संपूर्ण व्यवसाय चालू स्थितीत रिलायन्स होम फायनान्स लिमिटेड यांना हस्तांतरीत केला असून याद्वारे मिळणारे वसुलीचे सर्व हक्क व अधिकार RCFL यांच्याकडे हस्तांतरीत झाले आहेत.

ऑथम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (AIIL), RCFL च्या कर्ज वाटप व्यवसायाचे NCLT च्या दि.१०-५-२०१४ च्या आदेशाद्वार विलीनीकरण झालेली कंपनी असून तिचे ऑफिस, दि रूबी, ११ वा मजला, नॉर्थ वेस्ट विंग, प्लॉट क्र.२९, सेनापती बापट मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई ४०००२८ (महाराष्ट्र) व शाखा कार्यालय AIIL, ऑफिस क्र.२०९ व २१०, दुसरा मजला, सिटी स्क्वेअर, प्राईड हॉटेल जवळ, शिवाजीनगर, पुणे ४११००५ तर्फे SARFAESI कायदा २००२ अन्वये विक्री.

खाली सही करणार AIIL चे प्राधिकृत अधिकारी याद्वारे कळवितात की, कर्जदार श्री. राजेंद्र शिवाजी सैंदाणे व सौ.शालिनी राजेंद्र सैंदाणे यांनी कंपनीकडून आर्थिक कर्ज क्रमांक RHAHNAS000015257 त्यातल्या करारातील अटी शर्तीप्रमाणे घेतलेले आहे. कर्जफेडीमध्ये कसूर केल्याने खाली सही करणार यांना SARFAESI कायदा २००२ च्या तरतुदीप्रमाणे दि.११ जुलै २०१६ रोजी रुपये ९,७३,२३५/- (नऊ लाख त्र्याहत्तर हजार दोनशे पस्तीस) या रकेमच्या वसुलीसाठी मागणी सूचना जारी करावी लागली व त्यानंतर कायद्याप्रमाणे २९ ऑगस्ट २०१८ रोजी मालमत्ता ताब्यात घ्यावी लागली आहे. ही मालमत्ता SARFAESI कायद्याप्रमाणे विक्री करण्याचा अनेकदा प्रयत्न झाला.परंतु तो अपयशी ठरल्यामुळे कायद्याच्या नियम ८ (५)(डी) प्रमाणे आता खासगी करारावारे विक्री करण्याची ऑफर देण्यात येत आहे व खाली सही करणार यांनी स्वीकारली आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, प्राधिकृत अधिकारी यांनी खाली दर्शविलेली मालमत्ता SARFAESI कायदा २००२ सुरक्षित व्याज (सक्त वसुली) नियम २००२ प्रमाणे सुरक्षित कर्जवसुलीकामी खासगी कराराने दि.१६ जून २०२५ रोजी विक्री करण्याचे ठरविले आहे. मालमत्ता ‘जशी आहे जेथे आहे‘, ‘जे काही आहे, व अपरिवतर्णीय तत्त्वावर विक्री करण्यात येईल. कोणास याविषयी हरकत असेल अथवा खाली दर्शविलेल्यापेक्षा अधिक रक्कम देऊन ती घेण्यात स्वारस्य असेल तर खाली सही करणार यांना दिनांक १४ जून २०२५ रोजी दुपारी ५.३० च्या आत संपर्क करावा. त्यानंतर कोणतेही आक्षेप किंवा ऑफरचा विचार केला जाणार नाही.

| कर्जदार/सहकर्जदार/ जामिनदार | मालमत्ता/ सुरक्षित व्याज तपशील | एकूण येणे रक्कम दि.२७ मे २०२५ पावेतो | कराराची रक्कम | विक्री तारीख |
|---|---|---|---|---|
| १. श्री. रवींद्र शिवाजी सैंदाणे<br>२. सौ. शालिनी रवींद्र सैंदाणे | फ्लॅट क्रमांक बी ६, पहिला मजला, बी विंग, कुलस्वामिनी हाईटस, प्लॉट क्र.६२,६३,६४ गट क्रमांक ५२ ४ अे,२१२४५६अे, एक्स्लो पॉईंट, चुंचाळे शिवार, अंबड, नाशिक. | रक्कम रुपये ३४,१६,५३७.९२/- (चौतीस लाख सोळा हजार पाचशे सदोतीस रुपये ब्याण्णव पैसे मात्र) | रु. ७,००,०००/- (सात लाख रुपये मात्र) | १६ जून २०२५ |

**अटी व शर्ती**

१. खासगी करारावारे ‘जसे आहे जेथे आहे‘, व ‘जे काही आहे तत्त्वावर विक्री
२. ऑफर स्वीकारल्याबाबत कळविल्या गेल्यावर त्याच दिवशी खरेदीदाराने खरेदीची संपूर्ण रक्कम भरणा करणे आवश्यक.
३. मालमत्तेवरील सद्याचे व भविष्यातले सर्व देणे/ जबाबदाऱ्या ज्या प्राधिकृत अधिकाऱ्यांना ज्ञात आहेत किंवा नाहीत यांसह ती विकण्यात येईल. प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको त्यासाठी तिऱ्हाईतांना जबाबदा राहणार नाहीत.
४. खरेदीसाराने खरेदीपूर्वी मालमत्तेसंबंधी सर्व बाबींची खातरजमा करून घेणे आवश्यक. प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको यांच्याकडे नंतर तक्रार/आक्षेप घेऊ नयेत.
५) खरेदीराने स्टॅम्प डयुटी, नोंदणी फी, इतर कर, ड्युटीज सारखे खरेदीचे सर्व खर्च स्वत: करावयाचे आहेत.
६) विक्री ही SARFAESI कायदा/ नियमाप्रमाणे असेल.
७) ही ऑफर १६ जून २०२५ पर्यंत वैध आहे. त्यानंतर AIIL यांना असलेली डिपॉझीट रक्कम जप्त करण्याचा अधिकार आहे.

**स्थळ: पुणे**
**तारीख: २९/०५/२०२५**

**सही/- प्राधिकृत अधिकारी**
**ऑथम इन्व्हेस्टमेंट ॲण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड**

# लाड समितीच्या शिफारशीने ७० सफाई कामगारांना नियुक्ती

## म्युनिसिपल कर्मचारी सेनेच्या पाठपुराव्याचे यश: सुधाकर बडगुजर

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक महानगरपालिकेच्या दिवंगत, सेवानिवृत्त, आणि स्वेच्छानिवृत्त सफाई कामगारांच्या रिक्तपदी लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसाहक्काने ७० जणांची घनकचरा व्यवस्थापन विभागात सफाई कामगार या पदावर नियुक्ती करण्यात आल्याने सफाई कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या बाबत म्युनिसिपल कामगार कर्मचारी सेनेने केलेल्या पाठपुराव्याचे हे यश असल्याचे कर्मचारी सेनेचे अध्यक्ष तथा शिवसेना उपनेते सुधाकर बडगुजर यांनी सांगितले. दरम्यान नियुक्ती मिळालेल्या कामगारांसह त्यांच्या कुटुंबियांनी गुलाल उधळून आनंद व्यक्त केला. यावेळी अनेकांच्या डोळ्यात आनंदाश्रूही आले.



सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी स्तर रु.१५,००० -४७,६०० मधील प्रारंभिक मूळ वेतन १५ हजार या दरमहा एकूण वेतनावर प्रथमतः दोन वर्ष परिविक्षाधीन कालावधीसाठी त्यांची नियुक्ती करण्यात आल्याचे महापालिकेने काढलेल्या पत्रात म्हटले आहे. पालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातील सेवानिवृत, दिवंगत आणि स्वेच्छानिवृती घेतलेल्या कर्मचाऱ्यांच्या वारसांना तातडीने लाड व पागे कमिटीच्या शिफारशीनुसार वारसा हक्काने नियुक्ती द्यावी या बाबत म्युनिसिपल कर्मचारी कामगार सेनेकडून वारंवार महानगरपालिका आयुक्तांना निवेदने देऊन सातत्याने पाठपुरवठा सुरु होता. अखेर या पाठपुरवठयाला गुरुवारी यश येऊन याबाबतचा निर्णय काढला. आणि महापालिका प्रशासनाने वारसाहक्काने ७० सफाई कामगारांना नियुक्ती देण्याचा आदेश काढला. याबद्दल संघटनेच्या वतीने आयुक्तांचे आभार मानावे तेवढे कमी असल्याचे बडगुजर यांनी म्हटले. नियुक्त झालेले कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांनी पेढे वाटून या निर्णयाचा जल्लोष साजरा केला. तसेच संघटनेचे वतीने अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर, उप आयुक्त (प्रशासन) लक्ष्मीकांत साताळकर, घनकचरा व्यवस्थापन प्रमुख उपायुक्त अजित निकत या सर्वांचे संघटनेने आभार मानले.

> **महापालिका प्रशासनाने लाड समितीच्या शिफारशीनुसार वारसांना नियुक्ती द्यावी. याकरिता प्रशासनाकडे सतत मागणी सुरु होती. याप्रकरणी अखेर वारसाहक्काने नियुक्ती दिल्याने संबंधित कामगार, त्यांचे कुटुंब व नातेवाईकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. सदर नियुक्ती दिल्याने आम्ही प्रशासनाचे आभारी आहोत.**
>
> **-सुधाकर बडगुजर, अध्यक्ष म्युनिसिपल कर्मचारी सेना**

# विभागात २० हजाराहून अधिक शेतकऱ्यांना कृषी योजनांचा लाभ

## ३१ मे पर्यंत योजनेची मुदत

**नाशिक प्रतिनिधी**

कृषी विभागामार्फत खरीप हंगाम २०२५ साठी विविध कृषी योजनांच्या अनुषंगाने शेतकऱ्यांची निवड प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वानुसार करण्यात आली आहे. या योजनेच्या पहिल्या टप्प्यात नाशिक विभागातील २० हजार १७० शेतकऱ्यांची निवड करण्यात आली असून, त्यांना एकूण १४५.६२ कोटी रुपयांचा थेट लाभ मिळणार आहे. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी ३१ मे पर्यंत आवश्यक कागदपत्रे महाडीबीटी पोर्टलवर सादर करावीत, असे आवाहन नाशिक विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक सुभाष काटकर यांनी केले आहे.

२१ मे रोजी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय खरीप नियोजन बैठकीत या नव्या पद्धतीस मान्यता मिळाली आहे. यात विविध कृषी योजनांचा समावेश आहे. नाशिक विभागात वैयक्तिक शेततळे योजनेत १ हजार ६३९ शेतकरी, सूक्ष्म सिंचन योजनेत ११ हजार ७३४ शेतकरी, सामूहिक शेततळे व प्लास्टिक अस्तरीकरण योजनेत १४२ शेतकरी, फलोत्पादन घटकांतर्गत १ हजार ४४ शेतकरी, कृषी



यांत्रिकीकरण योजनेंतर्गत ३०१ शेतकरी आणि कृषी यांत्रिकीकरण उपअभियानातून ३ हजार ७८३ शेतकरी या योजनांमध्ये लाभार्थी ठरले आहेत.

लाभार्थ्यांची यादी महाडीबीटी पोर्टल, कृषी विभागाच्या संकेतस्थळावर तसेच क्षेत्रीय कृषी अधिकार्यांच्या लॉगइनवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच निवड झालेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या नोंदणी मोबाइल क्रमांकार एसएमएस द्वारे सूचना संदेश पाठविण्यात आला आहे. निवड झालेल्या शेतकऱ्यांनी त्यांचा फार्मर आयडी वापरून माहिती तपासावी. ज्या शेतकऱ्यांचा फार्मर आयडी नाही त्यांनी नजीकच्या सेवा केंद्रावर जाऊन तो प्राप्त करून घ्यावा. ३१ मे पर्यंत आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. कागदपत्रे सादर न केल्यास त्यांचा अर्ज आपोआप रद्द केला जाणार आहे.

## हॉस्टेलमधील मुलींची छेड; सुनेने घेतला चावा

**पुणे** : जेवण झाल्यानंतर मित्रासोबत गप्पा मारत थांबले असताना हॉस्टेलमधील मुलींची छेड काढल्याच्या संशयावरून हॉस्टेल चालक व त्याच्या सुनेने तरुणाला मारहाण केली. सुनेने कानाचा चावा इतका जोरात घेतला की त्याच्या कानावर पाच टाके घालावे लागले. याबाबत मिलिंद वसंत कोठारी (४०, रा. दत्त वसाहत, दक्षिणमुखी मारुती मंदिरासमोर, शिरोळे रोड, शिवाजीनगर) यांनी डेक्कन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरून पोलिसांनी सुरेश विठ्ठल कांबळे (६०) व त्यांची सून यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.


### जाहीर नोटीस (टायटल व्हेरिफिकेशनसाठी)

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका नाशिक पैकी मौजे नाशिक शहर-३ या गांवचे शिवारातील **सर्व्हे नं.६४९/अ/२/प्लॉट/१५ यांसी क्षेत्र ५४१.६२ चौ.मी.** ही मिळकत **श्री. यशवंत रामचंद्र गुजर** यांचे मालकीची असून त्यांचे प्रत्यक्ष कब्जे, वहीवाटीत व उपभोगात मालक म्हणून आहे. सदर मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचे मिळकत मालकांचे म्हणणे असून त्यांचे सांगणेवरून सदर मिळकतीचे टायटल व्हेरिफिकेशनकामी सदरची नोटीस प्रसिध्द करण्यात येत आहे सबब सदर मिळकतीचे टायटलबाबत कोणत्याही प्रकारे गहाण, दान, लिन, लिज, अन्नवस, बक्षीसपत्र, साठेखत, जडजोखीम, बँक व बोजा असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ८ दिवसांत साक्षांकीत कागदपत्रासह लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध व बिनबोजाची आहे, असे समजून त्यानुसार टायटलबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल. कागदपत्रांशिवाय येणाऱ्या हरकतींचा तसेच परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**नाशिक , दिनांक २८/०५/२०२५**

**कळावे, ही जाहीर नोटीस टायटल व्हेरिफिकेशनसाठी.**

**श्री. दुर्गेश गोपाळराव थोरात,** ॲडव्होकेट
निवास फ्लॅट नं. ६. हंपी रेसीडेन्सी, सद्‌गुरूनगर,
सातपूर, नाशिक, मोबाईल नं. ९८५०९५२०९५


# ना. लोढांच्या उपस्थितीत आज निमामध्ये परिसंवाद

## उद्योजकांनी उपस्थित राहण्याचे आ.हिरेंचे आवाहन

**नाशिक : प्रतिनिधी**



आयटीआयच्या मुलभूत विकासासाठी शासनाने तयार केलेला सार्वजनिक खासगी भागीदारी धोरणाचा मसुदा उद्योजकांपर्यंत पोहचविण्याकामी कौशल्य विकास विभागाकडून आज शुकवार दि. ३० रोजी निमा हाऊसमध्ये परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात कौशल्य,रोजगार,उद्योजकता व नाविण्यता विभागाचे मंत्री ना.मंगलप्रभात लोढा उद्योजकांशी थेट संवाद साधणार आहे. अधिकाधिक उद्योजकांनी कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन आ.सीमाताई हिरे यांनी केले आहे.

शासनाने तयार केलेल्या सार्वजनिक खासगी धोरण मसुद्याचे आयटीआय दत्तक घेण्याचा हक्क, दत्तक घेण्याचा कालावधी आणि आर्थिक सहभाग आदी ठळक वैशिष्टे आहे. राज्यातील कौशल्य विकास विभागाकडून दिले जाणारे शिक्षण अधिकाधिक परिणामकारक, आधुनिक आणि उद्योजकांच्या गरजाशी सुसंगत असावे, या हेतूपोटी शासनाकडून विशेष धोरणाचा मसुदा तयार करण्यात आला आहे.

परिसंवादात मसुदयाचे सादरीकरण करण्यात येणार असून ना. मंगलप्रभात लोढा उद्योजकांशी थेट संवाद साधणार असल्याची माहिती आ.हिरेंनी दिली.ना.लोढा यांच्या उपस्थितीत आयटीआयच्या मुख्य कार्यालयात कौशल्य विकास विभागाची आढावा बैठक होणार आहे. त्यानंतर ना. लोढा यांच्या उपस्थितीत भाजप कार्यालयात पदाधिकाऱ्यांची बैठक आणि भाजपा कार्यकर्त्यांचा मेळावा होणार आहे.त्या पाठोपाठ ते भोसला मिलिटरी स्कूलमध्ये लघु उद्योग भारतीच्या सदस्यांची भेट घेणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी निमाचे अध्यक्ष आशिष नहार, आयमाचे अध्यक्ष लालित बुब, आयटीआयचे उपसंचालक गावीत आणि त्यांचे सहकारी प्रयत्नशील आहेत.


### दस्त गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, मौजे गणेशगांव (त्रंबक) ता. व जि. नाशिक येथील मिळकत **गट नंबर ३२** या मिळकतीचे **दि.१४.०६.२०१३** रोजीचे मे. दुय्यम निबंधक सा. नाशिक-५ यांचे कार्यालयात **दस्त क्र. ७३८३/२०१३** अन्वये नोंदविलेले मुळ खरेदीखत हे **अझहर अब्दूलबशीर अन्सारी** यांचेकडून **दि.१७.०५.२०२५** रोजी **गोवर्धन गाव** ता. जि. नाशिक येथील तलाठी ऑफीस मध्ये कामानिमीत्त जात असताना गहाळ झालेले आहे. त्याचा सर्वत्र शोध घेवून देखील सदर खरेदीखत मिळाले नाही. सबब उपरोक्त नमूद मुळ खरेदीखत कोणास आढळून आल्यास तो मुळ दस्त आमचे खालील पत्यावर आणून द्यावा. कळावे, ही जाहीर नोटीस. नाशिक. दि. :- २८/०५/२०२५

**श्री. संजय बहिरू मांडे**
ॲडव्होकेट, ऑफिस नं. सी, श्री महादेव कॉम्प्लेक्स, आदर्श शाळेच्या शेजारी,
सी.बी.एस. नाशिक-१. मो. नं. ९२२५१३४३३६

### टायटल व्हेरीफिकेशनसाठी जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नासिक पोट तुकडी व तालुका इगतपुरी पैकी **मौजे तळेगांव बुद्रुक** येथील इगतपुरी नगर परिषद हद्दीतील स्थावर मिळकत **गट नं. २९१ पैकी प्लॉट नं १ ते ६** यावरील बांधीव **सृष्टी लॅण्डमार्क ॲण्ड रिसॉर्ट प्रा.लि. फॉगसिटी,** मधील बिल्डींग नं.३/६. दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट नंबर २०४ यांत दोन बेडरूम+हॉल+किचन+संडास, बांथरुम + पॅसेजसह, सदरहु फ्लॅटचे एकूण **क्षेत्रफळ बिल्टअप क्षेत्र ७३-७० चौ.मी.** आहे. यांसी न.पा. मिळकत मालमत्ता क्र. GAT000051I35, जुना मालमत्ता W08001257, ही मिळकत **श्रुती पुनीत कक्कर, पुनीत चंद्रपाल कक्कर** रा- फ्लॅट नं. ५ व ६ दक्ष निवास, वामन वाडी, छगनमिठा पेट्रोल पंपाच्या मागे चेंबुर मुंबई ४०००७१यांचे मालकीची आहे. सदर मिळकतीचे मालकाने आमचे पक्षकारांबरोबर सदर मिळकत विक्री करणेबाबत व्यवहार करून व्यवहारापोटी विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकतीचे टायटल तपासणी करून निर्वेधते कामी खात्री करण्याची आहे. सदर मिळकतीचे स्वामीत्वाबाबत जसे, गहाण, दान, तारण, अन्नवस्त्र, लिन, लिज, बक्षिस, मृत्युपत्र, जामीनकी, जप्ती, कुळ वारस, करारनामा, जनरल मुखत्यारपत्र, संपादन क्षेत्र, भाऊहिस्सा वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ **(दिवस)** दिवसांचे आत आमच्या खालील पत्त्यावर साक्षांकीत कागदपत्रांनिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध बोजारहीत आहे असे समजुन टायटल क्लिअर आहे असे समजण्यात येवुन सदर मिळकतीचा खरेदीचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. मुदतीनंतर पुराव्याशिवाय व परस्पर वर्तमानपत्रात प्रसिध्द केलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. केवळ आमच्याकडे खालील पत्यावर पुराव्यासह लेखी स्वरुपात मुदतीत आलेल्या हरकतीचा विचार करण्यात येईल याची नोंद घ्यावी. कळावे ही जाहीर नोटीस दिनांक २८/०५/२०२५

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. राजू भागुजी पढेर,**
बी. कॉम एलएलबी ऑफीस माऊली, तहसिलदार कार्यालयाजवळ
इगतपुरी. जि. नाशिक, मो. ९७६३५३३११७


## येवला तालुक्यात अवकाळीचा तडाखा

येवला- दोन दिवसांच्या उघडिपीनंतर शहर व तालुक्याला बुधवारी (ता. २८) पावसाने चांगलेच झोडपले. सकाळी दिवस उजाडताच सुरू झालेला पाऊस दुपारी दोनपर्यंत कमी-अधिक प्रमाणात सुरू होता. देशमाने येथे एका शेतकऱ्याच्या विहिरीचा कठडा ढासळून बाजूला असलेले कांदे पूर्णतः विहिरीत पडून मोठे नुकसान झाले. देशमाने, भारमसह विविध भागांत कांद्याचे प्रचंड नुकसान झाले.

# महिला अत्याचार प्रकरणात तत्काळ न्याय द्यावा

## जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**नाशिक: प्रतिनिधी**

महिला अत्याचार प्रकरणात तत्काळ न्याय द्यावा व आरोपींना कठोर शिक्षा करावी, अशा मागणीचे निवेदन मनसे प्रदेश उपाध्यक्ष सुजाता डेरे यांनी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांना दिले. निवेदनात म्हटले आहे, जिल्ह्यात महिलांवरील अत्याचार, घरगुती हिंसा, हुंडाबळी आणि लैंगिक शोषण यासारख्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत आहे. अनेक महिलांना न्याय मिळत नाही, आणि न्यायप्रक्रियेत होणाऱ्या प्रचंड विलंबामुळे पीडित महिलांची मानसिक, सामाजिक आणि कौटुंबिक हानी होते. महिलांवरील अत्याचार, घरेलू हिंसा व हुंडाबळी प्रकरणांसाठी फास्ट ट्रॅक कोर्ट ची त्वरित स्थापना व्हावी.

प्रलंबित प्रकरणांची स्वतंत्र यादी तयार करून, विशेष न्यायालयात तातडीने सुनावण्या व्हाव्यात. प्रत्येक न्यायालयात महिला सहाय्य केंद्रे स्थापन करून, पीडित महिलांना मानसिक, कायदेशीर आणि सामाजिक मदत मिळावी.पोलिस चौकशीत हलगर्जी करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कडक शिस्तभंगात्मक कारवाई व्हावी. गंभीर गुन्ह्यांतील दोषींना कठोर शिक्षा - गरज पडल्यास मृत्युदंड - याची तरतूद व्हावी. पुण्यातील वैष्णवी हगवणे प्रकरण आणि नाशिकमधील भक्ती गुजराथी आत्महत्या प्रकरण यांसारख्या अनेक



प्रकरणांमध्ये न्यायाची प्रतीक्षा अजूनही संपलेली नाही. या निवेदनावर मनसे महिला सेनेच्या महाराष्ट्र नवनिर्माण महिला सेनेच्या प्रदेश उपाध्यक्षा सुजाता डेरे, माजी नगरसेविका आरती खिराडकर, कविता हर्षल कुलकर्णी, मीरा आवारे, गौरी सोनार, पद्मिनी वारे, अर्चना जाधव, वर्षा प्रशांत जगताप, अनिता पवार, यशोदा मुकणे, शीला वाडगावकर, अरुणा पाटील, शेला सिरसाट, निकिता दोंदे, फरीदा शेख, सना शेख, रमाबाई मेहकर, प्रसिदा शेख, कविता कांबळे, रुकसाना शेख, जमीन पठाण, रूपाली बेजेकर, रुबीना शेख, सोनी मोरे, बेबी वानखेडे, दीपा दोंदे आणि कविता कुलकर्णी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.


### जाहीर नोटीस

**ॲड. दवंगे वाय. एन.** पुढील नेमलेली ता.- १९/०६/२०२५

**कोपरगाव येथील मे. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर कोपरगाव, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात.....**

**वारस प्रमाणपत्र क्र. ३३/२०२३ निशाणी : ९२**

**१. रामभाऊ कचरू वाघ २. सुशिला रामभाऊ वाघ** दोघे रा. मळेगांवथडी, ता. कोपरगांव, जि. अ. नगर **अर्जदार**

**विरुध्द**

**१. राजेंद्र रामभाऊ वाघ,** रा. मळेगांव थडी, ता. कोपरगांव, जि.अ.नगर, **२. मनिषा रमेश गिडगे,** रा. वाईबोथी, ता. येवला, जि. नाशिक **सा. वाला**

ज्याअर्थी अर्जदार यांनी अर्जदार नं १ व अर्जदार नं २ चा मुलगा नामे **विजय रामभाऊ वाघ** यांचा दि. १४/०६/२०२३ रोजी मळेगांवथडी, ता. कोपरगांव, जि. अ.नगर येथे अपघाती मृत्यू झाला आहे. मयत **विजय रामभाऊ वाघ** यांचे नावावरील रिलायन्स जनरल इंश्युरन्स कंपनीचा ग्रुप पार्सनल ॲक्सीडेंट इंश्युरन्स दि २३/०४/२०२३ रोजी काढलेला आहे. सदर पॉलिसीचा सर्टिफिकेट नं. **CO123042318 07217791957290** असा असून त्याचा **RGICL Policy Reference ID : 130492329141124996** असा असून सदर पॉलिसीची जमा रक्कम अर्जदारांना मिळणेकामी सदर अर्ज केला आहे. यांना अन्य कोणीही वारस नाहीत अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याचे घोषीत करणेकामी म्हणून सदरचा अर्ज इंडियन सक्सेशन ॲक्ट ३७२ अन्वये मे. कोर्टात दाखल केलेला आहे. उपरोक्त अर्जदार हे वर नमूद मयत **विजय रामभाऊ वाघ** यांचे वारस असलेबाबत कुणाची काही तक्रार अगर हरकत असल्यास या कोर्टात **दि. १९/०६/२०२५** रोजी अगर त्यापूर्वी आपले लेखी म्हणणे स्वतः अथवा वकीलामार्फत या न्यायालयात सादर करावे. सदर तारखेसपर्यंत कुणाचेही काही म्हणणे अगर तक्रार आल्यास हे न्यायालय अर्जदाराचा योग्य तो पुरावा घेऊन अर्जदारास वारस प्रमाणपत्र देईल ही नोटीस. आज **दिनांक २३/०५/२०२५** रोजी माझे सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

तयार करणार — हुकुमावरून
सही/ कामगिरी लिपिक — सही/-सहा.अधीक्षक
दिवाणी न्यायालय व स्तर, कोपरगाव


पान १ वरून....

## निमात टाटा कंपनी स्किल सेंटर सुरू करणार

संस्था यांचे सहकार्य अपेक्षित असून त्यांच्याकडून ते मिळणारच असे निमाचे सचिव राजेंद्र अहिरे यांनी सांगितले. नाशिकच्या औद्योगिक जगताला आंतरराष्ट्रीय दर्जाचे जास्तीत जास्त मनुष्यबळ स्किल सेंटरद्वारे उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस राहील असे टाटाच्या इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ स्किलस चे मुख्य वित्तीय अधिकारी मयांक पलान यांनी सांगितले.टाटातर्फे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या मशीनवर प्रशिक्षण दिले जाते,असे आयआयएसचे प्रकल्प व्यवस्थापक श्रेयस पाटकर आणि मुख्य प्रशिक्षक एस.जगन्नाथन यांनी सांगितले. यावेळी निमाचे उपाध्यक्ष के.एल. राठी,मनिष रावल,सचिव राजेंद्र अहिरे, कोषाध्यक्ष राजेंद्र वडनेरे,स्टार्टअप इंडियाचे श्रीकांत पाटील,अखिल राठी, वैभव नागशेठिया, कैलास पाटील, आयटीआय चे संचालक रवींद्र मुंडासे, मोहन तेलंगी,गोविंद बोरसे,सायली काकडे,डॉ.संतोष अग्निहोत्री,शुभम कांकरेज ,प्रसाद कुलकर्णी,वैभव कुलकर्णी यांच्यासह उद्योजक आणि विविध शैक्षणिक संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक पोटतुकडी तालुका हगतपुरी पैकी **मौजे वाळविहिर** या गावचे शिवारातील शेतजमिन मिळकती अनुक्रमे **गट नं. १५६ यांसी क्षेत्र हे. १५.७५.५० आर + पो. ख. हे ०.८३.५० आर यांसी आकार रुपये १५.०६ पैसे यापैकी माझे स्वतंत्र आणेवारी हिश्याचे क्षेत्र हे ३.८४.५० आर+पो. ख. हे.०.३९.०० आर** यांसी आकार **रुपये ३.६८ पैसे** यापैकी **क्षेत्र हे. १.२०.०० आर** ही मिळकत या वर्णनाची मिळकत यांसी चतुः सिमा रेकॉर्डस् ऑफ राईटस् प्रमाणे ही मिळकत **श्री. एकनाथ बुधा ठोंबरे** यांचे मालकीची आहे.

येणेप्रमाणे मिळकती त्याचे नांवावर, त्यांचे मालकीची, निर्वेध व बोजाविरहीत असल्याचे सांगून आमचे पक्षकरांबरोबर व्यवहाराची बोलणी केलेली असून विसारापोटी आमचे पक्षकारांकडून व्यवहाराची/विसाराची रक्कम स्विकारलेली आहे. तरी सदर मिळकतीचे निर्वेधपणाची खात्री करणे साठी प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द केली आहे. तसेच सदर मिळकती निर्वेध व बोजारहीत व तबदिल करणेयोग्य आहे असे मालकाचे म्हणणे असून त्यांनी आमचे पक्षकारांची फरोक्त खरेदीचा सौदा निश्चित करुन तथापी सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबधन, दान, गहाण, लिन, लिज, पोटकी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, जमिनकी, जप्ती साठेखत जनरल मुखत्यापत्र, भाऊहिस्सा, कोर्टवाद, चोळीबांगडी, वहीवाट कब्जा, विसारपावती, साठेखत वैगरे किंवा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध बोजा असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ (पंधरा)** दिवसांच्या आत साक्षांकित कागदपत्रांनिशी त्यांची लेखी हरकत समक्ष हजर राहून आमचे कार्यालयात नोंदवावी मुदतीनंतर आलेली व परस्पर वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेल्या हरकतीची दखल घेतली जाणार नाही. तदनंतर सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत समजून आमचे पक्षकरा पुढील व्यवहार करतील याची नोंद घ्यावी. कळावे, ही जाहिर नोटीस

**दि.२९/५/२०२५**

**आमच्या मार्फत प्रसिद्ध**

**ॲड. रोहित नारायण पा. उगले.**
पत्ता - इगतपुरी न्यायालय इगतपुरी, मो. ९८५०४९७११६

### टायटल व्हेरिफिकेशन नोटीस

**मालमत्तेचे तपशील:** तुकडी जिल्हा नाशिक, पोट तुकडी तालुका दिंडोरी पैकी **मौजे-अवनखेड** गावचे शिवारातील शेतमिळकत **गट नं.८०** यांसी **क्षेत्र ०० हे ६५ आर,+पो. ख.००हे ०४ आर, यांसी आकार रू.१.५६ पैसे**. यांसी चतु:सिमा गाव नकाशाप्रमाणे.

वरील मालमत्ता सध्या **श्री.शुभम रामदास शेवाळे** यांच्या मालकीची अशी आहे, त्यांचे मिळकतीचे ७/१२ सदरी नाव दाखल आहे असे सांगून, त्यांनी माझ्याकडे टायटल व्हेरीफिकेशनची नोटीस प्रसिद्ध करणेकामी मागणी केली आहे. वरील मिळकतीवर कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेचा कोणताही हक्क, हक्क दावा, हितसंबंध, कर्ज, गहाण, भाडेकरार, कब्जा, भोगवटा, वारसा, उतरवळ, वडिलोपार्जित हक्क किंवा कोणताही कायदेशीर दावा असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात आणि संबंधित पुराव्यांसह खालील पत्त्यावर संपर्क साधावा. जर वरील मुदतीत कोणताही हरकत प्राप्त झाला नाही, तर असे गृहित धरण्यात येईल की वरील मालमत्तेवर कोणताही दावा/आक्षेप नाही आणि माझे पक्षकार यांना टायटल व्हेरीफिकेशन दाखला देण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाहीत. तसेच परस्पर वृत्तपत्रात प्रसारित झालेल्या जाहीर हरकती गृहीत धरल्या जाणार नाही. ही नोटीस.

**दिंडोरी, दिनांक : २८/०५/२०२५**

**आमचे मार्फत प्रसिद्ध**

**ॲड. संतोष जनक जाधव**
पत्ता-ॲडव्होकेट चेंबर, शॉप नं.२६/२७ मार्केट यार्ड,
निळवंडी रोड, दिंडोरी, ता.दिंडोरी.जि.नाशिक

### जाहीर नोटीस

ज्याअर्थी **महेंद्र रुद्राप्पा सोनवणे** हे **दिनांक** ०९/०८/२०१९ रोजी रत्नागिरी, ता. रत्नागिरी, जि. रत्नागिरी येथे मयत झालेले आहे. अशा परिस्थितीत मयत **महेंद्र रुद्राप्पा** यांना **श्रीमती माया महेंद्र सोनवणे** ही पत्नी म्हणून तसेच **श्री. प्रतिक महेंद्र सोनवणे** हा मुलगा म्हणून कायदेशिर वारस आहे. यापेक्षा अन्य कोणीही कायदेशिर वारस मयत **महेंद्र रुद्राप्पा सोनवणे** यांना नाहीत.

त्याअर्थी **महेंद्र रुद्राप्पा सोनवणे** यांचे नांवे **मौजे लासलगांव**, ता. निफाड, जि. नाशिक या महसुली गांवचे शिवारातील व ग्रामपंचायत लासलगांव हद्दीतील बिनशेती मिळकत **गट नं. २७६ पैकी प्लॉट नं. १०३, यांसी क्षेत्र ७६.१३ चौ.मी. यांसी आकार रुपये ७.६१ पैसे व प्लॉट नं. १०४, यांसी क्षेत्र ७०.८८ चौ.मी. यांसी आकार रुपये ७.०८ पैसे** अशा मिळकती आहेत. सदर मिळकतींचे रेकॉर्ड ऑफ राईटस्ला ७/१२ चे उताऱ्यावर मयत **महेंद्र रुद्राप्पा सोनवणे** यांचे उपरोक्त नमुद केलेल्या वारसाचे नावाची नोंद करावयाची आहे. त्यासाठी आमचे पक्षकार **श्री. प्रतिक महेंद्र सोनवणे** यांनी मा. तलाठी सो., लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक यांचेकडे अर्ज व प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. सदरच्या अर्जास कोणाही संबंधीतांस हरकत घ्यावयाची असल्यास प्रस्तुतची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ **(आठ)** दिवसांचे आत हरकती घ्याव्यात. किंवा मा. तलाठी सो., लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक यांचे कार्यालयात स्वतः अगर वकिलामार्फत योग्य त्या कागदपत्रांसह मा. तलाठी सो., / मा. मंडल अधिकारी सो., लासलगांव यांचे कार्यालयात हजर राहून हरकत दाखल करावी. मुदतीत हरकत न आल्यास मा. तलाठी सो.,/ मा. मंडल अधिकारी सो., लासलगांव, ता. निफाड, जि. नाशिक हे मयत महेंद्र रुद्राप्पा सोनवणे यांचे वारसाची नोंद करणेकामी पुढील योग्य तो आदेश करतील, याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०५/२०२५.

**आमचेमार्फत प्रसिध्द,**

**प्रशांत प्रल्हाद पाटील,** ॲडव्होकेट
ॲडव्होकेट चेंबर्स,
निफाड कोर्ट कंपाऊंड ता.निफाड, जि. नाशिक, मो-९८२३५८७५२१

### Public Notice Regarding Missing Documents

This public notice is to inform all the people that the property in the **Kalwan village (B)** is **Plot No. 16 out of G. No. 838, adm. area 61.25 Sq. Mtr.** As per the Four-Boundaries Record of Rights, the property mentioned above is currently owned and occupied by **Mr. Nimba Tulshiram Khare.** The original copy of the Sale deed and Registration receipt of the said property in the name of the former owner of the said property, **Shri. Krishna Dattatreya Birar, dated 07/12/1992,** registered in the **Sub-Registrar Office, Kalwan, Doc. No. KLV. 305/1992** and **Shri. Krishna Dattatreya Birar**, the Sale Deed of the said property is **Doc. No. 261/1991 dated 26/02/1991** and both the said property owner have been lost/missing the documents in Kalwan area by the current owner of the property and could not be found when searched for. The property owner has assuredly stated that the above property is free from encumbrances and that the said documents have not been misused in any way. Accordingly, if anyone has any objection/complaint regarding the ownership and occupancy of the above mentioned property or if anyone finds/receives the original copies of the above mentioned documents and registration receipts, they should please contact the following address within **07** days. Please note, this is a public notice regarding the missing document.

**Date- 29-05-2025**

**Adv.Mayur Prakash Kothawade**
old post gali, Satana, Raji.No.5237/2017
Mo 9028891878/8329079392



## गांवकरी Classified

जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

### पाहिजेत

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोड येथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

### पाहिजेत

पंचवटीत कापड दुकानाकरिता पंचवटीतील स्थानिक मुले पाहिजेत. सकाळी ९ ते १. ७५८८६६४४९१

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-**९८६०१३६५३६

### विकणे आहे

बारागांव पिंप्री रोड, कानडी मळा येथे २ गुंठे प्लॉट त्वरित विकणे आहे. (सिन्नर) **मो.**७५८८०६३४६६ (एजेंन्ट क्षमस्व)

### जमीन विकणे आहे

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-**८७८८०९२४१५

### Name change

My old name AHMED RAZA KOKNI has been changed to my New Name ***AHMED RAZA ABDUL QADIR KOKNI*** as per my Aadhar card.

---

I, GORDE MACHINDRA BAJIRAO father of NO. 15756554K RANK Signalman NAME GORDE RUTWIK MACHINDRA, presently residing at KOPARGAON, AHMADNAGAR MAHARASHTRA 423601 declare that I have changed my name from MACHINDRANATH BAJIRAO GORDE to GORDE MACHINDRA BAJIRAO.

---

My Old Name **Sandeep Raosaheb Awate** has been changed to My New Name ***Sandeep Raosaheb Aute*** as per Aadhar Card.

### भाड्याने देणे आहे

नाशिकला राजीव नगरमध्ये नवीन बिल्डिंगमध्ये २ फ्लॅट फर्निचरसह त्वरित भाड्याने देणे आहे, लिफ्ट, दुसरा मजला ९४२२०२५२११

### जमीन विकणे आहे

५० गुंठे जमीन विकणे आहे. सोनगीरी ते जोगलटेंभी डांबरीकरण रोडटच बागायती. **मो.**९९२२२८७९५६

### गाळे विकणे आहे

नाशिक येथील कृषी उत्पन्न मार्केट मधील कांदा बटाटा लसूण विभागातील गाळा नं ४९ व ५० ( न्यू मार्केट यार्ड, आर टी ओ समोर) गाळे विकणे आहे. **संपर्क - हेमंत - ९८२१२३१४१४ हृदय- ९६१९३९८०२४ संपर्काची वेळ - संध्याकाळी ५ ते ७**

**जाहिरात छोटी किमया मोठी!**



### जाहीर हरकत

तमाम लोकांस विशेषत: **श्री. करणसिंग रविंद्रसिंग चड्ढा** रा. फ्लॅट नं. २०/२१, विजय गोपाल सोसायटी, बी/एच सेबल फर्निचर प्लाझा, तिडके कॉलनी नाशिक, ता. जि. नाशिक यांना कळविण्यात येते की, तुम्ही **दि. २८/०५/२०२५ रोजी दैनिक देशदुत** या वर्तमानपत्रात **मौजे बेळगांव ढगा, ता. जि. नाशिक** या शिवारातील **भुमापन क्रं. १८०/१** या मिळकतीमधील हॉटेलबाबत जाहीर इशारा नोटीस प्रसिध्द करून आमचे पक्षकार **प्रतिक्षा अमर बंग** व **जान्हवी मनोज तांबे**, संचालक- नाईनटास्टिक व्हेंचर्स प्रायव्हेट लि. पत्ता फ्लॅट नं. १, श्रीरामधुनी को. ऑफ. हॉसिंग सोसायटी, अहिरराव फोटो कलर लॅबच्या पाठीमागे, कॅनडा कॉर्नर नाशिक, ता. जि. नाशिक यांची कोणताही पुरावा नसताना हेतु पुरस्कर बदनामी केली आहे. सदर नोटीसमधील सर्व आरोप खोटे असून ते आमचे पक्षकारास मान्य नाही. याउलट तुम्ही मॅनेजमेंट कन्सलटन्सी करारात ठरल्याप्रमाणे आमचे पक्षकार यांचे **रू. ४४,००,०००/-** देणे थकविलेले आहे. सदर रक्कमेची मागणी आमचे पक्षकाराने केल्याने त्याचा राग येवून व सदरची थकीत रक्कम बुडविण्यासाठी तुम्ही लबाडीने खोटा मजकूर प्रसिध्द केला आहे. तुम्ही प्रसिध्द नोटीसेमधील नमूद केलेली मिळकत, इमारतीमधील वस्तू, साहित्य, मशनरी या सर्व आमचे पक्षकार यांचे मालकीचे व कब्जाच्या होत्या व आहे. त्याच्याशी तुमचा कोणताही हितसंबंध नव्हता व नाही. सदर सर्व वस्तू साहित्य, मशनरी याबाबतची सर्व बिले, कागदपत्रे आमचे पक्षकाराकडे आहे. तुम्ही सदर मिळकतीत बेकायदेशीर व्यवसाय, गोष्टी करून करारनाम्यातील अटी शर्तीचा भंग केला आहे. त्यामुळे आता **श्री. करणसिंग रविंद्रसिंग चड्ढा** यांच्या सोबत केलेला करारनामा रद्द करण्यात आलेला आहे. **श्री.करणसिंग रविंद्रसिंग चड्ढा** यांनी सदर मिळकतीचे मुळ मालक **श्री. राजाभाऊ सुखदेव ढगे** यांना देणे असलेली रक्कम न दिल्याने मुळ मालकाने आमचे पक्षकार सोबतचा **दि. १४/१२/२०२०** रोजीचा करारनामा रद्द करून मिळकतीचा कब्जा घेतलेला आहे. यापुढे **श्री. करणसिंग रविंद्रसिंग चड्ढा** यांचे सोबत या मिळकती बाबत (हॉटेल, बँक्वेट हॉल, बार, इत्यादी) कोणतेही व्यवहार करू नये. केल्यास ती जबाबदारी आमचे पक्षकारांवर रहाणार नाही. तुम्ही केलेल्या जाहीर नोटीसेमुळे आमचे पक्षकाराची त्यांचे फर्मची समाजात बदनामी झाली आहे. त्यांनी कमविलेल्या नावाची तुम्ही हेतुपुरस्कर बदनामी केली आहे. आमचे पक्षकाराची तुम्ही समाजात अब्रु नुकसान केले आहे. तुम्ही स्वत:हून करारभंग केल्याने तुमची संमती अथवा परवानगी घेण्याचा प्रश्न येत नाही. अशा परिस्थीतीत तुम्ही आमचे पक्षकाराची जाहीर बदनामी केल्याने तुम्ही आमचे पक्षकाराची जाहीर माफी मागावी अन्यथा आमचे पक्षकारास तुमचे विरूध्द अब्रु नुकसानीचा खटला दाखल करावा लागेल याची नोंद घ्यावी.

**स्थळ : नाशिक दिनांक : २९/०५/२०२५**

**आमचे मार्फत प्रसिध्द**

**ॲड. विजय जयराम मोगल, ॲडव्होकेट**
ऑफिस नं. २२३, मारुती चेंबर्स, नाशिक, ता. जि. नाशिक, मो. ९८२०९९६०७८

### दस्त गहाळ झालेबाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुकडी जिल्हा नाशिक, पोटतुकडी तालुका कळवण पैकी **मौजे कळवण (बुद्रुक)** या गांवचे शिवारातील मिळकत यांसी **गट नंबर ८३८ पैकी प्लॉट नं.१६ यांसी क्षेत्र ६१.२५ चौरस मीटर** यांसी चतुः सिमा रेकॉर्ड ऑफ राईटसप्रमाणे उपरोक्त नमूद केलेली मिळकत आज रोजी **श्री. निंबा तुळशिराम खरे** यांचे खरेदी मालकीची व कब्जे उपभोगातील आहे. सदर मिळकतीचे पूर्वाश्रमीचे मालक **श्री. कृष्णा दत्तात्रेय बिरार** यांचे लाभांतील व **दि.०७/१२/१९९२** रोजी **मे. दुय्यम निबंधक सो. कळवण** यांचे कार्यालयात नोंदविलेले खरेदीखत यांसी **दस्त क्रमांक कलव ३०५/१९९२,** या दस्ताची मुळप्रत व नोंदणी पावती व **श्री. कृष्णा दत्तात्रेय बिरार** सदरची मिळकत खरेदी केल्याचा **दस्त दि.२६/०२/१९९१** रोजीचा **दस्त क्रमांक २६१/१९९१** असून सदर दोन्ही दस्त मिळकतीचे आज रोजीचे मालक यांचेकडून कळवण परिसरात हरविले/गहाळ झालेले आहे व शोध घेतला असता सापडून आलेले नाही, मिळकत मालक यांनी उपरोक्त मिळकत निर्वेध व बोजारहीत असल्याचे सांगून सदर दस्तांचा कोणत्याही प्रकारे गैरवापर केला नसल्याचे खात्रीशीरपणे सांगितले आहे. तत्राप, उपरोक्त नमूद मिळकतीचे मालकी हक्क व निर्वेधपणाबाबत कोणास काहीही हरकत/तक्रार असल्यास अगर उपरोक्त नमूद दस्तांची व नोंदणी पावत्यांची मुळ प्रत कोणासही सापडून / मिळून आल्यास त्यांनी कृपया खालील पत्त्यावर ०७ दिवसांचे आत संपर्क साधावा, कळावे, ही दस्त गहाळ झालेबाबतची जाहीर नोटीस.

**सटाणा. दि. २९/०५/२०२५.**

**श्री. मयुर प्रकाश कोठावदे,** ॲडव्होकेट
जुनी पोस्ट गल्ली सटाणा, रजि.नं. महा ५२३७/२०१७
मो. ९०२८८९१८७८/८३२९०७९३९२

## संक्षिप्त ▶▶

### आडगाव येथील शेतात सुरू असलेल्या कामाबाबत झालेल्या वादातून हाणामारी

**सिडको :** आडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या पाठीमागील सैयद वस्तीमध्ये एका शेतात कंपाऊंड काम करत असताना झालेल्या वादातून फिर्यादी मोईन समीर सैयद (वय २४) यांना मारहाण आणि दमदाटी केल्याचा प्रकार समोर आला आहे. फिर्यादींच्या तक्रारीनुसार आरोपी अमजद सैयद, आवेश उर्फ मोन्या, इब्राहिम सैयद आणि गयास सैयद यांनी फिर्यादी व त्यांचे वडील यांना शेतात लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचा प्रकार घडला. या घटनेनंतर फिर्यादी मोईन सैयद यांनी आडगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास आडगाव पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अविनाश खैरनार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार शेख करीत आहेत.

### नाशिकमध्ये नोकरीच्या आमिषाने फसवणूक

**सिडको :** येथील वावरेनगर, खुटवडनगर भागात फसवणुकीची गंभीर घटना समोर आली आहे. प्रशांत केवळराव सूर्यवंशी (वय ४२, खासगी नोकरी) यांच्या फिर्यादीनुसार आरोपी माधुरी आभाळे आणि रोहिदास आभाळे यांनी नोकरीचे खोटे आश्वासन देऊन तब्बल १९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या फसवणुकीत आरोपींनी संगणकाच्या माध्यमातून फिर्यादी आणि त्यांच्या मित्रांना नोकरी देण्याचे वचन देऊन त्यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर फिर्यादींकडून वेगवेगळ्या तारखांना फोन पे, आरटीजीएस, रोख अशा विविध मार्गांनी १९ लाख रुपये घेतले. परंतु, या सर्व रकमेसाठी बनावट आणि खोटे नियुक्ती आदेश देऊन फिर्यादी व शासनाची फसवणूक केली. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक नितीन फुलपगारे करीत आहेत.



### इंदिरानगरला पोलीस आयुक्त आपल्या दारी उपक्रम

**सिडको :** शहर पोलीस आयुक्तालयाच्या पोलीस आयुक्त आपल्या दारी उपक्रम इंदिरानगर पोलीस ठाण्यातर्फे आनंदनगर पोलीस चौकी येथे पार पडला. या उपक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव उपस्थित होते. त्यांचा सत्कार सामाजिक कार्यकर्ते संजय नवले, भगवान दोंदे, अनिल गायकवाड आणि संघमित्रा बहुद्देशीय संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. इंदिरानगर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ महिला पोलीस निरीक्षक तृप्ती सोनावणे यांचा सत्कार ज्योती गायकवाड आणि सविता पवार यांनी महिलांच्या वतीने केला. या कार्यक्रमात परिसरातील नागरी समस्यांवर भर देत अनिल गायकवाड, ज्योती गायकवाड, माजी नगरसेवक भगवान दोंदे, संजय नवले, जोशी काका, भाऊसाहेब साळवे आणि मिलिंद बनसोडे यांनी आपल्या समस्या मांडल्या. यावेळी पोलिस उपायुक्त प्रशांत बच्छाव यांनी नागरिकांचे म्हणणे ऐकून घेत पोलीस विभागाला संबंधित सूचना दिल्या. तसेच नागरिकांशी विश्वासाचे बंध निर्माण होण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व स्पष्ट केले. पोलिस आयुक्त आपल्या दारी या उपक्रमातर्गत वरिष्ठ पोलीस निरीक्षक तृप्ती सोनावणे यांनी देखील परिसरातील अडचणी तत्काळ सोडविण्याची ग्वाही दिली. या कार्यक्रमात पोलीस उपनिरीक्षक संतोष शिरसाठ, पो.ह. अमोल मानकर, जाधव, गांगुर्डे यांसह जितेंद्र चोरडिया, गणेश ठाकूर (माहिती अधिकार कायदा जिल्हाध्यक्ष), देवीदास जगताप, नातवार भालेराव, सागर रामटेके, पदम पानपाटील, कैलास दोंदे, सविता पवार आदी उपस्थित होते.

### संजीवनगरमध्ये क्रिकेटवरून वाद; गुन्हा दाखल

**सिडको :** अंबड औद्योगिक वसाहतीतील संजीवनगर परिसरात असलेल्या संत शिरोमणी सावता माळी मैदानावर क्रिकेट खेळताना झालेल्या वादातून एका कुटुंबातील सदस्यांना लाथाबुक्क्यांनी आणि लाकडी दांडक्यांनी मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील फिर्यादी वसीम अनिस खान (वय २८, रा. भाग्यश्री किराणाजवळ, संजीवनगर, अंबड) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी सम्या (पूर्ण नाव माहीत नाही), अली रिजवान, रेहान शेख आणि मामुन शेख यांनी मैदानात क्रिकेट खेळताना झालेल्या किरकोळ वादातून त्यांच्या काका शकील खान, तैयब खान आणि रशीद खान यांनी बेदम मारहाण केली. सम्या याने लाकडी बॅटने, तर अली रिजवान याने लाकडी दांड्याने, तर इतर दोघांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गंभीर दुखापत केली. फिर्यादी वसीम खान हे भांडण सोडवण्यासाठी गेले असता त्यांनाही मारहाण करून तुमको हम देख लेंगे असे म्हणून अशी धमकी दिली. याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून, पुढील तपास पोलीस निरीक्षक मनोहर कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार चव्हाण करीत आहेत.




# पंचवटीत खून; दोन तासांत आरोपी पोलिसांच्या जाळ्यात

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**पंचवटीतील गाडगे महाराज पुलाजवळ बुधवारच्या आठवडे बाजार परिसरात घडलेल्या खळबळजनक खुनाच्या घटनेतील दोन आरोपींना अवघ्या दोन तासांत अटक करण्यात पंचवटी पोलिसांना यश आले आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, बुधवार, दि. २८ मे रोजी संध्याकाळी साडेसातच्या सुमारास गाडगे महाराज पुलाजवळील बाजारात भाजी खरेदीसाठी आलेले जगत रामविलासदास परदेशी व त्यांचा मुलगा नंदलाल ऊर्फ सूरजदास परदेशी (रा. सीतागुंफा, नाशिक, मूळ रा. बिहार) यांच्यावर चार अज्ञात तरुणांनी अचानक हल्ला केला. खिशातून पैसे काढण्याचा प्रयत्न करताना नंदलाल यांनी विरोध केला असता आरोपींनी शिवीगाळ करत मारहाण केली आणि त्यातील एकाने धारदार शस्त्राने नंदलाल यांच्या पोटात वार करत खून केला.

या घटनेनंतर तातडीने पंचवटी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपायुक्त किरणकुमार चव्हाण, सहायक आयुक्त पद्मजा बढे यांनी तातडीने आरोपींचा शोध घेऊन अटक करण्याचे आदेश दिले.



त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक मधुकर कड यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक विलास पडोळकर यांच्या नेतृत्वात विशेष पथक तयार करण्यात आले.

त्यानंतर पंचवटी पोलिसांनी तपास चक्रे फिरवत संशयित आरोपी साहिल ऊर्फ डोकोमो दशरथ गायकवाड (वय २०), शुभम ऊर्फ ब्लॅकी रामदास सोनवणे (वय २०) आणि दोन विधी संघर्षित बालके अवधूतवाडी, फुलेनगर परिसरात लपले असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी अवघ्या दोन तासांमध्ये सापळा रचून दोघा प्रमुख आरोपींना अटक केली.

या कारवाईत सहायक पोलीस निरीक्षक सुनील पवार, विलास पडोळकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक संपत जाधव, पोलीस हवालदार महेश नांदुर्डीकर, कैलास शिंदे, संदीप मालसाने, अमोल काळे, जयवंत लोणारे, कुणाल पचलोरे, अंकुश काळे, विनोद चितळकर, वैभव परदेशी, योगेश वायकंडे यांच्यासह अनेक पोलीस कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

## सातपूर औद्योगिक वसाहतीतील बिअर बारला अज्ञात व्यक्तींकडून आग

### परिसरात भीतीचे वातावरण

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सातपूर औद्योगिक वसाहतीतील कुमारा बिअर बारला २८ मे रोजी रात्रीच्या सुमारास अज्ञात इसमांनी ज्वलनशील रसायन टाकून पेटवून दिल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेचा सीसीटीव्ही फुटेज सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला असून, त्यात तीन युवक बारच्या परिसरात स्फोटक पदार्थ फेकून त्याला आग लावताना स्पष्टपणे दिसत आहेत.

या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. नागरिकांमध्ये भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. अग्निशमन दलाच्या वेळीच झालेल्या हस्तक्षेपामुळे मोठी हानी टळली असली तरी बारच्या बाह्य भागाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, ती कोणत्या कारणातून लावण्यात आली. याबाबत पोलीस विविध अंगांनी तपास करत आहेत.

दरम्यान, सातपूर पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून, त्यांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक पुरावे गोळा करण्यास सुरुवात केली आहे. गुन्हा गंभीर स्वरूपाचा असल्याने पोलीस अधिक चौकशी करत आहे. आरोपी लवकरच गजाआड केले जातील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

नाशिक शहरात अलीकडच्या काळात खून, दरोडे, चोरी, वाहने जाळणे आणि दुकानांवरील हल्ले अशा गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. सातपूरमधील ही घटना देखील या वाढत्या गुन्हेगारीचे चिंताजनक उदाहरण मानली जात आहे. त्यामुळे नागरिकांतून संताप व्यक्त होत असून, पोलिसांनी कठोर पावले उचलून दोषींवर त्वरित कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

## म्हसरूळ परिसरात ११ जणांच्या टोळीचा धुमाकूळ

### गंभीर मारहाण व लुटमारीचा प्रकार

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

म्हसरूळ येथील ओंकारनगर परिसरात कन्स्ट्रक्शन व्यावसायिक प्रदीप बाबूराव काकडे यांच्या सोसायटीच्या पार्किंगमध्ये मोटारसायकलवर आलेल्या १० ते १२ जणांच्या टोळीने कोयते, हॉकी स्टीक व दगडांच्या सहाय्याने चार वाहनांची तोडफोड केली. या हल्ल्यात दोन रहिवाशांना गंभीर मारहाण करून सुमारे ९० हजार रुपये किमतीची सोन्याची चेन जबरदस्तीने हिसकावली. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यातील फिर्यादी प्रदीप काकडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींनी पार्किंगमध्ये उभ्या असलेल्या महागड्या गाड्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान केले. यावेळी विरोध केल्यामुळे प्रदीप काकडे व विजय रावळ यांना हॉकी स्टीक व लाकडी दांडक्यांनी मारहाण करण्यात आली. आरोपींनी कोयत्याचा धाक दाखवत गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून घटनास्थळावरून पसार झाले. या प्रकरणी म्हसरूळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपी सोनू



धात्रक याच्यावर हत्या, शस्त्र बाळगणे व खुनाचा प्रयत्न असे ५ गंभीर गुन्हे दाखल आहेत. तर प्रिंस सहाणी व चेतन गायकवाड यांच्यावर २०२४ मध्ये गुन्हे दाखल आहेत. तर प्रणव मनेरे याच्यावर सध्या कोणतेही गुन्हे नाहीत. मात्र तोदेखील टोळीतील सक्रिय सदस्य आहे. दरम्यान, या घटनेनंतर पोलीस उपायुक्त प्रशांत बच्छाव, सहायक पोलीस आयुक्त पद्मजा बढे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक चिंतामण व पोलीस उपनिरीक्षक परदेशी, पोलीस उपनिरीक्षक पटारे यांनी घटनास्थळी भेट देऊन तपास पथक नेमले. या गंभीर गुन्ह्याच्या तपासासाठी स्वतंत्र गुन्हे शोध पथक तयार करण्यात आले आहे.


# अभोण्यात दुकानातून चोरी करणारे भामटे गजाआड

### चारचाकी वाहनासह आरोपी जेरबंद, एक फरार

**अभोणा : प्रतिनिधी**

येथे एका कृषी भांडार दुकानातून भामट्यांनी हातचलाखी दाखवत गल्ल्यातील सुमारे ७१ हजार ९५० रुपयांची रोकड चोरून नेली. पण सुदैवाने दुकान चालकाची सतर्कता व पोलिसांच्या तत्परतेमुळे चारचाकी वाहनासह चार भामटे जेरबंद झाले. एक फरार झाला. चोरलेली रक्कम हस्तगत करण्यात यश आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, अभोणा येथे खासगी कांदा मार्केटजवळ शिवसिद्ध ॲग्रो या दुकानात जाऊन दोन अज्ञात व्यक्तींनी पिकांवर फवारणीचे औषध मागितले. दुकान चालकास काउंटरपासून मागे नेत बोलण्यात गुंतवून ठेवले. तेव्हा बाहेर थांबलेल्या तिसऱ्या व्यक्तीने दुकानात प्रवेश घेऊन काउंटरच्या गल्ल्यातून सुमारे ७१ हजार ९५० रुपयांची रोख रक्कम चोरून नेली. मात्र, आधीच दुकानात आलेले दोघे भेंडीवर फवारणीचे औषध घेऊन बाहेर पडले. दुकान चालकाने गल्ला उघडला, तर त्यात पैसे नव्हते, चोरी झाल्याचे लक्षात आल्याने त्यांनी लगेच शेजारील



**अभोणा : चोरी प्रकरणातील चारचाकी वाहनासह पोलिसांच्या हाती लागलेले हेच ते चार भामटे. ( छाया : पद्मभूषण शहा )**

दुकानातील मित्रास सोबत घेऊन संशयित आरोपींची वॅगनर कार ज्या दिशेला गेली, त्या दिशेने शोधाशोध केली असता अभोणा गावातच एका चिकन शॉपजवळ ती वॅगनर कार उभी असलेली दिसून आली. तेथे जाऊन वाहनातील पाच भामट्यांकडे चोरीच्या पैशांबाबत विचारणा केली असता, दोघे जण पळून जाऊ लागले. तेव्हा या दोघांनी मिळून तिघांना तर स्थानिक लोकांनी एका भामट्यास पकडून ताब्यात घेतले. या गडबडीचा फायदा घेत एक भामटा मात्र पळून जाण्यात यशस्वी ठरला. या घटनेची माहिती मिळताच अभोणा पोलिसांनी चार लुटारू भामट्यांना ताब्यात घेतले.

दुकानचालक नीलेश देवमन गवळी (३०, रा. चापापाडा, विरशेत, ता. कळवण) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार संशयित आरोपी कुणाल राजेंद्र तमायची (३९, रा. केशवनगर, मुंडवा, पुणे), हिंदराज बलराम वाणी (२८, जे. ब्लॉक, ११३७, दिल्ली), अनिकेत हेमराज वाणी (२७, रा. मांजरी बु. स्मशानभूमीजवळ ता. हवेली, जि. पुणे), विक्रम सुनील भैसडे ( ३६, राजीव गांधीनगर, ता. हवेली, जि. पुणे) व फरार झालेला संदीप संजय साळुंखे (३०, रा. कुर्ला, मुंबई) या संशयित पाच भामट्यांविरोधात अभोणा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. संशयितांकडून चोरीस गेलेले ७१ हजार ९५० रुपये अशी पूर्ण रक्कम हस्तगत करण्यात आली. तसेच गुन्ह्यात वापरलेली वॅगनर मोटार कार ( क्र. एम.एच. १२ आर. टी. १२४१) जप्त करण्यात आली आहे. पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक यशवंतराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस उपनिरीक्षक ए. एम. गायकवाड करीत आहेत.

# पाथर्डीगाव घरफोडीतील चार आरोपी जेरबंद

### ९ तोळे सोने हस्तगत, इंदिरानगर पोलिसांची धडक कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

पाथर्डीगावात घरफोडी करून चोरलेले सोने आणि रोकड प्रकरणी इंदिरानगर पोलिसांनी मोठी कामगिरी करत चार आरोपींना अटक केली असून, त्यांच्याकडून सुमारे ९ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले आहेत.

याबाबत इंदिरानगर पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक संतोष फुंदे यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, संशयित आरोपी सिध्देश आडभाई (रा. सोनगाव, ता. निफाड) याला सायखेडा येथून अटक करण्यात आली. त्याची चौकशी केल्यानंतर त्याच्या सोबत चोरी करणारे किरण मुरादे, आदित्य गावले आणि तुषार गरुड या तीन साथीदारांची नावे पुढे आली.

पोलिसांनी तिघांनाही ताब्यात घेतले असून, चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली आहे.

या आरोपींनी दि. २ नोव्हेंबर २०२४ ते १८ जानेवारी २०२५ दरम्यान पाथर्डीगाव येथे घरफोडी करत सोन्याचे दागिने व रोकड चोरल्याचे उघड झाले.

आरोपींना न्यायालयात हजर केले असता दि. ३० मे २०२५ पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी कौशल्याने कामगिरी बजावली आहे.



पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, पोलीस उपआयुक्त मोनिका राऊत आणि सहाय्यक पोलीस आयुक्त शेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई पार पडली. वरिष्ठ महिला पोलीस निरीक्षक तृप्ती सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली इंदिरानगर गुन्हे शोध पथकाने तपास सुरू केला. सदर कारवाईत पोलिस नाईक पवन परदेशी, सागर कोळी, सौरभ माळी, सागर परदेशी, दीपक शिंदे, योगेश जाधव, प्रमोद कासुदे आणि चंद्रभान पाटील या गुन्हे शोध पथकाच्या अधिकारी व अंमलदारांनी सहभाग घेतला.

दरम्यान, याप्रकरणी पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक संतोष फुंदे हे करत आहेत.

## मेडिकल दुकानदाराच्या निष्काळजीपणामुळे मुलीचा मृत्यू

### आरोपीस १ वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील मातोश्रीनगर परिसरात असलेल्या एका मेडिकल स्टोअर्समध्ये असलेल्या डिप फ्रीजरच्या विद्युत प्रवाहामुळे १६ ऑक्टोबर २०२२ रोजी एका लहान मुलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली होती.

या घडलेल्या दुर्दैवी अपघातप्रकरणी 'फर्स्ट केअर फॉर्मा मेडिकल' या दुकानातील आरोपी प्रसन्न चंद्रशेखर सोनार (वय २१, रा. खोडे मळा, सिडको) यास दोषी ठरवत त्याला एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावण्यात आली आहे.

सदर प्रकरणात फिर्यादी विशाल अनिल कुलकर्णी हे त्यांची मुलगी ग्रिश्मा विशाल कुलकर्णी हिच्यासह औषध घेण्यासाठी फर्स्ट केअर फॉर्मा मेडिकल दुकानात गेले होते. त्या वेळी दुकानातील डिप फ्रीझरच्या तळाकडील वीजवाहक पत्र्याला स्पर्श झाल्याने ग्रिष्मा हिला जोरदार विद्युत शॉक बसून जागीच मृत्यू झाला होता. वीज निरीक्षकांच्या अहवालानुसार, हे एक विद्युतप्रणीत अपघाताचे प्रकरण ठरले असून, दुकानातील उपकरणे निष्काळजीपणे ठेवण्यात आल्याचे स्पष्ट झाले. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक एच. एस. पावरा यांनी अतिशय बारकाईने करून आरोपीविरुद्ध ठोस पुरावे न्यायालयात सादर केले. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाल्यानंतर अति. मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालय क्रमांक ०९, नाशिक येथे खटला चालवण्यात आला असून न्यायमूर्ती श्रीमती एम. बी. कुलकर्णी यांनी दोषी आरोपीस शिक्षा सुनावली.

या खटल्यात सहा. सरकारी अभियोक्ता फिरोज शेख यांनी प्रभावी युक्तिवाद केला. तसेच पोलीस दलातर्फे पैरवी अधिकारी पोना. जी. जी. बच्छाव, पोलिस अंमलदार अमित साळवे, व्ही. ओ. घुले यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

## पाकच्या निरपराधांवर बॉम्ब टाकण्याची भारताची संस्कृती नाही : आगाशे

**नाशिक : प्रतिनिधी**



**भारताने नुकतेच पाकिस्तानविरोधी 'ऑपरेशन सिंदूर' पार पाडले. पाकिस्तानचा आपण पूर्ण नायनाट करू, त्याला नेस्तनाबूत करू, परंतु ३० कोटी लोकांवर बॉम्ब टाकून निरपराध लोकांना मारण्याची भारताची परंपरा नाही. केवळ फेक नॅरेटिव्हमुळे युद्धाच्या भडक बातम्या ऐकायला मिळाल्या, असे प्रतिपादन निवृत्त कमांडर विनायक आगाशे यांनी केले.**

गोदाघाटावरील देवमामलेदार यशवंत महाराज पटांगणावर सुरू असलेल्या वसंत व्याख्यानमालेतील २९ वे पुष्प निवृत्त कमांडर विनायक आगाशे यांनी गुंफले, त्यावेळी ते बोलत होते.

स्व. रमेश केंगे स्मृतिप्रीत्यर्थ व्याख्यानात 'ऑपरेशन सिंदूर : पुढे काय' या विषयावर आगाशे बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर कुणाल कुलकर्णी, परीक्षित केंगे, कीर्ती कलामंदिरच्या संस्थापक रेखा नाडगौडा आदी उपस्थित होते. आगाशे पुढे म्हणाले की, पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ भारतीय पर्यटकांचा दुर्दैवी मृत्यू झाला. एप्रिलमध्ये झालेल्या या घटनेचे प्रत्युत्तर म्हणून भारताने ऑपरेशन सिंदूर राबवले आणि पाकिस्तानचे अनेक हवाई अड्डे उद्ध्वस्त केले. मात्र, ऑपरेशन सिंदूरनंतरही पाकिस्तान शांत बसणार नाही, त्यांची आजची शांतता वादळापूर्वीची आहे. त्यामुळे विश्वासघातकी परंपरा असलेल्या पाकिस्तानवर विश्वास ठेवता कामा नये. भारत-पाकिस्तान युद्धाबाबत अर्थात ऑपरेशन सिंदूरबाबत ज्या बातम्या प्रसारमाध्यमांनी समाजमाध्यमांवर पेरल्या त्या सर्व फेक नॅरेटिव्ह होत्या. लष्कर-ए-तोयबाने केलेल्या दहशतवादी हल्ल्याचे प्रत्युत्तर भारताने अत्यंत कणखरपणे दिले. सिंदूर ऑपरेशनमध्ये भारताची पाच विमाने पाकिस्तानने पाडली.

प्रारंभी स्व. रमेश केंगे यांच्या जीवनावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली. तसेच केंगे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आला. व्याख्याते कमांडर विनायक आगाशे यांचा व्याख्यानमालेच्या वतीने कुणाल कुलकर्णी यांनी तर परीक्षित केंगे यांचा नवनाथ तांबे, कुणाल कुलकर्णी यांचा कांतीलाल तातेड तसेच रेखा नाडगौडा यांचा दीपा बक्षी, आदिती पानसे यांनी सत्कार केला.

**आजचे व्याख्यान (शुक्रवार, दि. ३०)**

**स्व. अर्जुनसिंग बग्गा स्मृतिव्याख्यान - १) सुनील देवधर पुणे -विषय : पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर**

**२) पॉडकॉस्ट मैफल 'गीत गाता चल', सादरकर्ते-संगीतकार, गायक, संजय गिते व श्रावणी गिते, आरती शिरवाडकर, नीलेश सोनवणे आदी.**

## नायब तहसीलदार असल्याचे भासवून महिलेची फसवणूक

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नायब तहसीलदार असल्याचे भासवून एका महिलेची लग्नाचे आमिष दाखवून सुमारे पाच लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार आडगाव येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी आडगाव पोलीस ठाण्यात निनाद प्रविण कापुरे उर्फ निनाद विनय कापुरे (रा. साठेनगर, धरणगाव, जळगाव) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २६ ऑक्टोबर २०२४ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत बळी मंदिर, आडगाव येथे पीडित महिला दीप्ती समीर बोंदार्डे (वय ३८ वर्षे) यांच्याशी संपर्क साधून, आरोपीने आपल्याला पुण्यात नायब तहसीलदार पदावर पोस्टिंग मिळणार असून, त्यासाठी ७ लाख रुपयांची गरज असल्याचे सांगितले. सुरुवातीला पैसे देण्यास पीडिता अनुत्सुक होती. मात्र, आरोपीने सतत आग्रह करत त्यांचा विश्वास संपादन केला.

यावेळी पीडित महिलेने तब्बल ७ लाख रुपये आरोपीच्या खात्यात वर्ग केले. फिर्यादीला फसवणुकीची जाणीव झाल्यावर पोलिसांत धाव घेऊन तक्रार दाखल केली असता, पोलिसांना तपासादरम्यान आरोपीचे खरे नाव निनाद विनय कापुरे असल्याचे उघड झाले. तसेच तो नायब तहसीलदार नसून, त्याच्यावर याआधीच कोर्टाचे वॉरंटही निघाले असल्याचे पीडितेला समजले.

यानंतर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. यादरम्यान आरोपीने काही दिवसांपूर्वी २ लाख रुपये परत केले. परंतु उर्वरित ५ लाख रुपये अजूनही न दिल्याने फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# येवल्यात पावसाने कांद्याचे मोठे नुकसान

## तहसीलदार, कृषी अधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष भेट देत संयुक्त पाहणी

**येवला ; प्रतिनिधी**

तालुक्यात बेमोसमी पावसामुळे शेतकरी संकटात सापडला असून, पावसाने जोरदार बरसात केल्याने तसेच शेतात पाणी साठल्याने काढणीला आलेल्या कांद्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, तर तालुक्यातील ग्रामीण भागातील विहिरीचा कठडा ढासळल्याने दोन क्विंटल कांदे विहिरीत पडून नुकसान झाले. दरम्यान, तहसीलदार आबा महाजन आणि तालुका कृषी अधिकारी शुभम बेरड यांनी नुकसान झालेल्या ठिकाणी भेट देऊन संयुक्त पाहणी केली.



तालुक्यात दररोज पडणाऱ्या बेमोसमी पावसामुळे येवला शहरातील नागरिकांची तारांबळ उडाली. शहरातील सर्वच रस्ते जलमय झाले होते. तालुक्यातील महालखेडा, मुखेड, पाटोदा, कातरणी, विखरणी, पाटोदा, जळगाव नेऊर, एरंडगाव, नेऊरगाव, चिचोंडी आदी परिसरात जोरदार पाऊस पडला. देशमाने येथील शेतकरी बाबासाहेब आवटे यांचा दोन ट्रॉली कांदा विहिरीचा भराव ढासळल्याने विहिरीत पडून खराब झाला, तर भारम आणि परिसरात अवकाळी पावसामुळे बळीराजाचे मोठ्या प्रमाणावर कांदा पिकाचे नुकसान झाले आहे.

संततधार पावसामुळे हातातोंडाशी आलेला घास निघून गेला आहे. त्यामुळे शेतकरी राजा हवालदिल झाला आहे. पावसामुळे तालुक्यातील शेतकरी काशीनाथ जेजुरकर, विजय जेजुरकर, नवनाथ जेजुरकर, वाल्मीक सोनवणे, प्रवीण जेजुरकर, कैलास जेजुरकर, आसाराम जेजुरकर, धनाजी जेजुरकर, भूषण राऊत, अक्षय पगारे, संदीप जेजुरकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर कांद्याचे नुकसान झाले. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

### साठविलेला कांदा भिजला, पंचनामे सुरू

सोमठाण देश, निळखडे परिसरातील दत्तू बोराडे यांचा दीड एकर कांदा शेतात पाणी साठवून भिजून गेल्याने नुकसान झाले, तर विलास शिवराम कदम यांचा तीन एकर कांदा, महेश जालिंदर कदम चार एकर, लक्ष्मीबाई उमेश पगारे एक बिघा, सुनील नामदेव कदम तीन एकर, साईनाथ बळीराम पगारे एक एकर, अशोक गोपीनाथ कदम एक एकर कांदा आदी शेतकऱ्यांच्या शेतात अवकाळी पावसाचे पाणी साठल्याने कांदा पूर्ण वाया गेला आहे. परिसरात तलाठी आणि कृषी सहाय्यकांनी पाहणी करून पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे.

### शिव, गोई नदीला पूर

येवला तालुक्याच्या पूर्व व पश्चिम भागात जोरदार पाऊस झाल्याने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, तर गेल्या दोन दिवसांत झालेल्या पावसामुळे नदी–नाले वाहू लागले आहे. सोमठाण देश येथील शिव नदी व देशमाने येथील गोई नदीला पूर आला. महसूल व कृषी विभागाकडून नुकसान झालेल्या प्रत्येक शेतकऱ्याच्या शेतामध्ये जाऊन पाहणी करून सर्वांना नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी केली आहे.

# अभोण्यात पावसाळ्यात विकासकामांमुळे नाराजी

## चिखलाचे साम्राज्य, अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत



**अभोणा : प्रतिनिधी**

मॉन्सूनपूर्व अवकाळी पावसाने दोन तास मुसळधार बरसून अभोण्यात पाणी पाणी केल्याने जनजीवन विस्कळीत झाले. त्यातच जलजीवनाच्या नुकत्याच बुजलेल्या चाऱ्यांमध्ये चिखल झाल्याने त्यात टायर अडकल्याने अनेक वाहनधारकांची डोकेदुखी वाढली. ऐन पावसाच्या तोंडावर अशी विकास (?) कामे होत असल्याने लोकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

कळवण तालुक्यातील पश्चिम भागातील अभोणा व परिसरात चार दिवसांपासून ढगाळ वातावरण होते. मात्र, बुधवारी पहाटेच पूर्वेकडून पश्चिमेकडे काळेकुट्ट ढग वाहू लागले, सकाळी दहाला अंधार दाटून आले, सोसाट्याच्या वाऱ्यासह दोन तास चौफेर कोसळणाऱ्या मुसळधार पावसामुळे भयानकता वाढली होती. जनजीवन विस्कळीत झाले होते. गल्लीतील रस्ते जलमय झाले. जुन्या घरांना गळती लागली. भट्ट्यांवरील कच्च्या विटा भिजल्याने उत्पादकांचे मोठे नुकसान झाले. गावात नुकत्याच बुजविलेल्या जलजीवनच्या चाऱ्यांमध्ये चिखल झाल्याने ठिकठिकाणी टायर अडकून वाहनधारकांचे हाल झाले. सरदार पेठमध्ये काँक्रिटीकरणाचे कामासाठी रस्ते खोदून ठेवल्याने सर्वत्र चिखल झाल्याने व पाणी तुंबल्याने पादचाऱ्यांचे मोठे हाल होत आहे. सुरक्षेच्या दृष्टिकोनातून वीज वितरण कंपनीने वीजपुरवठा पाच तास बंद ठेवला होता.

### शेतकऱ्यांचे गणित चुकणार!

अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामावर संक्रांत आली. उशिरा लागवड झालेल्या शेतकऱ्यांचा कांदा काढणीला वेळ न मिळाल्याने तो जमिनीतच कुजला, तर काहींचा जमिनीवर काढून ठेवलेला कांदा भिजल्याने नुकसान झाले. आता सर्व भिस्त खरीप हंगामावर अवलंबून आहे. पेरणीपूर्व मशागतीच्या दिवसांत मॉन्सूनपूर्व अवकाळी पावसाने झोडपल्याने शेतांमध्ये पाणी तुंबले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे खरीप हंगामातील पिकांचे पूर्ण गणित चुकण्याची चिन्हे दिसत आहे.



**मुकणे : येथे काढणीयोग्य पण अवकाळी पावसामुळे शेतातच असलेले भुईमूग पीक. (छाया : प्रभाकर आवारी)**

# अवकाळी पावसामुळे उभी पिके सडली

## पिकांचे नुकसान, शेतकरी हवालदिल

**मुकणे : प्रतिनिधी**

पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसामुळे इगतपुरी तालुक्यातील शेतकरीवर्गाचे मोठे नुकसान झाले आहे. शेतातील पिकांची पूर्णतः नासाडी झाल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

गेल्या पंधरवड्यापासून सतत पाऊस बरसत असल्याने शेतातील काढणीयोग्य भुईमूग, सोयाबीन, बाजरी, बागायती टोमॅटो, वांगी, दोडका, गिलके आदी पिकांची नासाडी झाली आहे. सर्व पिके पावसामुळे काढता येईना व काही पिके काढल्यानंतर वाळवायचे कसे? असा प्रश्न असून, वेळेत काढणी न झाल्याने व पावसात असल्याने अनेक पिकांना शेतातच मोड फुटायला लागले आहे.

आता भातपिकाचा हंगाम तोंडावर असताना शेतातील पिके काढायची कशी व भातरोपांच्या पेरणीसाठी जागा करायच्या कशा, असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. बागायती पिकाला भाव न मिळाल्याने आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांवर आता अवकाळी पावसाने बेजार केले आहे. महागडी खते, ट्रॅक्टरने पेरणी, शेतमजूर व लागवडीसाठी लागणाऱ्या खर्चाने आधीच पैसे गुंतवून कसेबसे पिके पिकवली. मात्र, काढणीयोग्य हंगामातच पावसाने हजेरी लावल्याने मेहनत वाया गेली. दरम्यान, अवकाळी पावसाने मोठे नुकसान झाले असताना, स्थानिक लोकप्रतिनिधी किंवा नेत्यांकडून यावर कुठलीही पाहणी किंवा काही शब्दही उच्चारला जात नसल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे.

# अवकाळी पावसामुळे भाजीपाल्याची नासाडी

## लासलगाव भाजीमंडईत आवक घटल्याने भाव वाढले

**लासलगाव : वार्ताहर**

लासलगासह परिसरातील गावांत गेल्या पंधरा दिवसांपासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाने कांदा पिकासह पालेभाज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. लासलगावच्या भाजीमंडईत भाजीपाल्याची आवक घटली असून, मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी असल्याने दरांमध्ये वाढ झाली आहे. याचा फटका थेट सर्वसामान्य नागरिकांसह शेतकऱ्यांनाही बसत आहे.



काही दिवसांपूर्वी अगदी पाच ते दहा रुपयांवर आलेली कोथिंबिरीची मोठी जुडी आता २० ते २५ रुपयांवर गेली आहे. याचबरोबर मेथी, पालक आणि शेपूची मोठी जुडी १५ ते २० रुपयांना मिळत आहे. इतर पालेभाज्यांच्या दरातही वाढ झाली आहे. पावसामुळे शेतात पाणी साचल्याने भाजीपाला काढणेही कठीण झाल्याने तो सडत आहे. मे महिन्यापासूनच भाजीपाल्याची आवक घटण्यास सुरुवात झाली होती. त्यातच आता अवकाळी पावसाने भर घातल्याने परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. बाजारात भाजीपाल्याची आवक कमी झाल्याने व्यापारी चढ्या दराने विक्री करत आहेत. परिणामी गृहिणींचे महिन्याचे बजेट कोलमडले आहे. अवकाळी पावसाचा हा फटका शेतकरी आणि ग्राहक या दोघांनाही सोसावा लागत आहे.

# अवकाळी पावसामुळे शेतीची कामे खोळंबली

**लासलगाव : वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून लासलगावसह परिसरातील गावांत अवकाळी पावसाने जोरदार हजेरी लावली. पावसाचे पाणी शेतात साचून राहत असून, खरीपपूर्व मशागतीची कामे खोळंबली असल्याने शेतकरी हवालदिल झाला आहे. पावसामुळे शेतजमिनी पाण्याखाली असून, पेरणीपूर्व मशागतीची कामे थांबवावी लागली.



गेल्या काही दिवसांपासून बदलत्या हवामानामुळे शेतीला मोठा फटका बसला. अवेळी पावसामुळे शेतीव्यवसायाचे नियोजन कोलमडले आहे. नांगरणी, मशागत आणि पेरण्या खोळंबल्या आहेत. पेरणीसाठी आवश्यक असलेली मशागत करणे अशक्य झाले आहे. पावसाचे पाणी शेतात साचून राहिल्याने शेतकरी हताश झाला आहे. अवकाळी पावसाने कांदा पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. भाजीपाला केलेल्या शेतकऱ्यांचादेखील हातातोंडाशी आलेला घास हिसकावला. राज्य शासनाने नुकसानग्रस्त भागाची पाहणी करून पंचनामे करावेत, नुकसानभरपाईची प्रक्रिया सुरू करावी, अशी मागणी आहे.

> फ्लॉवर व कोबी लागवड करण्यासाठी मी २० गुंठे क्षेत्र मशागत करून तयार केलेले होते. मात्र, बुधवारी सकाळी झालेल्या मुसळधार पावसामुळे माझ्या शेतात पाणीच पाणी झाल्यामुळे आता फ्लॉवर व कोबीची लागवड करता येणार नाही. आम्ही वारंवार नैसर्गिक आपत्तीचा सामना करतो आहोत.
>
> **- सुनील गवळी, शेतकरी, ब्राह्मणगाव-विंचूर**

### सायकल राइडद्वारे सावरकरांना अभिवादन

**निफाड : तालुका प्रतिनिधी**

निफाड सायकलिस्टतर्फे स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या जयंतीनिमित्त निफाड ते सावरकरांचे जन्मगाव व मामाचे गाव कोठुरे येथे सायकल राइडचे आयोजन केले होते. स्वातंत्र्यवीर सावरकरांचे मामाचे गाव कोठुरे येथे माधवराव गिते यांनी पुरातन वास्तूचे नूतनीकरण केलेले असून, त्या ठिकाणी प्रतिमापूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कोठुरे येथील सुयोग गिते यांनी सावरकरांचे पूर्वज घराणे याबद्दलची माहिती दिली. सावरकर यांचे कोठुरे गावातील वास्तव्याबाबत आठवणींना उजाळा देण्यात आला. याप्रसंगी सुयोग गिते, ज्ञानेश्वर मोगल, प्रताप मोगल, बाळासाहेब जाधव, सुनील मुळे, प्रकाश मोगल, मोहन चांदोरे, शरद पवार, रामकृष्ण वाळुंज, विशाल कदम, उत्तम पगार, सुनील डोंगरे आदी ग्रामस्थ, तसेच निफाड सायकलिस्टचे प्रवीण तनपुरे, संदीप गवळी, राजाभाऊ गवळे, अथर्व नकाते, दीपक बोरसे आदी सायकलिस्ट उपस्थित होते.

# शेतकऱ्यांचा कांदा मध्यस्थांशिवाय विक्री होणार

## राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचा उपक्रम

**लासलगाव : वार्ताहर**

गेल्या काही दिवसांपासून कांद्याच्या बाजारभावात घसरण होत असल्यामुळे कांदा उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत आहे, तर दुसरीकडे राज्यात अवकाळी पावसाने थैमान घातल्यामुळे सर्वांत जास्त नुकसान कांदा पिकाचे झाल्यामुळे कांदा उत्पादक शेतकरी हैराण झाले आहे.



या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांचा कांदा थेट विक्री करण्याचे नियोजन केल्याची माहिती राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भरत दिघोळे यांनी दिली आहे. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना थोडा दिलासा मिळण्याची शक्यता असल्याचे दिघोळे यांनी सांगितले आहे. महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या माध्यमातून राज्यातील सर्व लहान -मोठ्या शहरांसह भारतातील सर्व राज्यांमध्ये कांद्याची मागणी आहे, अशा वेगवेगळ्या ठिकाणी थेट कांदा विक्री व्यवस्था उभारण्याची पूर्वतयारी संघटनेने सुरू केली आहे. प्रायोगिक तत्त्वावर पुणे, मुंबई आणि दिल्ली येथे महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक शेतकरी संघटनेच्या माध्यमातून थेट शेतकऱ्यांचा कांदा कोणत्याही मध्यस्थांशिवाय विक्री करण्याचे नियोजन केले आहे. राज्यातील जे जे शेतकरी थेट कांदा विक्री करण्यास उत्सुक असतील, त्यांनी कांदा संघटनेचा ७७९८१८६४८७ हा नंबर 'कांदा संघटना' या नावाने सेव्ह करून याच नंबरवर आपली संपूर्ण माहिती व्हॉट्सअॅप मेसेज करून पाठवावी, असे आवाहन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केले आहे. थेट विक्रीचे जाळे निर्माण केल्यास देशातील व देशाबाहेरील ग्राहकांना हवा असलेला कांदा शेतकऱ्यांना उत्पादन खर्चापेक्षा अधिक दराने विकणे सोपे होणार असल्याचे दिघोळे यांनी सांगितले.

## महत्त्वाचे



### चांदवडच्या सुनील ठाकरेंना राज्य शासनातर्फे पुरस्कार

**काजीसांगवी : वार्ताहर** राज्य शासनातर्फे देण्यात येणाऱ्या गुणवंत अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण सोहळा मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये पार पडला. त्यात नाशिक जिल्ह्यातील चांदवड पंचायत समितीच्या शिक्षण विभागातील कनिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत सुनील शांताराम ठाकरे यांना गुणवंत अधिकारी व कर्मचारी पुरस्कार प्रदान करण्यात आला. जिल्ह्यातून हा एकमेव कर्मचारी या पुरस्कारासाठी पात्र झाला. हा पुरस्कार वितरण सोहळा राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री जयकुमार गोरे, मंत्री मंगल प्रभात लोढा, राज्यमंत्री योगेश कदम, खासदार अरविंद सावंत, मुख्य सचिव सुजाता सौनिक, प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीमध्ये पार पडला.

### मेंढपाळांना मारहाण; तिघांना पोलीस कोठडी

**वणी : प्रतिनिधी** मेंढपाळांना मारहाण करणाऱ्या तिघांची पोलीस कोठडीत रवानगी केली असून, अल्पवयीन संशयिताची बालसुधारगृहात रवानगी केली आहे. दिंडोरी तालुक्यातील भोकरपाडा येथे शेळ्या-मेंढ्या चोरण्याच्या उद्देशाने आलेल्यांना अज्ञातांनी मारहाण केली. त्यात चार जण जखमी झाले असून, त्यांच्यावर वणी ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे. नांदगाव तालुक्यातील मेंढपाळ भोकरपाडामधील मोकळ्या जागेत तात्पुरत्या स्वरूपात वस्ती करून राहात आहेत. रविवारी रात्री पिकअप वाहनातून आलेल्या सहा जणांनी त्यांच्यावर हल्ला करीत मेंढ्या पळविण्याचा प्रयत्न केला. त्यांना विरोध केला असता, दुर्योधन वाघमोडे (३०), श्रावण वाघमोडे (३४), बाळा वाघमोडे (१९) आणि ताराबाई शिंदे (२८, सर्व रा. दहेगाव) यांना जबर मारहाण करण्यात आली. वणी पोलिसांनी घटनेची चौकशी करून सोमवारी (दि. २६) रात्री गुन्हा नोंदवला. श्रावण वाघमोडे यांनी सहा जणांविरोधात फिर्याद दिली. पोलीस उपनिरीक्षक गणेश कुटे यांनी तपासाला गती दिली. पोलीस पथकाने टिटवे गाव गाठत चौघा संशयितांना ताब्यात घेतले. तिघांना अटक केली असून, अन्य दोन संशयित अद्याप फरार आहेत. समाधान कोकाटे (२५), आदेश वटाणे (१९), रमेश वटाणे (२५, सर्व रा. टिटवे, ता. दिंडोरी) या संशयितांना मंगळवारी (दि. २७) न्यायालयात हजर केले. संशयितांना पोलीस कोठडी सुनावली आहे.

### मालेगाव मनपात महाराणा प्रतापसिंह जयंती

**मालेगाव : प्रतिनिधी** येथील महापालिकेत महाराणा प्रतापसिंह यांची जयंती मनपा मुख्यालयात साजरी झाली. उपायुक्त गणेश शिंदे व लेखाधिकारी हरीश डिंबर यांच्या हस्ते महाराणा प्रतापसिंह यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाप्रसंगी आरोग्याधिकारी डॉ. जयश्री आहेर, जनसंपर्क अधिकारी पंकज सोनवणे, संकिर्ण कर अधीक्षक रमाकांत धामणे, वरिष्ठ लिपिक गणेश हळदे, जयवंत पाटील, वैद्यकीय अधिकारी डॉ. अलका भावसार, लिपिक अनिल सांगळे, केदा भामरे, सईद शेख, पंकज देवरे, अमोल येवले, सचिन मार्तंड, सनी पवार, भुषण गुरव, दत्तू घुगे, अजय बाविस्कर, अविनाश वाघ, विशाल मोरे, सचिन पिंगळे, उदय आहिरे, अविनाश सोनजे, रोशन भालेराव, जयश्री देशमुख, मिस्बाह शेख, मनिषा पाडवी, निकिता देशमुख, रत्ना जाधव, माधुरी सावळे, कर्मचारी भगवान जाधव, प्रशांत देशावरे, कमलनयन धिवरे, अ.रज्जाक, सचिन मोरे, सिताराम तांबे, राकेश परदेशी, मयुर जाधव, सोमनाथ थोरात, मंगला खैरनार, उषा खैरनार, प्रतिभा गोसावी, गौरव पवार यांच्यासह मनपाचे विविध विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

### खा. संजय राऊत उत्तर महाराष्ट्र दौऱ्यावर

**मालेगाव : प्रतिनिधी** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे ज्येष्ठ नेते व खासदार संजय राऊत हे 'शिवसंपर्क अभियान' टप्पा २ अंतर्गत उत्तर महाराष्ट्र दौऱ्यावर येत आहेत. या दौऱ्यात ते जनतेशी संवाद साधून स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधणार असल्याची माहिती जिल्हाप्रमुख पवन ठाकरे यांनी दिली. खासदार राऊत शनिवारी (दि.३१) सकाळी १० ला जळगाव येथे पत्रकारांशी संवाद साधतील. सकाळी १०.३० ला स्थानिक पदाधिकाऱ्यांची बैठक, सायंकाळी ६ वाजता धुळे येथे पदाधिकारी बैठक. रविवारी १ जूनला सकाळी १० ला धुळे येथे पत्रकारांशी संवाद. दुपारी ३ ला मालेगाव येथे पदाधिकारी बैठक होणार आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून शिवसेनेच्या संघटनात्मक बळकटीसह आगामी राजकीय दिशा ठरवण्याच्या दृष्टीने मार्गदर्शन करण्यात येणार असल्याचेही ठाकरे यांनी सांगितले.



### बाळापूर सोसायटीच्या चेअरमनपदी शिरसाठ

**येवला : प्रतिनिधी** तालुक्यातील बाळापूर येथील विविध कार्यकारी सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी रामकृष्ण शिरसाठ, तर व्हा. चेअरमनपदी समाधान शिरसाठ यांची बिनविरोध निवड करण्यात आली. बाळापूरच्या विकासाच्या दृष्टीने युवा नेते अंकुश शिरसाठ यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीचा खर्च टाळून सदस्यांच्या सहमतीने सदर निवड बिनविरोध करण्यात आली. याप्रसंगी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकार अधिकारी रवींद्र शेजवळ यांनी काम पाहिले. निवड प्रक्रिया पार पडल्यानंतर युवानेते अंकुश शिरसाठ यांनी नवनिर्वाचित चेअरमन रामकृष्ण शिरसाठ, तसेच व्हा. चेअरमन समाधान शिरसाठ यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी सोसायटीचे संचालक व सदस्य उपस्थित होते.

### चांदवडला स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

**काजीसांगवी : वार्ताहर** एसएनजेबी संचलित राष्ट्रीय सेवा योजना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, श्रीमान सुरेशदादा जैन औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची १४२ वी जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. प्राचार्य डॉ. डॉ. सी. डी. उपासनी यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्राचार्य डॉ. उपासनी यांनी सावरकरांचा जीवनपट विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यक्रम यशस्वितेसाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. भावेश अमृते यांनी परिश्रम घेतले. ग्रंथपाल विजय ठोके यांनी सूत्रसंचालन केले.

## निधन वार्ता

### भीमाबाई जगळे



**नाशिकरोड : वार्ताहर** जेलरोड ब्रह्मगिरी सोसायटीतील रहिवासी भीमाबाई मुरलीधर जगळे (८०) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात पाच विवाहित मुली, एक मुलगा, जावई, नातवंडे असा परिवार आहे. इंडिया सिक्युरिटी प्रेसमधील मोहन जगळे यांच्या त्या मातोश्री होत.

### रजिया बागवान



**इंदिरानगर :** येथील पापामिया मळ्यातील रहिवासी रजिया बहाउदिन पापामिया बागवान (७२) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, चार मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. त्या सामाजिक कार्यकर्ते इक्बाल आणि यासीन यांच्या मातोश्री होत.

# ने मजसी ने परत मातृभूमीला..सागरा प्राण तळमळला...

## स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांना शहरात अभिवादन

**नाशिक : प्रतिनिधी**

**कट्टर हिंदुत्ववादी, थोर देशभक्त स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची जयंती शहर आणि परिसरात साजरी करण्यात आली. यानिमित्त प्रतिमापूजनासह विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येऊन राष्ट्रभक्तीचा जागर करण्यात आला.**



## सावरकरांचे विचार प्रेरणादायी : नायर

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक हे स्वातंत्र्यलढ्यातील एक महत्त्वाचे केंद्र राहिले आहे. सावरकरांचे कार्य आणि विचार नाशिककरांना आजही प्रेरणा देतात. युवावर्गात राष्ट्रनिष्ठा व सामाजिक जागृती निर्माण करण्यासाठी अशा कार्यक्रमांचे आयोजन महत्त्वाचे ठरते, असे प्रतिपादन प्रभारी आयुक्त तथा प्रशासक करिष्मा नायर यांनी केले.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२ व्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेत अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमात मनपाचे प्रभारी आयुक्त तथा प्रशासक करिष्मा नायर व अतिरिक्त आयुक्त प्रदीप चौधरी यांनी सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्या बोलत होत्या. उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सावरकरांच्या देशभक्ती, क्रांतिकारी विचारसरणी व समाजसुधारणेच्या कार्याचे आदरपूर्वक स्मरण केले. कार्यक्रमात उपआयुक्त प्रशासन लक्ष्मीकांत साताळकर, कर उपआयुक्त अजित निकत, अतिक्रमण उपआयुक्त अश्विनी गायकवाड, शहर अभियंता संजय अग्रवाल, तसेच इतर विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाप्रसंगी कार्यकारी अभियंता सचिन जाधव, नरेंद्र शिंदे, नवनीत भामरे, संदेश शिंदे, रवींद्र पाटील, गणेश मैड, बाजीराव माळी, वैद्यकीय अधिकारी डॉ. तानाजी चव्हाण, सहाय्यक आयुक्त रमेश बहिरम, जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद, सुनील ठाकूर, योगेश आडभाई, संतोष चंद्रात्रे, संतोष कान्हे, वामन पवार, कृष्णा फडोळ, महेंद्र विभांडिक, संजय पटेल, मनीषा पाटेकर, अश्विनी ठाकरे, जिजा राऊत, शंकरराव पोरजे, साहेबराव भोसले, रमेश पागे, भरत जेऊघाले, दीपक बंदरे, यश बारगजे आदींसह मनपातील अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे नाशिक शहराशी विशेष नाते राहिले आहे. नाशिकच्या भूमीतूनच सावरकरांच्या क्रांतिकारी प्रवासाला दिशा मिळाली. त्यामुळे नाशिककरांच्या मनात सावरकरांविषयी अपार आदर आहे. त्यांच्या स्वदेशी, शौर्य आणि सामाजिक सुधारणांच्या भूमिकांचा वारसा पुढे नेण्यासाठी महापालिकेच्या आजच्या सावरकर जयंती अभिवादन कार्यक्रमामुळे उजाळा मिळाला.



## मित्रमेळा परिवारातर्फे अभिवादन

**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंती दिनानिमित्ताने नाशिकरोड येथील मित्रमेळा परिवार संघटनेतर्फे अभिवादन करण्यात आले.

यावेळी मित्रमेळा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र ताजने, माजी नगरसेविका डॉ. सीमा ताजने, शिवसेना उपमहानगरप्रमुख किरण डहाळे, संजय गायकवाड, विलास थोरात, रमेश पाळदे, अरुण निरगुडे, विलास चतुर, सदामामा चव्हाण, सागर वाकचौरे, गुड्डू शेख, अन्नू पुजारी, नैयुम खान, मंगेश पोरजे आदी उपस्थित होते.

## २१ किलोमीटर सायकलिंग करून सावरकरांना अभिवादन



**पंचवटी : वार्ताहर**

सॅटर्डे संडे सायकलिस्टकडून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांची जयंती २१ किलोमीटर सायकलिंग करून साजरी करण्यात आली.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यावर असलेले प्रेम व्यक्त करण्याकरिता सॅटर्डे संडे सायकलिस्ट ग्रुपच्या वतीने २१ किलोमीटर सायकलिंग करून त्यांना तपोवनातील स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान येथे जाऊन अभिवादन केले.

सकाळी अनंत कान्हेरे मैदानापासून राइडला सुरुवात झाली. तेथून जनार्दन स्वामी मठ, माडसांगवी येथील दत्त मंदिर करून सर्व सायकलिस्ट सावरकर उद्यानामध्ये आले. वंदे मातरम्, भारत माता की जय अशा घोषणांनी पूर्ण परिसर दुमदुमला होता. तसेच शनिवारी सकाळी ६ वाजता भगूरला सायकलने राइड ठेवली आहे. सध्या पंढरपूरची सायकलिंगची तयारी सुरू असून, भगूरची राइड ५० किलोमीटरची सगळे सॅटर्डे, संडेची सायकलिस्ट करणार आहेत. आणि विनायक दामोदर सावरकर यांना मानवंदना देणार आहे. यावेळी दत्तू टिळे, किशोर माने, कैलास बोराके, गवांदे, उल्हास कुलकर्णी उपस्थित होते. सॅटर्डे संडे ग्रुपकडून भगूरला जाण्यासाठी येत्या शनिवारी ३१ मे सर्वांनी अनंत कान्हेरे मैदानामध्ये उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



## सावरकर हे प्रखर हिंदुत्ववादी : बडगुजर

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर हे केवळ स्वातंत्र्यसैनिकच नव्हते, तर ते एक प्रखर हिंदुत्ववादी विचारवंत, कायदेपंडित, लेखक, समाजसुधारक आणि तत्त्वज्ञ होते. त्यांचे विचार आजच्या तरुण पिढीसाठी दीपस्तंभासारखे आहेत, असे मत शिवसेनेचे (ठाकरे गट) उपनेते सुधाकर बडगुजर यांनी व्यक्त केले.

सावतानगर येथील बसस्थानकाजवळील सावरकर सभागृहात स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात बडगुजर यांनी सावरकरांच्या कार्याचा मागोवा घेत उपस्थितांना त्यांच्या प्रेरणादायी जीवनाची ओळख करून दिली. बडगुजर म्हणाले, ब्रिटिश सत्तेच्या विरोधात लढताना सावरकरांनी काळ्या पाण्याची शिक्षा भोगली, मात्र, त्यांनी कधीही लाचारी पत्करली नाही. त्यांचे कार्य आणि विचार हे स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासातील तेजस्वी पर्व आहे. कार्यक्रमास रमेश जावरे, सुरेश होळकर, बाबाजी अहिरे, मधुकर कोकितकर, अनिल दुमणे, यशवंत गायकवाड, जगन्नाथ कुऱ्हे, भागवत राजोळे, विजय जाधव, युवराज भदाणे, वाल्मीक कदम, रामदास शिंदे, कांतीलाल मांडोळे, प्रकाश निकुंभ, भालचंद्र नेहरकर, हरिभाऊ आढाव, गोपीनाथ सोनवणे, राहुल पाटील, मदन जाधव, सुरेश भामरे, रवी सोनार, सविता कुंभार, नंदकुमार गोसावी आदींसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'आदिवासी विकास'तर्फे सावरकर यांना अभिवादन

**नाशिक : प्रतिनिधी**

आदिवासी विकास विभागाकडून स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

यावेळी अपर आयुक्त (मुख्यालय) दिनकर पावरा यांच्या हस्ते सावरकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. नाशिक एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाच्या शिक्षण विस्तार अधिकारी निर्मला सावंत यांनी सावरकरांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकला. यावेळी सहसंचालक (लेखा व कोषागारे) कपील पवार, उपायुक्त शशिकला अहिरराव, सहायक आयुक्त दिलीप खोकले, कृष्णा सूर्यवंशी, सुनील कायंदे, नितांत कांबळे, महामंडळाचे सागर पाटील यांच्यासह आदिवासी विकास आयुक्तालय, अपर आयुक्त व प्रकल्प अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, शबरी वित्त व विकास महामंडळ आदींचे अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.





## सावरकरांचे विचार तरुण पिढीच्या दृष्टीने प्रेरणादायक : आ. हिरे

**नाशिक : प्रतिनिधी**

स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांनी देशासाठी केलेला त्याग व त्यांचे विचार आजही तरुण पिढीच्या दृष्टीने प्रेरणादायक आहे, असे प्रतिपादन आमदार सीमाताई हिरे यांनी केले. नाशिक परिसर वृत्तपत्र लेखक संघाच्या वतीने स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. अशोक स्तंभाजवळील घारपुरे घाटाजवळील तिवारी महाल परिसरात स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी २६ जुलै १९३७ रोजी लावलेल्या कडुनिंबाच्या झाडाजवळ झाला. प्रमुख पाहुणे कसमादे मराठा उत्कर्ष सेवा संस्थेचे उपाध्यक्ष हिरामण सोनवणे होते. याप्रसंगी तिवारी महालाचे मालक योगेश तिवारी म्हणाले की, आमचे आजोबा किसनलाल तिवारी हे सावरकरांचे अनुयायी होते. स्वातंत्र्यवीर सावरकर हे त्यांच्या अनुयायांसमवेत चर्चा विनिमय करीत असत. आजोबांनी स्वातंत्र्यवीर सावरकर यांची आठवण राहावी म्हणून सावरकरांच्या हस्ते कडुनिंबाचे हे झाड लावले. या झाडाला अनेक नामवंत व्यक्तींनी भेट दिल्याचेही तिवारी यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वृत्तपत्र लेखक संघाचे अध्यक्ष रमेश कडलग यांनी केले. परिचय सरचिटणीस सुरेश बागुल यांनी करून दिला. खजिनदार भरत जैन यांनी आभार मानले. कार्यक्रमास तिवारी कुटुंबीय उपस्थित होते.

---

### महत्त्वाचे

**विजेच्या लपंडावामुळे मखमलाबाद परिसर त्रस्त**

**पंचवटी : वार्ताहर** गेल्या काही दिवसांपासून मखमलाबाद परिसरातील नागरिक विजेच्या लपंडावामुळे त्रस्त झाले आहेत. महावितरणच्या कामाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. काही दिवसांपासून पावसाने तसेच वादळी वाऱ्यांनी धुमाकूळ घातला आहे. शहर आणि परिसरातील अनेक ठिकाणी झाडेदेखील पडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यातच विजेचा लपंडावदेखील सुरू असल्यामुळे नागरिक हैराण झाले आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो कधी कमी तर कधी जास्त दाबाने येत आहे. पहाटेच्या सुमारास अगदी कमी दाबाने वीज सुरू होती. त्यामुळे घरातील वीज उपकरणे खराब झाल्याच्या घटनादेखील घडल्या असल्याचे परिसरातील नागरिकांनी सांगितले. याबाबत मखमलाबाद वीज वितरण कार्यालयाचे उपअभियंता मोरे यांच्याशी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क साधला असता त्यांचा फोनदेखील सतत व्यस्त लागत होता. त्यामुळे नागरिकांनी आपल्या विजेच्या समस्या कोणाकडे मांडायच्या, असा प्रश्नदेखील त्रस्त ग्राहकांनी उपस्थित केला.



**रेल्वे भुसावळ विभागात पर्यावरण जागृती रॅली**

**नाशिक रोड : विशेष प्रतिनिधी** रेल्वेच्या भुसावळ विभागात जागतिक पर्यावरण दिन साजरा केला जात आहे. त्याअंतर्गत नाशिक रोड रेल्वे स्थानकात जनजागृती रॅली काढण्यात आली. रेल्वे अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेतला. त्यांनी प्रवाशांना एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंबाबत जागरूक केले. प्लास्टिकच्या पिशव्या, बाटल्या आदींचे पर्यावरणावर होणारे हानिकारक परिणाम यांची माहिती दिली. प्लास्टिक वापर टाळावा, प्लास्टिक पिशव्यांऐवजी पुन्हा वापरता येणाऱ्या पिशव्यांचा वापर वाढवावा, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता. या उपक्रमांतर्गत विविध जागरूकता कार्यक्रम होत आहेत. प्लास्टिक प्रदूषण कमी करू या अभियानांतर्गत जनजागृती रॅली व व्याख्यान कार्यक्रम होत आहेत.

**प्रलंबित शिष्यवृत्ती अर्ज निकाली काढावेत : नांदगावकर**

**नाशिक : प्रतिनिधी** जिल्ह्यात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ चे महाविद्यालय स्तरावर प्रलंबित अर्ज निकाली काढण्यास अंतिम संधी देण्यात आली आहे. महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी महाविद्यालयस्तरावर विद्यार्थ्यांचे प्रलंबित शिष्यवृत्ती त्रुटींची पूर्तता करून त्वरित निकाली काढावेत, असे आवाहन समाजकल्याणचे सहायक आयुक्त देवीदास नांदगावकर यांनी कळविले आहे. महाविद्यालयांनी महाडीबीटी पोर्टलवर प्रलंबित शिष्यवृत्ती/ फ्रीशिप अर्जातील त्रुटींची पूर्तता परिपूर्ण करून सहायक आयुक्त कार्यालयाकडे सादर करावयाचे आहेत. महाविद्यालय स्तरावर अर्ज प्रलंबित राहून विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास, अशा महाविद्यालयाचे प्राचार्य जबाबदार राहतील, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

## चांदशीचा वीजप्रश्न कायमस्वरूपी सुटणार

### गोदापार्क उपकेंद्रातून स्वतंत्र वीजलाइन

**पंचवटी : वार्ताहर**

महावितरणचे गोदापार्क उपकेंद्र लवकरच कार्यान्वित होत असून, चांदशी परिसराला त्यामुळे स्वतंत्र वीजलाइन देण्यात येणार असल्याने या भागातील वीजप्रश्न कायमस्वरूपी सुटेल, अशी माहिती महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली. आनंदवली आणि मखमलाबादपासून अवघ्या हाकेच्या अंतरावर असलेल्या परंतु ग्रामीण भागात मोडणाऱ्या चांदशी परिसरात दाट लोकवस्ती आहे. नाशिक महानगराचे उपनगर म्हणूनच हा परिसर गणला जातो. सध्या मुंगसरा उपकेंद्रावरून या परिसराला विद्युत पुरवठा केला जातो. परंतु, विजेच्या सततच्या लपंडावाने या परिसरातील नागरिक त्रस्त झाले आहेत. मॉन्सूनपूर्व पावसाने घातलेल्या धुमाकुळाने गेल्या काही दिवसांपासून या परिसरातील वत्ती दीर्घकाळ गुल राहत असल्याने नागरिकांत संतापाचे वातावरण आहे. या पार्श्वभूमीवर गोदापार्क उपकेंद्रातून चांदशी परिसराला स्वतंत्र वीज लाइनचा फॉर्म्युला उपयुक्त ठरणार असल्याने लवकरात लवकर याची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे. तसेच उग्रह्या गटारीमुळे परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न अधिक बिकट बनला असून, त्यावर एनएमआरडीएने तातडीने उपाययोजना करावी. अशीही नागरिकांची मागणी आहे.

## मखमलाबाद विद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार



**पंचवटी : वार्ताहर**

मखमलाबाद येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, मखमलाबाद येथील एस.एस.सी. परीक्षेचा निकाल ९७ टक्के लागला. या परीक्षेसाठी विद्यालयातील ५३१ विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी ५१५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. १८६ विद्यार्थी विशेष प्रावीण्य श्रेणीत उत्तीर्ण झाले आहे. या गुणवंतांचा सत्कार व त्यांना गुणपत्रक वाटप करण्यात आले. यावेळी साई गजानन पवार, प्रथमेश बालाजी मुंडे, रोशनी सोमनाथ महाले, प्रेम भाऊसाहेब गवळी, अथर्व रविकांत झाल्टे तसेच ९० टक्क्यांवरील अशा एकूण १९ विद्यार्थ्यांचे मविप्र संचालक रमेश पिंगळे यांच्या हस्ते प्रमाणपत्र, गुलाबपुष्प देऊन अभिनंदन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर पालक -शिक्षक संघाचे उपाध्यक्ष वाळू काकड, स्कूल कमिटी सदस्य राजेंद्र ढबले, प्राचार्य संजय डेर्ले, उपप्राचार्या विमल रायते, पर्यवेक्षक सुनील पाटील, ज्युनिअर कॉलेज प्रमुख प्रा. विकास थोरात उपस्थित होते. मविप्र संचालक रमेश पिंगळे यांनी अध्यक्षीय भाषणात सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. प्रा. विकास थोरात यांनी ११ वी ऑनलाइन प्रवेशासंदर्भात मार्गदर्शन केले. ज्येष्ठ शिक्षिका दीपाली कोल्हे यांनी सूत्रसंचालन केले.

## दऱ्याई मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम निकृष्ट

### ठेकेदारावर कारवाईची दरी ग्रामस्थांची मागणी

**पंचवटी : वार्ताहर**

दरी (ता. जि. नाशिक) येथील महासिद्ध बाबा मंदिर ते दऱ्याई देवस्थान या तीन किलोमीटर रस्त्याच्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करून ठेकेदार व संबंधित अभियंता यांच्यावर कारवाई करावी, याबाबत दरी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

दरी परिसरामध्ये दरी गावची कुलदैवत असलेल्या दऱ्याई माता देवस्थानकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी ३ कोटी ५० लाख रुपये मंजूर करण्यात आले आहे. हा रस्ता साधारणतः तीन किलोमीटर लांब व तीन मीटर रुंदीचा सिमेंट रस्ता आहे. या रस्त्याचा वापर परिसरातील सर्व शेतकऱ्यांच्या शेतीमालाच्या दळणवळणासाठी तसेच येण्या-जाण्यासाठी महत्त्वाचा आहे. त्याचप्रमाणे जागृत दऱ्याई माता देवस्थान पर्यटन म्हणून मोठ्या प्रमाणात प्रसिद्ध आहे. या भागात वनराई, पाण्याचा धबधबा, पशुपक्षी व मोराच्या आवाजाने गजबजलेला परिसर दरवर्षी हजारो पर्यटकांना आकर्षित करीत आहे. परिसरामध्ये वर्षभर मोठ्या प्रमाणात पर्यटक व दऱ्याई दर्शनासाठी भाविक येत असतात. रस्त्यासाठी साडेतीन कोटींचा मोठा निधी मंजूर झालेला असताना रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे. नुकत्याच झालेल्या बेमोसमी पावसामुळे रस्त्यावरील सिमेंट निघून गेले आहे. रस्त्यावरील खडी बाहेर येऊन रस्त्याला बऱ्याच ठिकाणी तडे पडलेले आहेत. रस्त्याच्या दुतर्फा साइडपट्टी भरलेली नसल्यामुळे दोन ते तीन फूट खोल कडा आहे. त्यामुळे येणाऱ्या-जाणाऱ्या शेतकरी व पर्यटकांचे वारंवार अपघात होत आहे. रस्त्यामुळे भविष्यामध्ये मोठ्या प्रमाणात जीवितहानी होण्याचीदेखील दाट शक्यता आहे. त्यामुळे हा निकृष्ट दर्जाचा रस्ता करणाऱ्या ठेकेदार व सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता जबाबदार आहे. रस्ताकामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचेदेखील स्पष्टपणे निदर्शनास येत आहे. रस्त्याच्या गुणवत्तेचे तत्काळ परीक्षण करण्यात यावे, तसेच रस्ता अत्यंत गुणवत्ताहीन असल्यामुळे ठेकेदार व सार्वजनिक विभागाच्या अधिकाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्याचा आदेश करण्यात यावा, अशी मागणी त्र्यंबक कातड, अरुण दोंदे, दिनकर कातड, निवृत्ती पिंगळे, भारत पिंगळे, शिवराम धोंडगे, श्रीराम धोंडगे, हिरामण डेरिंगे, अमोल वाघ, साहेबराव धोंडगे, संतोष लोखंडे, संदीप निकम, हिरामण घाटोळ, गोकुळ धोंडगे, भास्कर पिंगळे, सतीश धोंडगे, किरण धोंडगे, योगेश कातड, सचिन पिंगळे, राहुल धोंडगे तसेच दरी व परिसरातील ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे केली आहे.



**दरीआईमाता मंदिर रस्त्यासंदर्भात जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित त्र्यंबक कातड, अरुण दोंदे, दिनकर कातड, भारत पिंगळे, शिवराम धोंडगे, संतोष लोखंडे, श्रीराम धोंडगे, संदीप निकम, हिरामण घाटोळ, राजेंद्र धोंडगे, अमोल वाघ, सतीश धोंडगे.**



▸▸ अभोण्यात चिखलाचे साम्राज्य, अवकाळी पावसामुळे जनजीवन विस्कळीत ▸▸ पान ६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



▸▸ पावसाने कांद्याचे नुकसान, अधिकाऱ्यांकडून पाहणी ▸▸ पान ६


■ gavakari.in ■ gavkarinews.com

■ नाशिक, शुक्रवार, दि. ३० मे २०२५


## संक्षिप्त ▸▸

### रविवारी गणेशबाबा प्रकट दिन सोहळा

**नाशिक :** येत्या एक जूनला संत गणेश महाराज यांचा नाशिक क्षेत्री आगमन होऊन ४८ वर्षे पूर्ण होत आहे. त्या प्रीत्यर्थ ४८वा प्रकट दिन सोहळा गणेशबाबा भक्त विविध धार्मिक कार्यक्रमासह मोठ्या उत्साहात साजरा करणार आहेत. नंदिनी नदी जवळील महामने पार्क गणेशबाबा मंदिर येथे हे कार्यक्रम होतील. १ जून १९७७ ज्येष्ठ षष्ठीला गणेशबाबा यांचे नाशिक क्षेत्री आगमन झाले. ते नाशिक तपोभूमीत प्रकट झालेत.



कारण बाबांचा पूर्वेतिहास आजपर्यंत अज्ञातच आहे. मात्र, बाबांनी नाशिकला आल्यापासून अनेक मंडळीस नामजपाची साधना देत अनेक यज्ञयाग साधकांकडून करवून घेतला. आध्यात्मिक जडणघडण करवून घेत साधकाचे जीवन समृद्ध केले. त्यानिमित्ताने तीन दिवसीय नामजप सोहळा व मुख्य दिवशी म्हणजेच रविवारी (दि.१) त्यांच्या समाधीस अभ्यंगस्नान, महारुद्राभिषेक,दुपारी नामजप समाप्ती, सायंकाळी शोभायात्रा व रात्री महाप्रसादाचे वाटप केले जाईल.अनेक संत-महंतांच्या उपस्थित मिरवणूक समापन व संत पूजा, महाआरती असा विधिवत कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, गणेश महाराज समाधी मंदिर ट्रस्ट व भक्त परिवार यांच्यातर्फे भाविकांनी उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### परशुराम भवनचे १ जूनला लोकार्पण

**नाशिक :** नाशिककरांची गरज ओळखून, गेल्या ९२ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या चित्तपावन ब्राह्मण संघाने 'परशुराम भवन' ही भव्य व आधुनिक इमारत नाशिकच्या मध्यवर्ती भागात उभारली आहे. या नूतन इमारतीमध्ये व्यावसायिक वापरासाठी जागा, समारंभासाठी स्वतंत्र बँक्वेट हॉल, वसतिगृहासाठी १० प्रशस्त खोल्या, संस्थेचे कार्यालय तसेच बेसमेंट पार्किंगपासून टेरेसपर्यंत लिफ्टची सुविधा व पॉवर बॅकअपसह इतर सर्व आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. या नव्या इमारतीचे लोकार्पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते, तसेच मंत्री गिरीश महाजन व नाशिकचे सर्व आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दिनांक १ जून रोजी दुपारी ३ वाजता गुरुदक्षिणा हॉल, बीवायके कॉलेज कॅम्पस, कॉलेज रोड, नाशिक येथे होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विजय साने व सचिव नितीन सहस्त्रबुद्धे यांनी केले आहे.

### जातेगावला सहा गोवंशांची सुटका

**बोलठाण :** नांदगाव तालुक्यातील जातेगाव शिवारातून छत्रपती संभाजीनगरकडे गोवंशांची अवैध वाहतूक करणारे पिकअप वाहन ( एम. एच. २० डी. इ. २८७५ ) पोलिसांनी पकडले. जातेगाव शिवारातून जनावरांचे वाहन अवैध प्रकारे जात असल्याचा काही स्थानिक तरुणांना संशय आला. सदर घटनेची पोलिसांना माहिती मिळताच पोलिस प्रशासनाने मोठ्या शिताफीने सदर वाहन पकडले. सदर वाहनाचा चालक आरोपी सनी अशोक दिवेकर (रा. देवगाव रंगारी) यास अटक करण्यात आली असून, संशयित आरोपी अण्णा काटे ताब्यात आहेत. तसेच मुख्य आरोपी रईस कुरेशी (रा. देवगाव रंगारी, जि. छत्रपती संभाजीनगर) हा फरार झाला. दोन गायी, दोन वासरे व दोन गोऱ्यांची अवैध वाहतूक करणारे वाहन ताब्यात घेऊन सहा गोवंशांची सुखरूप सुटका करण्यात आली असून, सदर घटनेबाबत गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरा सुरू झाली. पोलिस निरीक्षक प्रीतम चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार भास्कर बस्ते, पोलिस शिपाई परमेश्वर श्रीखंडे तपास करत आहेत.

# सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री घेणार संत-महंतांसोबत बैठक

## प्रशासन तयारीत व्यस्त; शाहीस्नानाच्या तारखांचीही घोषणा होणार

**नाशिक : प्रतिनिधी**

**आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस रविवारी नाशिकमध्ये संत-महंतांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेणार आहेत. या बैठकीत कुंभमेळ्याच्या तारखांची अधिकृत घोषणा केली जाणार असून, कुंभमेळा समन्वय समिती प्राधिकरणाची घोषणाही याच वेळी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**

संत-महंतांनी मुख्यमंत्र्यांना नाशिकला येण्याची मागणी सातत्याने केली होती. त्यास प्रतिसाद देत ही बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीसाठी नाशिकचे तीन आणि त्र्यंबकेश्वरचे दहा अशा तेरा आखाड्यांचे दोन-दोन प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. सर्व प्रतिनिधींनी आमंत्रण स्वीकारल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

बैठक दुपारी १२ ते २ या वेळेत होणार असली तरी, सिंहस्थाच्या नियोजनाबाबत संतांमध्ये विशेष उत्सुकता असून, आखाड्यांसाठी जागेचे वाटप, नियोजनातील भूमिका व व्यवस्थापनाचे स्वरूप या विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. यामुळे बैठक निर्धारित वेळेपेक्षा अधिक काळ चालण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, प्रथमच नाशिक व त्र्यंबकेश्वर येथील सर्व प्रमुख आखाड्यांचे प्रतिनिधी एकत्र येऊन जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्र्यांसोबत बैठकीस उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे कोणताही वाद अथवा गैरसमज टाळण्यासाठी प्रशासन सातत्याने संवाद साधत असून, बैठक निर्विघ्नपणे पार पाडण्यावर भर दिला जात आहे.

बैठकीदरम्यानच देशभरातून उपस्थित संत-महंतांसाठी महाराष्ट्रीयन पद्धतीच्या भोजनाची व्यवस्था जिल्हाधिकारी कार्यालयातच करण्यात आली आहे. नियोजन सभागृहातच जागेवर जेवण दिले जाणार असल्याची माहिती मिळाली आहे.

### मुख्यमंत्री करणार संतांचे स्वागत

विविध आखाड्यांचे प्रमुख या बैठकीला येणार असल्याने या संतांचे स्वागत स्वत: मुख्यमंत्री करणार आहेत. त्यामुळे बैठकीचा तासभर वेळ या सत्कार समारंभातच लागणार आहे.





### जिल्हाधिकारी कार्यालयाला येणार पोलीस छावणीचे स्वरूप

महंत त्रिकाल भवंता यांच्यासह अतिरिक्त संत–महंतांच्या प्रवेशावरून वाद होण्याची शक्यता लक्षात घेऊन जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाने कडक बंदोबस्त ठेवण्याची तयारी केली असून, निमंत्रणाशिवाय कोणालाच बैठकीला प्रवेश देण्यात येणार नसल्याने नाराजी वाढण्याची शक्यता आहे.

### महंत त्रिकाल भवंता काय भूमिका घेणार?

मागील सिंहस्थ कुंभमेळ्यात ग्यानदासजी महाराजांशी वाद घातलेला असल्याने यंदाच्या सिंहस्थात महिला आखाड्याला जागा देण्याची मागणी महंत त्रिकाल भवंता यांनी विभागीय महसूल आयुक्त व जिल्हाधिकाऱ्यांकडे केली होती. या पार्श्वभूमीवर रविवारच्या बैठकीला अचानक उपस्थित होऊन त्या मुख्यमंत्र्यांकडेदेखील ही मागणी करू शकतील. त्यामुळे प्रशासनाच्या चिंता वाढल्या आहेत.

### स्थानिक मंत्री व आमदारांचे काय?

मुख्यमंत्री कार्यालयाकडून मंजूर करण्यात आलेल्या प्रवेशांमुळे स्थानिक चार मंत्री, जिल्ह्यातील आमदारांच्या उपस्थितीवर अद्याप निर्णय झालेला नसल्याने स्थानिक नेतृत्वाचे काय? असा प्रश्न निर्माण होऊ लागलेला आहे. जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहाची क्षमता ५० जणांची असल्याने त्या ठिकाणी नेत्यांना कसे सामावून घ्यायचे, संत –महंतांचा मानपान कसा सांभाळायचा, याबद्दल प्रशासनावर मोठा ताण दिसून येत आहे.

# समितीने घेतली जि. प. बदल्यांची माहिती

## कर्मचाऱ्यांकडून निवेदने; अहवालाची प्रतीक्षा

**नाशिक : प्रतिनिधी**

नियमबाह्य बदल्यांविरोधात आक्रमक झालेल्या संघटनांनी चुकीच्या बदल्यांबाबत आक्षेप घेत विभागीय आयुक्तांना निवेदन देत चौकशीची मागणी केल्यानंतर नियुक्त केलेल्या चौकशी समितीने काल (दि.२९) जिल्हा परिषदेला भेट देत बदल्यांची संपूर्ण माहिती सामान्य प्रशासन विभागाकडून घेतली. समितीने जिल्हा परिषदेत भेट देत सर्व विभागांची चौकशी केली. यावेळी अनेक कर्मचाऱ्यांनी निवेदन देत आपल्या तक्रारी मांडल्या. समिती चौकशी अहवाल विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांना सादर करणार असून, त्यानंतर विभागीय आयुक्त या बदल्यांमध्ये जर अनियमितता झाली असेल तर काय निर्णय घेतात? याबद्दल कर्मचाऱ्यांत मोठी उत्सुकता आहे.

जिल्हा परिषद प्रशासनाने शासन आदेश डावलून केलेल्या बदल्यांबाबत दोन दिवसांचा अल्टिमेटम (दि.२८) देण्यात आला होता. याबाबत महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष उमेशचंद्र चिलबुले, उपाध्यक्ष कैलासचंद्र वाघचौरे यांनी पत्रकार परिषद घेत या बदल्यांमागे गौडबंगाल काय, असा सवाल प्रशासनाला केला होता. यावेळी जिल्हा परिषद नियमित बदली प्रक्रियेतील अनियमिततेविरोधात सर्व केडरच्या कर्मचारी संघटना एकवटल्या आहेत.

### मित्तल यांची प्रतीक्षा

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांच्या आगमनाची प्रतीक्षा केली जात आहे. पुढील आठवड्यात त्या रुजू झाल्यानंतर काय भूमिका घेतात, याकडे बदली करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना ८२ टक्के साड्यांचे वाटप पूर्ण

## इतर साड्यांचे वितरण सुरू

**नाशिक : प्रतिनिधी**

अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना मागील वर्षीपासून शासनाकडून शिधापत्रिकेवर मोफत साड्यांचे वाटप करण्यात येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनंतर पुरवठा विभागाकडून १ लाख ७६ हजार ९२४ लाभार्थ्यांच्या साड्यांच्या वाटपाला सुरुवात करण्यात आली होती. आतापर्यंत जिल्ह्यात ८२.८९ टक्के साड्यांचे वाटप पूर्ण झाले आहे. एकूण १ लाख ४६ हजार ६४५ लाभार्थ्यांना साड्यांचे वाटप करण्यात आले आहे तर अजून ३० हजार २७९ साड्यांचे वाटप बाकी आहे. नाशिक विभागात सर्वाधिक ९०.६७ टक्के साड्यांचे वाटप पूर्ण झाले आहे तर सर्वात कमी वाटप इगतपुरी तालुक्यात ७१.७४ टक्के साड्यांचे वाटप पूर्ण झाले आहे. लाडक्या बहिणींना सणानिमित्त साडीचोळी वाटप करण्याची पद्धत महायुती सरकारकडून सुरू करण्यात आला आहे.

रेशन दुकानांमार्फत प्रत्येक लाभार्थी कुटुंबास साड्यांचे वितरण करण्यात येत आहे. मागील वर्षीच आचारसंहितेमुळे वितरण थांबवण्यात आले होते. मागील वर्षी अंत्योदय शिधापत्रिकाधारकांना साड्या वाटपास सुरुवात झाल्यानंतर लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यानंतर साडी वितरण थांबवण्यात आले होते. त्यामुळे सुमारे ७५० लाभार्थ्यांना साडी मिळू शकली नव्हती. आचारसंहिता संपल्यानंतर उर्वरित साड्यांचे वाटप करण्यात आले.

मात्र, यंदा सर्व लाभार्थ्यांना सुरळीतपणे साड्यांचे वाटप करण्यात येणार आहे.



| तालुके | एकूण वाटप |
|---|---|
| बागलाण | ११४८७ |
| चांदवड | ५१६५ |
| देवळा | ४१०४ |
| दिंडोरी | ११७७५ |
| धाविअ मालेगाव | १४२१७ |
| धाविअ नाशिक | ९५७६ |
| इगतपुरी | ७७७७ |
| कळवण | ६९१५ |
| मालेगाव | ९५५१ |
| नांदगाव | ७१६३ |
| नाशिक | ७४६४ |
| निफाड | ९००४ |
| पेठ | ९५५४ |
| सिन्नर | ६३५६ |
| सुरगाणा | ११८७८ |
| त्र्यंबकेश्वर | ६६५९ |
| येवला | ७९०० |
| **एकूण** | **१४६६४५** |

# वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**नाशिक : प्रतिनिधी**

हवामान विभागाने पुढील २४ तासांत नाशिक जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता वर्तविली असून, सावधानातेचा इशारा देण्यात आला आहे.

सध्या जिल्ह्यात दिवसाचे किमान तापमान २३ डिग्री तर कमाल तापमान ३१ डिग्री असले तरी ढगाळ हवामानामुळे जिल्हावासीयांना प्रचंड उकाडा जाणवत आहे. गत महिन्याभरापासून नाशिक जिल्ह्यात अवकाळीने थैमान घातले आहे. अवकाळीने जिल्ह्यात सर्वत्र पीकपाण्याचे मोठे नुकसान झाले आहे. मे महिन्यात पारा चाळिशीपार पोहोचल्याने उकाडा असह्य होत होता. मात्र ७ मेपासून अवकाळीने दणका द्यायला सुरुवात केली. जिल्ह्यातील पंधरा तालुक्यांना झोडपून काढताना अवकाळीने बहुतांश शेतीपिके आणि फळपिकांना नष्ट केले. काढणीला आलेला कांदा अन् साठवणूक केलेला कांदाही यातून वाचू शकला नाही.

६ हजार ५७० हेक्टर क्षेत्राला फटका बसला आहे. वादळीवारे, अतिवृष्टी, अवेळी पावसाने शेतीपिकांचे आणि फळपिकांचे अतोनात नुकसान झाल्याने बळीराजा हवालदिल झाला आहे. शेतकऱ्यांना मदत मिळावी म्हणून नुकसानग्रस्त शेतीपिकांचे पंचनामे करण्याचे आदेश कृषिमंत्र्यांनी त्वरित दिले होते. त्यानुसार तालुका कृषी अधिकाऱ्यांनी पंधरा तालुक्यांतील नष्ट झालेल्या शेतीपिकांचा प्राथमिक अहवाल तयार करून कृषी विभागाच्या जिल्हा अधीक्षकांना सादर केला आहे. कृषी अधीक्षकांनी तो जिल्हा प्रशासनाला सादर केला.

हवामान विभागाने पुन्हा एकदा पुढील २४ तासांत वादळी वाऱ्यासह अवकाळी बरसण्याचा अंदाज वर्तविल्याने शेतकऱ्यांची धास्ती वाढली आहे. मॉन्सून १० जूनपर्यंत नाशिकमध्ये दस्तक देणार असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. त्याअगोदर अवकाळीने कहर केल्याने बळीराजा संकटात आहे.

नागरिकांनी कामाशिवाय घराबाहेर पडू नये, शेतकऱ्यांनी पशुधनाला सुरक्षित जागी हलवावे, विजांचा कडकडाट होत असताना शेतात जाऊ नये, मोकळ्या जागेत थांबू नये आदी सूचना हवामान विभागाकडून देण्यात आल्या आहेत.



**नाशिकरोड : वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांची सदिच्छा भेट घेत शिंदे गावचे सरपंच बाजीराव जाधव यांनी चर्चा केली. यावेळी सुनील बच्छाव, तानाजी गायकर, शरद कासार, सुनील गायधनी, नीलेश जाधव आदी. (छाया : सुनील पवार)**

# ओझरला आज पाणीपुरवठा नाही

**ओझर : वार्ताहर**

ओझरसह परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या पालखेड येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची पालखेड येथून पाणीपुरवठा करणारी रॉ-वॉटर वाहिनीला गळती लागल्याने दुरुस्तीचे काम सुरू आहे. शहरात शुक्रवारी (दि. ३०) पाणीपुरवठा होणार नाही, अशी माहिती नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाने दिली आहे. पालखेड येथे गळती झालेल्या रॉ-वॉटर वाहिनी दुरुस्तीच्या कामामुळे ओझरला शुक्रवारी होणारा पाणीपुरवठा शनिवारी (दि. ३१) करण्यात येईल, शनिवारी होणारा पाणीपुरवठा रविवारी (१ जून) करण्यात येईल. उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर करून नगर परिषदेस सहकार्य करावे, असे आवाहन नगर परिषदेने केले आहे.

# करंजखेड शिवारात तरुणाची आत्महत्या

**वणी : प्रतिनिधी**

करंजखेड (ता. दिंडोरी) येथील शेताच्या बांधावर गुरुदत्त बाळू गायकवाड (वय २४, रा. करंजखेड, ता. दिंडोरी) याने झाडाच्या फांदीला नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. त्यास वणी ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषित केले.

याबाबत वणी पोलिसांत गणेश बाळू गायकवाड (वय २२, रा. करंजखेड) याने माहिती दिली. शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. याबाबत वणी पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. सपोनि सुनील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार गायकवाड तपास करीत आहेत.

# पेठ औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रवेशप्रक्रिया सुरू

## बुरकुल : विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा

**नाशिक : प्रतिनिधी**

पेठ येथील कै. गंगाराम जानू आवारी गुरुजी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ऑगस्ट २०२५ साठी प्रवेशप्रक्रियेला सुरुवात झाली आहे. इच्छुक विद्यार्थ्यांसाठी अर्ज भरण्याची व निश्चिती प्रक्रिया सुरू असून, विविध कौशल्याभ्यासक्रमांसाठी प्रवेश उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन प्राचार्य सी. बी. बुरकुल यांनी केले आहे.

वीजतंत्री, तारतंत्री, मोटर मेकॅनिक, मेकॅनिक ऑटो इलेक्ट्रिकल इलेक्ट्रॉनिक्स, सुईंग टेक्नॉलॉजी, ड्रेस मेकिंग, जोडारी, संधाता, कोपा अशा व्यवसाय अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाते. केवळ व्यावसायिक कौशल्यासह विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सॉफ्ट स्किल ट्रेनिंग आणि उद्योजकता प्रशिक्षणाचाही समावेश संस्थेच्या अभ्यासक्रमात करण्यात आला आहे.

या संस्थेतून प्रशिक्षण घेऊन बाहेर पडलेले अनेक प्रशिक्षणार्थी महिंद्रा महिंद्रा, टाटा मोटर्स यांसारख्या नामांकित औद्योगिक आस्थापनांमध्ये यशस्वीरीत्या कार्यरत आहेत.

त्यामुळे ही एक सुवर्णसंधी असून, विद्यार्थ्यांनी या संधीचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे प्राचार्य सी. बी. बुरकुल व गटनिदेशक बोरसे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी व अर्ज भरण्यासाठी इच्छुकांनी संस्थेशी तत्काळ संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# अवकाळी पावसाने धरणांतील पातळी स्थिर


## जिल्ह्यातील धरणसमूहांत २५ टक्के पाणीसाठा

**नाशिक : प्रतिनिधी**

**अवकाळी पावसामुळे जिल्ह्यात असलेल्या काही जलाशयांच्या पातळीत वाढ झाली असली, तरी धरणांतील पाणीपातळी मात्र स्थिर असल्याचे चित्र आहे. अवकाळीमुळे पाणीटंचाईचा सामना करणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांना काही प्रमाणात दिलासा मिळाला आहे. गेल्या महिन्यात तापमान वाढल्याने बाष्पीभवन होऊन पाणीपातळीत मोठ्या प्रमाणात घट होत होती. मात्र, गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या अवकाळीमुळे धरणांतील पातळी स्थिर आहे.**

जिल्ह्यात सात मोठे प्रकल्प व १७ मध्यम प्रकल्प आहेत. यांतून जिल्हावासीयांची तहान भागवण्यात येते. पालखेड धरणसमूहात १२.७९ टक्के साठा होता. आता अवकाळीमुळे वाढ होऊन तो १२.९४ टक्के झाला आहे.

इतरत्र पाणीपातळी स्थिर आहे. जिल्ह्यातील धरणसमूहांत १६,४२१ दलघफू उपयुक्त पाणीसाठा आहे. नाशिक शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या गंगापूर धरणात ४५ टक्केसाठा आहे. त्यामुळे नाशिककरांवरील पाणीटंचाईचे संकट दूर झाले आहे.



### टँकर फेऱ्यांच्या संख्येत ४२ ने घट

उन्हाळ्यात जिल्ह्याच्या ग्रामीण भागात पाणीटंचाई जाणवत होती. मात्र, अवकाळी पावसाने जलाशयांच्या साठ्यात वाढ झाल्याने ३९० वर गेलेल्या टँकरफेऱ्यांत ४२ ने घट झाली आहे. आता जिल्ह्यातील ६०१ गावे–वाड्यांतील दोन लाख ८५ हजार १३८ लोकसंख्येला १५६ टँकरद्वारे ३४८ टँकरफेऱ्यांद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे.

### जिल्ह्यातील धरणांतील उपयुक्त पाणीसाठा

| धरणसमूह | उपयुक्त पाणीसाठा | टक्के |
|---|---|---|
| गंगापूर धरणसमूह | ३,२८८ | ३२.३४ टक्के |
| पालखेड धरणसमूह | १०७७ | १२.९४ |
| ओझरखेड धरणसमूह | ५०४ | १५.७१ |
| दारणा | ६०८८ | ३२.२१ |
| भोजापूर | ००० | ००० |
| गिरणा खोरे धरणसमूह | ५२९७ | २२.९७ |
| पुनंद | १६७ | ४२.६४ टक्के |
| **एकूण** | **१६,४२१** | **२५.०१ टक्के** |

### जिल्ह्यातील मोठ्या प्रकल्पांतील पाणीसाठा

| प्रकल्प | संख्या | क्षमता | उपयुक्त पाणीसाठा |
|---|---|---|---|
| मोठे प्रकल्प | ०७ | ४८,००४ | --- |
| मध्यम प्रकल्प | १७ | १७,६६० | --- |
| **एकूण** | **२४** | **६५,६६४** | **१६,४२१ (२५.०१ टक्के)** |



◂◂ शेअर बाजारात तेजी आणि घसरणीचे सत्र सुरूच ◂◂ पान ३

# नाशिक आज गांवकरी





◂◂ न्यू निस्सान मॅग्नाइट सीएनजी किटसह उपलब्ध ◂◂ पान ३

नाशिक, शुक्रवार, दि. ३० मे २०२५

## संक्षिप्त ▸▸

### नाशिक कलानिकेतन अध्यक्षपदी ॲड. भिडे



**नाशिक:** नाशिक कलानिकेतन संस्थेच्या अध्यक्षपदी ॲड. अविनाश भिडे यांची फेरनिवड झाली आहे. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पुढील ५ वर्षांसाठी कार्यकारिणीची निवड करण्यात आली. सभासदांनी सर्व कार्यकारिणीच्या सदस्यांची सर्वानुमते बिनविरोध निवड केली. त्यात अध्यक्ष ॲड. अविनाश भिडे, उपाध्यक्ष डॉ. विकास गोगटे, सचिव संध्या केळकर, सहसचिव आनंद ढाकीफळे आणि दीपक वर्मा, कोषाध्यक्ष प्रवीण बुरकुले यांची आणि ज्येष्ठ चित्रकार केशव मोरे, रामदास महाले, सोनार, सुनील धोपावकर, लासुरे, मुक्ता बालिगा, औरंगाबादकर, कुलकर्णी यांची सदस्य म्हणून निवड झाली. सभेस सोहनी, विक्रम वैशंपायन, रोकडे, राजा मोगल यांनी मार्गदर्शन केले. संस्थेच्या वतीने आगामी काळातही विद्यार्थ्यांसाठी विविध संवादसत्र, प्रदर्शन, चर्चासत्र, खुली चित्रकला स्पर्धा यांसारखे उपक्रम घेण्याचे निश्चित झाले आहे.

### रसिकांसाठी उद्या गाण्यांची मैफल

**नाशिक :** अफलातून म्युझिक



लव्हर्स व दीपक बिल्डर्स यांच्या संयुक्त विद्यमाने म्युझिकल वॉर्ड्स समारोह आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात सुमधुर गाणी, मिमिक्री आणि नृत्ये असा रंगारंग कार्यक्रम असणार आहे. शनिवारी दि.३१ रोजी सायंकाळी ५.३० वाजता कॉलेजरोडवरील गुरुदक्षिणा सभागृहात होणाऱ्या या कार्यक्रमात १५ महिन्यांपासून सुरू असलेल्या अफलातून म्युझिकल अवॉर्ड स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात येईल. या विनामूल्य सोहळ्याचे साक्षीदार होण्यासाठी नाशिककर रसिक श्रोत्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अफलातूनचे अध्यक्ष हरीशभाई ठक्कर व संयोजन समितीचे सदस्य प्रकाश गोसावी यांनी केले आहे. सुप्रसिद्ध निवेदक समीर देसाई सूत्रसंचालन करणार आहेत.

### परशुराम भवनचे १ जूनला लोकार्पण

**नाशिक :** नाशिककरांची गरज ओळखून गेल्या ९२ वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या चित्तपावन ब्राह्मण संघाने 'परशुराम भवन' ही भव्य व आधुनिक इमारत नाशिकच्या मध्यवर्ती भागात उभारली आहे. या नूतन इमारतीमध्ये व्यावसायिक वापरासाठी जागा, समारंभांसाठी स्वतंत्र बँक्वेट हॉल, वसतिगृहासाठी १० प्रशस्त खोल्या, संस्थेचे कार्यालय तसेच बेसमेंट पार्किंगपासून टेरेसपर्यंत लिफ्टची सुविधा व पॉवर बॅकअपसह इतर सर्व आधुनिक सोयीसुविधा उपलब्ध आहेत. या नव्या इमारतीचे लोकार्पण महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते, तसेच मंत्री गिरीश महाजन व नाशिकचे सर्व आमदार यांच्या प्रमुख उपस्थितीत रविवार दिनांक १ जून रोजी दुपारी ३ वाजता गुरुदक्षिणा हॉल, बीवायके कॉलेज कॅम्पस, कॉलेज रोड, नाशिक येथे होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष विजय साने व सचिव नितीन सहस्त्रबुद्धे यांनी केले आहे.

# १३७ कोटींच्या पुलांसाठी निधीचा ठणठणाट

## पालिकेची आर्थिक कोंडी, तर निविदा रद्दची नामुष्की

**नाशिक : प्रतिनिधी**

**सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पंधरा हजार कोटींच्या आराखड्यास अद्याप मंजुरी मिळत नसल्याने नियोजित कामांना ब्रेक लागण्याची भीती व्यक्त होत आहे. प्राधिकरणची वाट न पाहता महापालिकेच्या बांधकाम विभागाने सिंहस्थात भाविकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने असलेल्या आठ पुलांच्या उभारणीची निविदा प्रक्रिया सुरू केली आहे. पुलांच्या कामासाठी १३७ कोटींचा खर्च आहे. दरम्यान, या पुलांची कामे मार्गी लावण्यासाठी पालिकेकडे एवढा निधीच नसल्याचे चित्र आहे. निधीअभावी आर्थिक कोंडी झाल्याने या पुलांचे काम रखडण्याची शक्यता आहे.**



> **पूल उभारण्यासाठी महापालिकेने तयारी केली आहे. परंतु सर्व पुलांचे काम पालिका करू शकत नाही. आणि सद्यस्थित एवढा खर्च करणे शक्य नाही.**
> **-संजय अग्रवाल, शहर अभियंता**

गोदावरी, नंदिनी व वालदेवी, वाघाडीसह एकूण आठ पूल बांधण्याचे नियोजन केले होते. परंतु, आठही पुलांच्या उभारण्यासाठीचा खर्च मोठा आहे. त्यामुळे पालिकेची सात व पाच कोटी रकमेचे दोन पूल बांधण्याची क्षमता आहे. मात्र, उर्वरित सहा पूल बांधण्याचा खर्च सव्वाशे कोटींच्या पुढे जात आहे. तो आवाक्याबाहेर असल्याचे सांगितले जात आहे. सिंहस्थ प्राधिकरण स्थापन होत नसल्याने शहरातील पुलांची बांधणी कधी होणार? हा प्रश्न अनुत्तरीत असून, एका पुलाच्या कामासाठी साधारणत: दोन वर्षांचा कालावधी लागतो. सिंहस्थ कुंभमेळ्याचा अवधीच दोन वर्षांचा बाकी आहे. त्यामुळे प्राधिकरणाची स्थापना होऊन अत्यावश्यक कामे मार्गी कधी लागणार हे अधांतरीच आहे. सिंहस्थात दहा कोटी भाविक येणार असल्याने सुरक्षेच्या उपाययोजना म्हणून बांधकाम विभागाने ३७ पुलांचे स्ट्रक्चर ऑडिट सुरू केले आहे.

सिंहस्थात शहरात वाहतूक कोंडी न होता, भाविकांना सहजरीत्या चारही बाजूंनी बाहेर पडता यावे, यासाठी पुलांचे ऑडिट केले जाणार आहे. दरम्यान, एकीकडे पुलांचे स्ट्रक्चर ऑडिट होत असताना बांधकाम विभागाने सिंहस्थासाठी आठ पूल उभारणे आवश्यक असल्याचे सांगत त्याची निविदा प्रक्रिया राबवण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, या पुलांच्या कामाकरिता १३७ कोटींहून अधिक खर्च येणार आहे. निधी नसल्याने बांधकाम विभागाची गोची होऊन बसली आहे.

| प्रस्तावित पूल व अपेक्षित खर्च | |
|---|---|
| १) तपोवन पूल | ३५ कोटी ८९ लाख ६० हजार ८८६ |
| २) रामवाडी ते घारपुरे घाट | २४ कोटी ९१ लाख ९८ हजार ८०५ |
| ३) लक्ष्मीनारायण मंदिराजवळ | २० कोटी ९६ लाख ९६ हजार २४४ |
| ४) नंदिनी नदी मिलिंदनगर पूल | १९ कोटी २३ लाख ६ हजार |
| ५) वालदेवी नदीवरील वडनेर दुमाला पूल | १६ कोटी ८२ लाख ६० हजार |
| ६) गाडगे महाराज पूल | ११ कोटी ३५ लाख ११ हजार |
| ७) वाघाडी नदीवरील पूल | ७ कोटी १९ लाख ९९ हजार |
| ८) गाडगे महाराज पुलावर नव्याने रॅम्पचे काम | ५ कोटी ८५ लाख २२ हजार |



## निवृत्तिनाथ पालखी प्रस्थान सोहळ्याचे मुख्यमंत्र्यांना निमंत्रण

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

संतपरंपरेचा वैभवशाली वारसा लाभलेले संतश्रेष्ठ श्री निवृत्तिनाथ महाराज समाधी संस्थान, त्र्यंबकेश्वर यांच्या वतीने येत्या १० जून रोजी होणाऱ्या पालखी प्रस्थान सोहळ्याचे निमंत्रण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांना देण्यात आले. मुंबई येथील सह्याद्री अतिथीगृहात आषाढी वारी २०२५ च्या नियोजनपूर्व बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत राज्यातील सर्व मानाच्या दहा पालखी सोहळ्यांचे प्रमुख संस्थान सहभागी झाले होते. यावेळी संस्थानच्या वतीने पालखी व्यवस्थापनाशी संबंधित विविध मागण्या सादर करण्यात आल्या. मुख्यमंत्री फडणवीस व उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या मागण्यांचा सकारात्मक पाठपुरावा करत तत्काळ अंमलबजावणीसाठी संबंधितांना स्पष्ट सूचना दिल्या. यावेळी संस्थानच्या वतीने अध्यक्ष ॲड. सोमनाथ घोटेकर, पालखी सोहळाप्रमुख हभप नवनाथ महाराज गांगुर्डे, विश्वस्त नारायण मुठाळ यांनी प्रस्थान सोहळ्याचे अधिकृत निमंत्रण दिले.

# महावितरणची दिरंगाई; इलेक्ट्रिक बसचे स्वप्न भंगले

## पर्यावरणपूरक प्रवासाला आता पुढच्याच वर्षीचा मुहूर्त

**नाशिक : प्रतिनिधी**

शहरातील वाढते प्रदूषण पाहता आणि केंद्राकडून इंधन वाहनांऐवजी इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य दिले जात आहे. याच अनुषंगाने नाशिक महापालिकेला तब्बल शंभर इलेक्ट्रिक बस केंद्र शासनाकडून पीएम ई योजनेंतर्गत दिल्या जाणार आहे. पहिल्या टप्प्यातील पन्नास बस याच वर्षी शहरात दाखल होऊन नाशिककरांना पर्यावरणपूरक बसमधून प्रवास करणे शक्य होते. मात्र, महावितरणच्या आडमुठे धोरणामुळे ई-व्ही बसला थेट पुढच्या वर्षीचा मुहूर्त मिळणार आहे. आडगाव येथे डेपो उभारला जात असून, सदर काम अंतिम टप्प्यात आले आहे. मात्र, महावितरणकडून विद्युत पुरवठा होणे अपेक्षित होते. साडेचार कोटी रुपये देऊनही महावितरणने वेळीच काम सुरू न केल्याचा फटका मात्र यामुळे बसला आहे.

शहरात शंभर इलेक्ट्रिक बस येणार आहेत. सिटीलिंककडून डिझेलवर चालणाऱ्या पन्नास बसेसला ब्रेक देण्यात येणार आहे. यापूर्वी सिटीलिंकच्या ताफ्यात एनकॅप निधीतून इलेक्ट्रिक बस खरेदीसाठी प्रयत्न केले होते. परंतु त्यास अपयश आले. नंतर केंद्र सरकारच्या पीएम ई या योजनेंतर्गत नाशिक महापालिकेला पन्नास बस मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. नंतर ही संख्या शंभरवर गेली. आडगाव येथे सव्वाशे इलेक्ट्रिक बस थांबतील त्यादृष्टीने डेपो तयार केला जातो आहे. डेपोचे काम अंतिम टप्प्यात येऊनही महावितरणने डेपोत चार्जिंग युनिटसाठी लाइन टाकली नाही. त्यामुळे पहिल्या टप्प्यात ५० इलेक्ट्रिक बसेस खरेदीचा करार रखडला आहे.

चार्जिंग स्टेशनसाठी महावितरणला लाइन टाकण्यासाठी मनपाने चार कोटी अदा केले. परंतु त्यांनी अद्याप निविदा प्रक्रिया राबवली नसून, त्यामुळे बस खरेदीचा करार रखडला आहे. लाइन टाकण्यास चार ते सहा महिने कालावधी लागू शकतो. त्यामुळे या वर्षात तरी ई बसेस मिळण्याची चिन्हे पुसट असून, त्यास पुढील वर्ष उजाडू शकते. करार केल्यास भाडे अदा करावे लागेल.

मनपाने घाई करून बस खरेदी केल्यास त्या दिवसापासून संबंधित कंपनीला पैसे अदा करावे लागतील. महापालिका सिटीलिंकमार्फत नाशिककरांना बससेवा उपलब्ध करून देत असून, दोनशे सीएनजी व पन्नास डिझेल बसेसचा समावेश आहे. बसेससाठी ई डेपो तयार झाल्यावर केंद्राने नेमून दिलेल्या कंपनीसोबत करार करून पन्नास बसेस मनपाला मिळणार होत्या. त्यासाठी यांत्रिकी विभागाने आडगाव येथे ई डेपो उभारला असून, त्याचे काम अंतिम टप्प्यात आहे.




### तेव्हाच बस दाखल होणार

केंद्राकडून प्रति किलोमीटरमागे २५ रुपये अनुदान मिळणार असून, उर्वरित ४५ रुपये मनपाला अदा करावे लागतील. दरम्यान, चार्जिंग अवस्थेअभावी बस जागेवर धूळ खात उभ्या करत मक्तेदार कंपनीला पोसावे लागेल. त्यामुळे महावितरणने लाइन व चार्जिंग स्टेशनचे काम पूर्ण केल्यावरच बस खरेदी करार केला जाईल.

> **महावितरणने अद्याप लाइनचे काम हाती घेतले नसून, बस डेपोचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. काम पूर्ण होण्यास सहा महिने लागतील. त्यामुळे बस खरेदी करार रखडला आहे. महावितरणकडून काम पूर्ण होताच इलेक्ट्रिक बसचा मार्ग मोकळा होईल.**
> **-बाजीराव माळी, यांत्रिकी विभागप्रमुख, मनपा**

# जिल्ह्यात आरोग्य यंत्रणा सतर्क

## शल्यचिकित्सक : औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध

**नाशिक : प्रतिनिधी**

आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आरोग्य यंत्रणा सतर्क असून, जिल्ह्यातील रुग्णालयांमध्ये औषधांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, अशी माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे यांनी दिली.

जिल्हा शासकीय रुग्णालयात पाचशे खाटांची सुविधा आहे. याशिवाय, मालेगाव येथे सामान्य रुग्णालय व महिला रुग्णालय, कळवण, चांदवड, मनमाड, निफाड, येवला, त्र्यंबकेश्वर येथे उपजिल्हा रुग्णालय कार्यान्वित आहे. गिरणारे, दाभाडी, झोडगे, अभोणा, नांदगाव, लासलगाव, पिंपळगाव, सिन्नर, दोडी, नगरसूल, सटाणा, डांगसौंदाणे, नामपूर, देवळा, उमराणे, सुरगाणा, बाऱ्हे, इगतपुरी, घोटी, हरसूल, पेठ, दिंडोरी, वणी येथे प्रत्येकी ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यरत आहेत.

या रुग्णालयांमध्ये २४ तास वैद्यकीय सेवा उपलब्ध असते. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सर्व वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. १०८ रुग्णवाहिकेसह प्रत्येक ग्रामीण रुग्णालयात रुग्णवाहिका उपलब्ध आहे. याबरोबरच जिल्हा परिषदेचे प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रही आहेत. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शासकीय रुग्णालयांमध्ये किमान महिनाभर पुरतील एवढ्या औषधांचा साठा आहे.

आवश्यकता भासली तर स्थानिक पातळीवर औषधे खरेदी केली जातात. पावसाळ्यात काही वेळेस सर्पदंशाच्या घटना घडतात. प्रत्येक शासकीय रुग्णालयात सर्पदंश प्रतिबंधक लशी उपलब्ध करून दिलेल्या आहेत. तसेच सर्पदंश झाल्यास करावयाचे प्रथमोपचार याविषयी आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.



> **नागरिकांनी आरोग्याविषयी काही तक्रार असेल तर तत्काळ जवळच्या शासकीय रुग्णालयात जाऊन आरोग्याची तपासणी करून घ्यावी. तसेच पावसाळ्यात जलविकार उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही. या पार्श्वभूमीवर पाणी शुद्ध राहील, याची दक्षता घ्यावी. शक्यतो उकळून थंड केलेल्या पाण्याचा पिण्यासाठी वापर करावा.**
> **- डॉ. चारुदत्त शिंदे, जिल्हा शल्यचिकित्सक, नाशिक**

### झाडावर आढळली सहा फूट धामण



**नाशिकरोड : विशेष प्रतिनिधी**

येथील मुक्तिधामसमोर असलेल्या शिवम कॉम्प्लेक्सजवळील झाडावर सहा फूट धामण या जातीचा साप आढळला. मात्र, सर्पमित्राने सदर धामणला पकडल्याने नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

गुरुवारी दुपारी दोनच्या सुमारास शिवम कॉम्प्लेक्समध्ये मनसेचे ॲड. नितीन पंडित यांचे तिसऱ्या मजल्यावर ऑफिस आहे. या ऑफिसच्या बाजूलाच इमारतीजवळ उंबराचे झाड असून, या झाडावर एक सहा फुटी धामण नितीन पंडित यांच्या निदर्शनास आली. त्यांनी तातडीने सर्पमित्र सलमान शेख व त्यांचा साथीदार आदित्य जारास यांना माहिती दिली. त्यानंतर हे दोघेही सर्पमित्र तातडीने घटनास्थळी दाखल झाले. तोपर्यंत या ठिकाणी धामण बघण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी झाली होती. त्यानंतर सर्पमित्रांनी अतिशय कौशल्याने झाडावर चढून धामणला पकडले.

# मदत सोडा, आधी व्हिडिओ काढा!

## माणुसकी वाऱ्यावर, सामाजिक भावना कमी झाल्याचा प्रत्यय

**नाशिक : देवयानी सोनार**

**शहरातील इंदिरानगरची मद्यधुंद तरुणीची घटना असो वा गंगापूर रोडवरील नशेखोर जोडप्याचा वाद, सोशल मीडियावरील विविध अपघातांचे व्हिडिओ पाहून, संवेदना निर्माण होत अपघातग्रस्त व्यक्तीला मदत करण्याचे सोडून व्हिडिओ काढणाऱ्यांबद्दल मनात चीड निर्माण होते. मानवी संवेदना बोथट झाल्याचे हे निदर्शक आहे.**

सध्या रस्ते अपघात, रस्त्यावरची भांडणे, सशस्त्र हल्ला, नशेखोरांचा धिंगाणा, दोन गटांमधील हाणामारी, अशा एक ना अनेक घटना घडताना दिसतात. रस्त्याने जाणारे-येणारे थांबून आपल्या मोबाइलमध्ये या घटनेचे चित्रीकरण करून सोशल मीडियावर तत्काळ व्हायरल करण्यात धन्यता मानतात. पण, अपघातातील जखमीला वा हल्ला होत असेल तर अशा ठिकाणी मदत करण्याऐवजी उलट व्हिडिओ काढण्यात पुढे सरसावतात. हे समाजातील वास्तव चिंताजनक आहे.

सोशल मीडियामुळे लोकांना तिथे मी होतो हे दाखवायचे आणि व्ह्यूज व लाइक्स मिळवायचे, यासाठी काहींना तो क्षण व्हायरल करण्यात समाधान वाटते.

मदत न करण्याच्या कारणांत बऱ्याच वेळा लोकांना काय करावं, हेच माहीत नसतं. प्रथमोपचाराचे (फर्स्ट-एड) ज्ञान नसल्याने ते गोंधळतात आणि काहीच न करता बाजूला उभे राहतात. अपघात किंवा वादाच्या ठिकाणी मदत करण्यास जाणे म्हणजे पुढे पोलिसांचा ससेमिरा लावून घेणे, कोर्टकचेऱ्यांत कोण वेळ घालवेल, असा विचार केला जातो. सशस्त्र हल्ल्याच्या ठिकाणी जीवाच्या भीतीमुळे मदत केली जात नाही किंवा गुंड प्रवृत्तीच्या लोकांनी पुढे आपल्यावर सूड उगवू नये, हाही हेतू असतो. त्यामुळे मदत केली जात नाही. याशिवाय, पोलिसांना मदतीसाठी पुढे आलेल्यांना त्रास देणे किंवा गुन्हेगाराला पकडून काही वेळात सोडून दिले जाते, अशा घटनाही घडतात.

त्यामुळे आपल्याला काय करायचं, ही भावना समाजात रुजत जाते. अनेकांना वाटते, आपण नाही तर दुसरे कोणी मदत करेल, हे संवेदनशीलता कमी झाल्याचे लक्षण आहे. म्हणून आपल्या जवळचा नसेल तर मदत करायला कुणी पुढे येत नाही. निरपराध लोकांचा बळी जाऊ नये म्हणून मदतीला पुढे येणाऱ्यांना संरक्षण व सन्मान मिळायला हवा. गुंड समारिटन कायद्याची मदत घ्यावी. प्रशासनानेही मदत करणाऱ्यांना त्रास देण्याऐवजी त्यांचे कौतुक करायला हवे.



### आपण काय करू शकतो!

- **प्रथमोपचार (फर्स्ट-एड), सीपीआर, तत्काळ मदत, पोलीस, रुग्णवाहिकांना कॉल करून मदत मिळवता येऊ शकते.**
- **शाळा, कॉलेज, संस्थांतून मदत प्रशिक्षण द्यायला हवे.**
- **मदत करणाऱ्या व्यक्तीला संरक्षण देणारे कायद्यांबाबत जनजागृती.**
- **शाळेत, घरात लहानपणापासूनच दुसऱ्याच्या दु:खात सहभागी होण्याची शिकवण द्यावी.**
- **सोशल मीडियाचा वापर जबाबदारीने करणे. संकटात व्हिडिओ काढण्यासाठी नव्हे, तर मदतीसाठी पोलीस, रुग्णवाहिकेला फोन करणे, हे शिकवायला हवे.**

### मदत न करण्याची कारणे

- **पोलीस आणि कोर्टाचा त्रास.**
- **पोलीस यंत्रणेवरचा अविश्वास.**
- **सामाजिक भावना कमी होणे.**
- **प्रशिक्षणाची कमतरता.**
- **सोशल मीडियावर घटनेचा व्हिडिओ व्हायरल करून व्ह्यूज व लाइक्स मिळवायची घाई.**

> मदतीसाठी समोरची परिस्थिती पाहिल्यावर काय करावे, हे लवकर लक्षात येत नाही. घटनेतील व्यक्ती आपल्या जवळची नाही, मला काय त्याचे, असा विचार केला जातो. प्रथमोपचार, सीपीआर, तत्काळ मदत, पोलीस, रुग्णवाहिकेला फोन करून मदत मिळवता येऊ शकते. मदत प्रशिक्षण शाळा, कॉलेज, संस्था यातून द्यायला हवे. **- डॉ. उमेश नागापूरकर, मानसोपचारतज्ज्ञ**

## संपादकीय

# कोरोनाचा पुन्हा कहर

तीन वर्षांच्या दीर्घ विश्रांतीनंतर देशात पुन्हा कोरोनाने नवीन अवतार धारण करत आपला कहर दाखवण्यास सुरुवात केली आहे. महाराष्ट्रासह देशात कोरोना रुग्णांची संख्या बाराशेपार पोहोचली आहे. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगालसह इतर राज्यांत कोरोना झपाट्याने हातपाय पसरत आहे. आतापर्यंत १२ जणांचा या नवीन व्हायरसमुळे मृत्यू झाला आहे. महाराष्ट्रात ८६ रुग्ण सापडले असून, आतापर्यंत दोघांचा मृत्यू झाला आहे. सरकारने सरकारी रुग्णालयांत कोरोना रुग्णांसाठी स्पेशल वॉर्ड बनविण्याकडे प्रत्यक्ष उपाययोजना मात्र सुरू केलेल्या दिसत नाही. सरकार एकीकडे दररोज कोरोना रुग्णांची आकडेवारी जाहीर करत आहे व नागरिकांनी घाबरून जाऊ नये, खबरदारी घ्यावी, असे आवाहन करत आहे. मात्र, सार्वजनिक ठिकाणी करावयाच्या उपाययोजनांबाबत कोणतीच रणनीती आखताना दिसत नाही. मागील अनुभव पाहता, सरकारने गर्दीच्या ठिकाणी अंकुश राहील अशा उपाययोजना करणे अपेक्षित आहे. कोरोनाच्या पहिल्या लाटेकडे सरकारचे दुर्लक्ष झाले. त्यामुळे अचानक लॉकडाऊनचा निर्णय घ्यावा लागला. भारतात कोविड-१९ चे पहिले रुग्ण ३० जानेवारी २०२० रोजी केरळच्या तीन शहरांमध्ये आढळले. महाराष्ट्रात कोरोना विषाणूचा उद्रेक ९ मार्च २०२० झाला. केरळमध्ये २३ मार्च रोजी आणि देशातील उर्वरित भागात २५ मार्च रोजी लॉकडाऊन जाहीर करण्यात आले. सप्टेंबरमध्ये संसर्गाचे प्रमाण कमी होऊ लागले असे वाटत असताना, सप्टेंबरच्या मध्यात दररोज ९० हजारांहून अधिक रुग्ण आढळून आले, जे जानेवारी २०२१ मध्ये १५ हजारांच्या खाली आले. १४ मार्च २०२१ मध्ये सुरू झालेली दुसरी लाट पहिल्यापेक्षा खूपच विनाशकारी ठरली. देशाच्या काही भागात प्रतिबंधक लसी, हॉस्पिटल बेड, ऑक्सिजन सिलिंडर आणि इतर वैद्यकीय पुरवठ्यांचा या काळात प्रचंड तुटवडा निर्माण झाला होता. १४ एप्रिलच्या अखेरीस भारताने नवीन आणि सक्रिय रुग्णांमध्ये जगाला मागे टाकले. ३० एप्रिल २०२१ रोजी २४ तासांच्या कालावधीत ४ लाखांहून अधिक नवीन रुग्ण नोंदवणारा भारत हा पहिला देश ठरला. त्यानंतर भारताने १६ जानेवारी २०२१ रोजी कोव्हिशिल्ड आणि स्वदेशी कोव्हॅक्सिनने लसीकरण कार्यक्रम हाती घेत ७२ कोटींहून अधिक लोकांचे लसीकरण केले. ज्या तीव्रतेने देशात कोरोना रुग्णांची संख्या वाढत गेली. त्याच तीव्रतेने देशातून कोरोनाचे निर्मूलन करण्यात आले. या लसीकरणामुळे कोरोनाची येऊ घातलेली तिसरी लाट आटोक्यात आली असली तरी त्याचे मोठे विपरीत परिणाम आजही नागरिकांच्या शरीरावर होताना दिसून येत आहे. शिवाय, या साथरोगामुळे भारतीय अर्थव्यवस्थेला फार मोठा फटका बसला. अनेकांना बेरोजगार व्हावे लागले. काहींनी घरसंपत्ती विकून उपचार घेतले, तर काही परिवार सर्व घरसंपत्ती सोडून या लाटेत लुप्त झाले. कोरोनात किती नागरिकांचा मृत्यू झाला याच्यावरूनदेखील राजकारण रंगत राहिले. आता २०२१ च्या वैद्यकीय मृत्यू कारण प्रमाणन (एमसीसीडी) अहवालातून कोरोनाने मृत्युमुखी पडलेल्या रुग्णांची संख्या उघड झाली आहे. ७ मे रोजी भारताच्या रजिस्ट्रार जनरलने जाहीर केलेल्या रिपोर्ट्नुसार, २०२१ मध्ये कोरोनामुळे देशात १.०२ कोटी मृत्यू झाले, तर २०२० मध्ये ८१.१५ लाख मृत्यू झाले. म्हणजेच २०२१ मध्ये मृत्यूंची संख्या २१.०८ लाखांनी जास्त होती. लॉकडाऊन आणि अहवालाच्या अभावामुळे त्यावेळी २१.०८ लाख मृत्यू आढळले नाहीत, असे तज्ज्ञांचे म्हणणे आहे. त्यामुळे या २१.०८ लाख मृत्यूंचे कारण या अहवालात दिलेले नाही. एमसीसीडीच्या अहवालानुसार, २०१८ ते २०२० पर्यंत देशभरात मृत्यूच्या संख्येत ५ ते ७ लाखांची वाढ झाली. २०२१ मध्ये मृतांची संख्या २१ लाखांनी वाढली. २०२१ मध्ये वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित झालेल्या मृत्यूंची संख्या २३.४२ टक्के होती, जी २०१९ आणि २०२० च्या तुलनेत फक्त १ ते ३ टक्के जास्त होती. याचा अर्थ २०२१ मध्ये प्रत्येक १० पैकी ७ मृत्यूंचे कारण वैद्यकीयदृष्ट्या प्रमाणित नव्हते. कोरोनामुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या सरकारच्या दाव्यांपेक्षा जास्त आहे. एमसीसीडीच्या अहवालानुसार, कोरोनामुळे मृतांचा आकडा ५.७४ लाख होता. परंतु, आरोग्य मंत्रालयाने संसदेत ५.३३ लाख मृत्यू झाल्याचा दावा केला होता. २०२१ मध्ये महिलांपेक्षा जवळजवळ दुप्पट पुरुषांचा मृत्यू झाला. १ कोटी पैकी ६२ लाख पुरुष आणि ४० लाख महिला होत्या. देशात कोरोनाने पुन्हा डोके वर काढले असताना, नेमका २०२१ चा कोरोना मृत्यूचा आकडा जाहीर झाला आहे. जो सरकारच्या दाव्यापेक्षा जास्त आहे. भारतात कोरोनाच्या आलेल्या सलगा दोन लाटा पाहता तिसरी लाट येईल की नाही व आली तर तिची व्यापकता, भयानकता किती राहील हे सांगता येत नाही. कारण वैद्यकीय तज्ज्ञांचे याबाबत एकमत नाही. त्यातही तिसरा वर्ग हा कोरोना नव्हताच हे मानणारा होता. पण ज्यांनी हा रोग अनुभवला ते या तिसऱ्या वर्गाच्या दाव्याकडे दुर्लक्ष करत आहे. काही तज्ज्ञांच्या मते, भारतीय नागरिक आता कोरोनासोबत जगायला शिकले आहेत. तर काहींच्या मते लसीकरणामुळे या रोगावर नियंत्रण मिळवणे शक्य आहे. तज्ज्ञांचे दावे काहीही असले तरी कोरोना भारतात पुन्हा हातपाय पसरू लागला आहे. एकाच दिवसात या रुग्णांची संख्या दोनशेपार गेली आहे. तर आतपर्यंत दहा जणांनी प्राण गमावले आहे. भारताची लोकसंख्या व बदलते वातावरण पाहता हा रोग मोठ्या प्रमाणात पसरू शकतो. शिवाय, प्रत्येक वेळी तो आपले रूप बदलत आहे. आपण दर वेळी त्यांचे नामकरण करत असलो तरी कोविड-१९ हे त्याचे मूळ रूप आपण विसरता कामा नये. कारण याच कोविड-१९ च्या दोन लाटांनी आपली भयानकता दाखवून दिली आहे. एखाद्याचे निधन झाले तर त्याच्या अंतिम दर्शनासाठी आपण कित्येक तास त्याचे शव घरात ठेवतो, पण कोरोना काळात हे शव घरात आणणे तर सोडा, त्याचा अंत्यविधी कोणी व कुठे केला हे अनेकांना माहिती नाही. अनेकांना आपले आई-वडील, भाऊ-बहीण, मुले यांचे चेहरेदेखील पाहता आले नाही. प्रत्येक आपत्तीत धीर देणे हे सरकारचे काम आहे. आर्थिक हित व सामाजिक परिस्थिती पाहता सरकार लागलीच कठोर निर्णय घेऊ शकत नाही. पण आपण मात्र सुजाण नागरिकाप्रमाणे सजग होऊ शकतो व काही बंधने आपल्यावर लादू शकतो. सतर्कता हाच या रोगावर प्रभावी उपचार आहे.

## सर्वांचे विस्मरण करून रामच आठवावा





अकर्तेपणे करीत राहावे कर्म । हाच परमात्मा आपलासा करून घेण्याचा मार्ग ।। न करावा कोणाचा द्वेष मत्सर । सर्वांत पाहावा आपला रघुवीर ।। परनिंदा टाळावी । स्वत:कडे दृष्टि वळवावी ।। गुणांचे करावे संवर्धन । दोषांचे करावे उच्चाटन ।। जेथे जेथे जावे । चटका लावूनच यावे ।। याला उपाय एकच जाण । रघुनाथावांचून न आवड दुजी जाण ।। देहाचे दु:ख अत्यंत भारी । रामकृपेने त्याची जाणीव दूर करी ।। मनावर कशाचाही न होऊ द्यावा परिणाम । हे पूर्ण जाणून, की माझा त्राता राम ।। अभिमान नसावा तिळभरी। निर्भय असावे अंतरी ।। जे दु:ख देणे आले रामाचे मनी । ते तू सुख मानी ।। देह टाकावा प्रारब्धावर। आपण मात्र साधनाहून नाही होऊ दूर ।। मी असावे रामाचे । याहून जगी दुसरे न दिसावे साचे ।। प्रपंचातील सुखदु:ख ठेवावे देहाचे माथा । आपण न सोडावे रघुनाथा ।। आपण नाही म्हणू कळले जाण । ज्ञानाचे दाखवावे अज्ञान ।। दोष न पाहावे जगाचे । आपले आपण सुधारून घ्यावे साचे ।। कोणास न लावावा धक्का । हाच नेम तुम्ही राखा ।। एक रामसेवा अंतरी । सर्वांभूती भगवद्भाव धरी ।। राम ज्याचा धनी । त्याने न व्हावे दैन्यवाणी ।। नका मागू कुणा काही । भाव मात्र ठेवा रामापायी ।। वाईटांतून साधावे आपले हित । हे ठेवावे मनी निश्चित ।। भगवंताचे विस्मरण । हे वस्तूच्या मोहाला कारण।। म्हणून भक्ति व नाम । याशिवाय ऐकू नये कोणाचे ज्ञान ।। परिस्थितीचा निर्माता परमात्मा जाण । त्यातच त्यास पाहावे आपण ।।

# प्रेम : वासनांधत्वाचा कळस नव्हेच

आजच्या काळात जास्त करून प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेम प्रसंग-प्रणय यांच्याशी जोडून पाहिले जाते. परंतु, प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तूशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुसऱ्याच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रूपं आहेत. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे, खरे प्रेम हे नेहमी नि:स्वार्थ असते, स्वार्थी तर लोक असतात, जे त्याला विकृत स्वरूप देतात. खरे प्रेम ती भावना आहे जी एखादी वस्तू, व्यक्ती, स्थान, जीव अथवा ईश्वराविषयी तयार होते. प्रेमाचा सरळ संबंध भावनेशी आहे. प्रेमाचा हा सिद्धांत प्राणी आणि धार्मिक विश्वासांवरही लागू होतो. प्रेमाचा खरा अर्थ नि:स्वार्थ भावनेने समोरच्याला सर्वस्व अर्पण करणे हाच आहे. आपल्या प्रेमीच्या हित आणि आनंदासाठी स्वत:च्या आनंदाचा त्याग करणे खरे प्रेम आहे. प्रेम जीवन देते, जीवन घेत नाही. प्रेम परमेश्वराने दिलेली समतुल्य, पवित्र आणि महान वस्तू आहे. मनुष्य या पवित्र प्रेमाला त्याच्या स्तरावरून खाली ओढत आहे. मनुष्याने प्रेमाला इच्छा आणि वासनापर्यंत मर्यादित केले आहे. म्हणून आज हे स्वार्थीप्रेम हे हत्या आणि आत्महत्यांचे सर्वांत मोठे कारण बनले आहे. प्रेम देणारा समर्पण भावनेने वागतो, मात्र प्रेम घेणारा आपले नातेसंबंध काय? हे विचारात न घेताच त्याचा गैरफायदा उठवतो. गुरू-शिष्य हे नाते मातृप्रेमाचे असते, मात्र संधिसाधू, भोंदूगुरू हा शिष्याच्या जवळिकतेच्याच सुवर्ण संधीप्रमाणे वाट बघत असतो. संधी हाती येताच तो हलकट-लंपट दुष्कृत्य, अत्याचार, अनाचार, भ्रष्टाचार वा बलात्कार करून पवित्र नाते कलंकित करतो. गुरूबंधू- गुरूसिख यांचे परस्परातील नाते हे बहीणभावाचे असावयास हवे, मात्र तेही असेच वासनांध भावनेतून स्वत:च्या उजळ रूपाला काळिमा फासून घेतात. अशा आपल्या दुर्व्यवहारी- व्याभिचारी वृत्तीने समाजाचे शी-थूऽऽऽ..! तोंडावर पाडून घेतात आणि आजीवन तुरुंगात सडतात. यामुळेच भक्तिमार्ग संशयाच्या भोवऱ्यात अडकला आहे. अशांना ज्ञानी-गुणी कोण म्हणेल? ईश्वर हे प्रेमाचेच नाव आहे, मग या विधानाची सत्यता गोत्यात तर येणारच ना!

सन्मान करणे : मानसन्मान कोणत्याही व्यक्तीचे आभूषण असते. जर तुमचा प्रेमी तुमचा खूप सन्मान करीत असेल व तुमच्या सोबतच इतरांशीदेखील सन्मानाने वागत असेल तर तो व्यक्ती निश्चल मनाचा आहे. आजकाल अनेक प्रेमी-प्रेमिका आहेत, काही वरवर तर काही एक दुसऱ्यावर निस्सीम प्रेम करतात. परंतु, लहान-मोठ्या गोष्टीवर शिव्या देणे आणि चारित्र्यावर संशय घेणे असा त्यांचा व्यवहार असतो. जर एखादी व्यक्ती असे करीत असेल तर ती कपटी मनाची व स्वार्थी व्यक्ती आहे. स्वत:पेक्षा जास्त तुमच्यावर विश्वास ठेवणे : खरे प्रेमी स्वत:पेक्षा जास्त एकमेकांवर विश्वास ठेवतात. विश्वास ठेवल्याने एकमेकांमधील नाते आणखी मजबूत होते. जर तुमचा प्रेमी-प्रेमिका तुमच्यावर विश्वास ठेवत नसेल आणि तुमच्या लहान-मोठ्या गोष्टीवर संशय करीत असेल, तर अशा व्यक्तीपासून दूर राहिलेलेच चांगले. काळजी घेणे : खरे प्रेमी-प्रेमिका एकमेकांची नेहमी काळजी घेतात. त्यांना स्वत:पेक्षा जास्त आपल्या प्रेमीची चिंता असते. जर प्रेमी-प्रेमिका वाईट परिस्थितीतून जात असेल, तर अशावेळी एक खरा प्रेमी नेहमी विश्वास आणि काळजी घेतो. एका आईप्रमाणे



नि:स्वार्थ भावनेने आपल्या प्रेमीची काळजी करतो. नेहमी खरे बोलणे : खरा प्रेमी तुमच्याशी नेहमी खरे बोलेल. त्याचा काही भूतकाळ असेल तर त्याबद्दलची माहिती तो तुम्हाला आधीच देईल. जर तुम्हीदेखील कोणावर प्रेम करीत असाल, परंतु त्याला आपला भूतकाळ सांगितला नसेल, तर न घाबरता सर्वकाही सांगून टाकावे. कारण खरे प्रेम हे शरीरावर होत नसून, हृदयावर केले जाते. खरे प्रेम तुमच्या सर्व चुकांना माफ करायला तयार असते. प्रेमात नमुन जाणे : चूक कोणाचीही असो, परंतु एक खरा प्रेमी-प्रेमिका नाते वाचवण्यासाठी नेहमी माघार घेतो आणि सॉरी-क्षमस्व बोलतो. एका खऱ्या पार्टनरचे कर्तव्य आहे, की आपापसातील नाते खराब होऊ नये म्हणून कठीण परिस्थितीत माघार घेऊन नमुन जाणे. स्वातंत्र्य देणे : खऱ्या प्रेमात तुम्हाला संपूर्ण स्वातंत्र्य असते. खरे प्रेम एका स्वतंत्र पक्ष्याप्रमाणे असते, जो कुठेही उडू शकतो. कधीही निर्बंध लावून खरे प्रेम मिळवले जाऊ शकत नाही. खऱ्या प्रेमात प्रत्येकाला आपले विचार आणि धर्म-कर्म अशा प्रत्येक गोष्टीत स्वातंत्र्य असते. शेजाऱ्यापाजाऱ्यांवर प्रेम करण्यास सांगितले जाते, मग काय त्यांच्याशीही असलेच लंपट उपद्व्याप करा, असाच अर्थ घ्यावा काय?

कोणत्याही प्राणी, वस्तू, सजीव, निर्जीव इत्यादीबद्दल मनामध्ये आपुलकी, स्नेह, जिव्हाळा, आदर, निर्माण होणे आणि ती गोष्ट सहवासात, जीवनात हवीशी वाटणे म्हणजे प्रेम होय. आपले दैनंदिन जीवन जगत असताना सहवासात येणाऱ्या कोणत्याही गोष्टीशी भावनिक, मानसिक, शारीरिक, संबंध जोडले गेल्यामुळे निर्माण झालेला स्नेह म्हणजे प्रेम होय. मानवाच्या वयोगट व नातेसंबंधांनुसार प्रेमाचे स्वरूप असे असते. स्नेह हा प्रेमाचा हा प्रकार आपण आपल्याहून वयाने लहान असणाऱ्या व्यक्तीसोबत ठेवतो. यात एक काळजी किंवा माया असते. भूतदया किंवा पशुपक्ष्यांबद्दल वाटणारी आपुलकी हीसुद्धा यात मोडते.प्रेम हा समान वयोगटातील व्यक्तींच्या दरम्यान असणाऱ्या संबंधांना दर्शवितो. याचे उपप्रकार म्हणजे भगिनीप्रेम, बंधुप्रेम, मित्रप्रेम इत्यादी. आदर हा प्रेमाचा प्रकार आपल्याहून वयाने मोठ्या अथवा ज्येष्ठ व्यक्तींकरिता असतो. यातही संबंधित व्यक्तीची वाटणारी काळजी-विशेषत: त्यांच्या आवडी-निवडी व विचारांची ठेवतात. ही वागणूक त्यांच्या जीवनाच्या अनुभवाची आणि त्यांनी आपल्या केलेल्या संगोपनाबद्दलची एक पावती आणि क्वचित प्रसंगी त्यांना आवडणाऱ्या शिस्तबद्ध दिनचर्येची दखल असू शकते. ममता हा तो प्रेमप्रकार की ज्याला अनुभवायला असे म्हणतात की देवही अवतार घेतात. गुरूला या मातृप्रेमामुळेच गुरुमाऊली संबोधन चिकटले. स्त्रीला मातृत्व प्राप्त झाले की आपल्या बाळासाठी वाटणारे प्रेम म्हणजे ममता होय.


भक्ती हे प्रेमाचे परमोच्च रूप की ज्याचे वर्णन केवळ अशक्य. परमेश्वर आणि साधक जेव्हा एकरूप होतात तेव्हा जो प्रेमप्रकार घडतो, तो म्हणजे भक्ती होय. त्यालाच प्रेमाभक्ती असेसुद्धा संबोधले जाते. हीच प्रेमाभक्ती म्हणजेच भक्त व भगवंताची एकरूपता होय. भिन्नता म्हणजे विभक्ती- परमेश्वर आणि भक्त दोघेही एकरूप होऊन आपापले वेगळे अस्तित्व घालवून परमोच्च एकरूपता अनुभवतात, त्यासच भक्ती असे संबोधन आहे. प्रेम म्हणजे दोन जीव, नाते, संबंधी, एकत्र येऊन विचारांची देवाणघेवाण करतात, त्याच्या विचारातील एकता म्हणजे प्रेम होय. उदा. पती-पत्नी प्रेम. संधिसाधू व्यक्ती मात्र या पवित्र प्रेम स्वरूपांनाही एकाच पारड्यात तोलतो, प्रेमाला बदनाम करतो आणि सगळा घोटाळा होऊन बसतो. म्हणूनच मानवसमाज अशांची धिंड काढतो. आजच्या काळात जास्त करून प्रेम शब्दाला स्त्री व पुरुष यांच्या प्रेमप्रसंगाशी जोडून पाहिले जाते. परंतु प्रेम हे जगातील कोणत्याही वस्तूशी अथवा व्यक्तीशी होऊ शकते. प्रेमाच्या प्रभावानेच सृष्टीतील लोक एक दुसऱ्याची मदत करतात, एक दुसऱ्याच्या जीवनात सहयोग करता. याशिवायही प्रेमाचे अनेक रूपं आहेत. जसे पती-पत्नीचे प्रेम, भाऊ-बहिणीचे प्रेम, मित्रांचे आपापसातील प्रेम, प्रियकर आणि प्रेयसीचे प्रेम, गुरू आणि शिष्याचे प्रेम इत्यादी इत्यादी. प्रेमाशिवाय मनुष्यजीवन संभव नाही. म्हणूनच प्रेम हेच जीवन आहे, असे म्हटले जाते. आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खरे प्रेम हे नेहमी नि:स्वार्थ असते, स्वार्थी तर लोक असतात जे त्याला विकृत स्वरूप देतात. आता आपण प्रेमाचे दुसरे रूप म्हणजेच विकृत, वासनांध, प्रणयासक्त प्रेम होय. हे प्रेम मनुष्याचा स्वार्थ आणि अज्ञानामुळे निर्माण होते. या प्रेमाचे दुसरे नाव वासना असते. वासना हीच प्रेमाचे विकृत स्वरूप आहे.

**कृष्णकुमार निकोडे**
९४२३७१४८८३

# अर्थव्यवस्थेच्या वेगात हरवलेली माणसे

भारतीय अर्थव्यवस्थेची झपाट्याने होत असलेली प्रगती जगाला चकित करते. आर्थिक आकडेवारी आणि विकासदर यांची वाच्यता सत्ताधीशांसाठी गौरवाचा विषय ठरते. परंतु, या झगमगत्या आकड्यांच्या आड लपलेली एक कडू सत्यता दुर्लक्षित करता येणार नाही, ती म्हणजे देशातील कोट्यवधी सामान्य कुटुंबांची हालअपेष्टांनी भरलेली जीवनकहाणी.

या कुटुंबांपैकी काहींची स्वप्ने मोठी असतात. त्यांना वाटते, ''कर्ज काढू, व्यवसाय सुरू करू, कष्ट करू आणि एक दिवस उज्ज्वल भविष्य आपलं होईल.'' परंतु स्वप्नांची गाठ अनेकदा वास्तवाच्या काटेरी कुंपणाशी लागते. बाजारात स्पर्धा वाढते, महागाई गगनाला भिडते आणि त्याच वेळी उत्पन्न मात्र खालावते. अशा स्थितीत कर्ज फेडणे तर दूरच, रोजचं जगणंही दुर्गम वाटू लागतं. काहींना वाटते की, भविष्याचं विचार करून काय उपयोग? वर्तमान जगू या. पण तेही सहज शक्य नसतं. कारण आरोग्याची आणि शिक्षणाची किंमत दिवसेंदिवस वाढते आहे. खासगी शाळा, रुग्णालये, विमा, औषधे या सर्व गोष्टी आता श्रीमंतांच्या आवाक्यात आहेत, सामान्यांच्या नव्हे. आणि म्हणूनच थकलेल्या कर्जाचे ओझे, वाढत्या गरजा आणि अर्धवट राहिलेली स्वप्नं घेऊन कित्येक कुटुंबं उदास आणि निरुपाय होऊन बसलेली आहेत.



सार्वजनिक चिंता निर्माण करणारी घटना नुकतीच हरियाणातील पंचकुला येथे घडली. एका संपूर्ण कुटुंबाने आत्महत्या केली. त्यांच्यावर बँकेचे मोठे कर्ज होते. इतके की, ते फेडण्याची शक्यता त्यांच्या जीवनाच्या हद्दीबाहेर गेली होती. दिवसेंदिवसचे खर्च, मुलांचे शिक्षण, घरखर्च... आणि कर्जाचे हप्ते ही गणिते जेव्हा जुळेनाशी होतात, तेव्हा माणूस फारच एकटा पडतो. अशा वेळी काही जण स्वत:शी संघर्ष करत राहतात, काहीजण मूक वेदना सहन करतात, तर काहीजण... मृत्यूला कवटाळतात.

कर्ज ही संकल्पना आपण फार वेळा घर खरेदी, वाहन खरेदी किंवा व्यवसायासाठी वापरतो. आणि हे साहजिकच आहे. कारण आर्थिक स्वावलंबनासाठी गुंतवणूक आवश्यक असते. पण जर व्यवसायासाठी घेतलेले कर्जही परतफेडीपलीकडे जाऊ लागले, तर प्रश्न उभा राहतो देश प्रगती करतो आहे खरा, पण या प्रगतीच्या वावटळीत हे लहान व्यावसायिक, शेतकरी आणि कामगार हरवत चाललेत का? कारण शेतकरी असो किंवा लघुउद्योगी जर त्याच्या उत्पादनाचा खर्च भरूनही येत नसेल, तर दोष फक्त त्याच्या मेहनतीचा नाही. त्या मागे बाजारव्यवस्थेतील असमतोल, नीतीधोरणांतील त्रुटी, आणि मधल्या दलालांचं वाढत चाललेलं वर्चस्व हे सगळं आहे. शेतीच्या खर्चावर अनुदान कमी होतंय आणि बाजारात हमीभाव मिळत नाही. अशा स्थितीत हजारो शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याच्या बातम्या आता केवळ आकडे राहिल्या आहेत, व्यथा नाही.

त्यातच लघुउद्योजक, हातावर पोट असलेले कष्टकरी, कॅब ड्रायव्हर, चहा विक्रेते हे सगळेही संघर्ष करत आहेत. महागाई वाढत असताना त्यांचं उत्पन्न स्थिर राहिलं आहे. आणि बँकेचे हप्ते मात्र चढतच आहेत. या पार्श्वभूमीवर आज सरकारपातळीवर केवळ कर्जमाफी हा उपाय असू शकत नाही. गरज आहे ती दृढ धोरणांची, दूरदृष्टीची आणि संवेदनशीलतेची. केवळ आकड्यांची जंत्री वाढवून विकास घडत नाही. विकास तोच, जो शेवटच्या माणसाच्या दारापर्यंत पोहोचतो. ही वेळ आहे प्रश्न विचारण्याची. व्यवसाय करतानाही तोट्यात का जातोय? शेती ही तोट्याचा व्यवहार का ठरते आहे? आर्थिक विकासाचा लाभ खरोखर सर्वपरी पोहोचतो आहे का? ही वेळ आहे जबाबदारीने उत्तरं शोधण्याची. कारण लाखो स्वप्नं आणि जगणं हे त्या उत्तरांवर अवलंबून आहे. देशाच्या कोट्यवधी नागरिकांच्या डोळ्यांतील आशेचा दिवा फक्त आकड्यांनी पेटत नाही, तो पेटतो वास्तवाशी प्रामाणिकपणे जोडलेल्या नीतींनी, सहानुभूतीने!

**मच्छिंद्र ऐनापुरे**

# बदललेल्या ऋतुमानाचा इशारा

लातूर शहरात अनपेक्षितपणे मुसळधार पाऊस बरसला. मागील काही वर्षे आपण पाहिले आहे की, मांजरा नदीत ऑगस्टमध्ये थोडेफार पावसाचे पाणी वाहताना दिसायचे. परंतु यावर्षी मे महिन्यातच मांजरा नदीला पूर आला आहे. कधी नव्हे ते मे महिन्यात महाराष्ट्रात सर्वत्र मुसळधार पाऊस पडत आहे. जिकडे-तिकडे पाणीच पाणी वाहू झाले आहे. नद्या-नाले दुथडी भरून वाहू लागले आहेत. गावोगावी पावसाने धुमाकूळ घातला आहे. विजा पडून अनेक माणसे व मुकी जनावरे दगावली आहेत. मुंबई, पुणे व इतर शहरांना मुसळधार पावसाने झोडपले आहे. पूर्वी मे महिन्यात दोन चार दिवस अवकाळी पाऊस पडायचा आणि उघडायचा. परंतु, यावर्षी मे महिन्यात दररोज अनपेक्षित असा धो धो पाऊस पडत आहे.

केरळ राज्यात मॉन्सून येण्याच्या अगोदरच महाराष्ट्रात तुफानी पावसाचे जोरदार आगमन झाले आहे. ऋतुमान बदलत असल्याची ही एक खतरनाक झलक निसर्ग आपणाला दाखवत आहे. जर खरेच प्रत्यक्षात ऋतुचक्र बदलले आणि केव्हाही पाऊस, कधीही उन्हाळा आणि केव्हाही हिवाळा होऊ लागला तर मग पर्यावरण धोक्यात आल्याचा हा इशारा आपण समजून घेतला पाहिजे. असे झाले तर मग पृथ्वीवर वर्चस्व मिळवलेल्या स्वार्थी मानवाला पृथ्वीवर जीवन जगणे अवघड होईल! बदललेल्या ऋतुमानाचा मानवी जीवनावर दूरगामी परिणाम



तर होतीलच. परंतु, शेतकऱ्यांना शेती करणे फार अवघड होईल. पेरणी कधी करायची? खरीप हंगाम केव्हा व रब्बी हंगाम केव्हा होणार? याचे गणित बिघडून जाईल आणि आपणाला निसर्गाची करणी काही कळणार नाही. सतत पाऊस पडू लागला आणि नेहमीच चक्रीवादळे येऊ लागले तर शेतकऱ्यांना शेती करणे फार जिकिरीचे होऊन जाईल. शेतीपिकावर अवलंबून असलेल्या उद्योगधंद्यांचा खेळखंडोबा होणार आहे. एकूणच काय तर बदललेल्या ऋतुमानाचे दुष्परिणाम आपल्या सगळ्यांना भोगावे लागणार आहेत. पर्यावरणाचा समतोल बिघडून तर गेलाच आहे. या सगळ्या विनाशाला केवळ माणूस नावाचा प्राणी जबाबदार आहे हे आपण लक्षात घ्यायला हवे. आपण झाडांची बेसुमार कत्तल केली आहेच. सिमेंटचे जंगल निर्माण केले, धूर ओकणारे कारखाने उभे केले, विषारी रसायनांचा बेसुमार वापर वाढवलाय, नद्या व समुद्र प्रदूषित केले आहेत आणि जिकडे-तिकडे प्लास्टिकचा कचरा केलाय. शहरात व गावोगावी प्लास्टिकचे व जैविक अजैविक कचऱ्यांचे ढीग साचलेले दिसतात. ही सगळी दुष्कृत्ये आपण सगळ्यांनी केली आहेत. याचा परिणाम सुंदर अशा पर्यावरणावर तर झालाच आहे. आता ऋतुचक्र धोक्यात आले आहे. माणूस या नात्याने आपण याचा गंभीर विचार करायला हवा. पर्यावरणाला घातक अशा कृतींचा आपण तत्काळ त्याग केला पाहिजे. वृक्षारोपण करणे, झाडांचे संवर्धन व रक्षण करणे आपल्या सर्वांचे परमकर्तव्य आहे. धूर ओकणारी जुनी वाहने कायमची भंगारात काढली पाहिजेत. तेव्हा कुठे आपणाला पर्यावरणाबद्दल भाष्य करण्याचा अधिकार राहणार आहे.पाऊस पडल्यावर गावात व शहरात जागोजागी पाणी साचत आहे. गटारे व नाले लगेच तुंबतात. हे पाहून आपण प्रशासनाच्या नावाने बोटे मोडतो पण आपण उघड्यावर प्लास्टिकचा कचरा फेकून देतो, याबाबत कधीच भाष्य करत नाही. हा प्लास्टिकचा कचरा जो कधीच कुजत नाही तो तसाच साचून राहतो. आपली मुले फास्ट फूड खातात आणि त्यांचे रॅपर्स व वेष्टने फेकून देतात. लग्नकार्यात प्लास्टिकच्या पत्रावळ्या, द्रोण, ग्लास या वस्तूंचा वापर वाढलाय. वापर करून ते आपण फेकून मोकळे होतो. तो कचरा जीवघेणा ठरतो आहे. त्यापेक्षा आपण आपल्या पृथ्वीला व पर्यावरणाला जीवापाड जपले पाहिजे. तरच बदलणारे ऋतुचक्र मूळ अवस्थेत कायम राहतील.

**बबन गुळवे**
९५४५४४२६४८

# मराठी सक्तीची काटेकोर अंमलबजावणी व्हावी!

केंद्र सरकार अंतर्गत असलेल्या राज्यातील राष्ट्रीय बँका, रेल्वे प्रशासन, टपाल विभाग, पारपत्र विभाग, विमा कार्यालये, रेल्वे प्रशासन, दूरध्वनी कार्यालये, मेट्रो रेल्वे, विमान कार्यालये, गॅस आणि पेट्रोलियम कंपन्यांची कार्यालये, इतर केंद्रीय कार्यालये इत्यादी ठिकाणी त्रिभाषा सूत्राला सरळ सरळ हरताळ फासला जातो आणि मराठी भाषेला डावलले जाते. वास्तविक त्रिभाषा सूत्रानुसार केंद्र सरकारी कार्यालयांमध्ये इंग्रजी आणि हिंदीसोबतच मराठी भाषेचा वापर करणे अनिवार्य असूनही मराठीला केराची टोपली दाखवली जाते. या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व केंद्र शासनाच्या कार्यालयांत हिंदी, इंग्रजीसह मराठीचा वापर करणे बंधनकारक असल्याचा आदेश राज्य सरकारने काढला आहे, ही स्वागतार्ह गोष्ट आहे. फक्त शासनाच्या या निर्णयाची काटेकोर अंमलबजावणी किती होते हे आता पाहावे लागेल. कारण मराठीच्या वापराच्या संदर्भात यापूर्वीही अनेक आदेश, परिपत्रके निघाली. पण मराठी भाषेला नेहमीच दुय्यम वागणूक मिळाली आहे. १ मे १९६० रोजी मराठी राजभाषेसह स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्याला नुकतीच ६५ वर्षे पूर्ण झाली आहेत आणि अलीकडेच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. त्यामुळे मराठीच्या सन्मानासाठी राज्य शासनाचा मराठी सक्तीचा हा नवा आदेशही केंद्रीय कार्यालयांतून नेहमीप्रमाणे पायदळी तुडवला जाऊ नये यासाठी सरकारने लक्ष देणे गरजेचे आहे.

**प्रदीप मोरे, ९८७०७७७२७४**

# बावनकुळेजी थोडं सावकाश!



सध्याच्या मंत्रिमंडळात धडाधड निर्णय घेणारे धडाकेबाज मंत्री आहेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे. शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी रस्ता हवाच अजिबात दुमत नाही. पण कुणाला रस्ता देताना कुणाचे नुकसान म्हणजे शेती जात असेल तर वेगळा निर्णय घेतलाच पाहिजे. कारण रस्ता मिळावा, यासाठी तहसीलदारांना अधिकार होतेच पण आता जनतेचा सहभाग पण सुरू झाला ही समाधानाची बाब असली तरी ज्यांचे क्षेत्र कमी होईल त्यांचा विचार मंत्रिमहोदयांनी केला पाहिजे. आता रस्ताच काढतो अशा वल्गना सुरू झाल्या असून, कायदा-सुव्यवस्था धोक्यात येऊ शकते अशी अवस्था दिसत आहे. दुसरी बाजू मंत्रिमहोदयांनी लक्षात घेतलीच नाही. नकाशात असलेले नाले-ओढे हेच शेतकऱ्यांचे शेतातील रस्ते होते व ते बंद


**जनमनाचे प्रतिध्वनी**

झाल्याने शेतकऱ्यांचा रस्ता गेला व पुराचे पाणी नाला बंद केल्याने शेतशिवारात जाते व पिकांची मोठी नासाडी होते. वरून सरकारलाच भुर्दंड बसतो. शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी लागते. बावनकुळेंनी आधी राज्यातील नकाशात असलेले पण बंद पडलेले नाले-ओढे यांचे अतिक्रमण काढून पाण्याला हक्काचा रस्ता करून द्या. पण शेजाऱ्यांचे वाद खूप दिवस सुरू राहतील अशी अवस्था सध्याच्या निर्णयाने होत आहे. राज्यात अनेक शेतकऱ्यांची मोठी शेती वहिवाट रस्त्यात गेली व त्याला कोणताच मोबदला मिळाला नाही. पूर्वी असे खासगी क्षेत्रातील रस्ते गाव नकाशावर आले व क्षेत्र कमी झाले तरी शेतकरी गप्प बसले. माझ्या शेतातून रस्ता गेला, मला वाद न वाढवता गप्प बसावे लागले. आजच्या बाजारभावाप्रमाणे माझे वीस लाखांचे नुकसान झाले. बैलगाडीचा रस्ता होता मग ट्रॅक्टर आले. परत रस्ता मोठा झाला म्हणजे क्षेत्र कमी झाले. खरे तर ट्रॅक्टर जाते बस झाले, पण शेतकऱ्यांना अजून मोठा रस्ता हवा आहे. कारण त्यांना विवाहासाठी मोठमोठे डी.जे. न्यायला अडचण येते. अशीच अवस्था अनेकांची झाली आहे.

कुटुंब वाढले, विभक्त झाले. क्षेत्र कमी कमी होत गेले. आता महसूलमंत्र्यांच्या मनासारखे करायचे तर फुकट रस्ता द्या, म्हणजे ठरावीक शेतकऱ्यांना भिकेला लावायचाच हा प्रकार आहे. आधी ज्यांचे क्षेत्र रस्त्यात गेले त्यांना भरपाई द्यावी व नंतर हे क्रांतिकारक निर्णय घ्यावेत. एकाला जगवण्यासाठी दुसऱ्याला मारायचे हे चुकीचे धोरण व याच धोरणाचा ना. चंद्रशेखर बावनकुळेंनी फेरविचार करावा हे नक्की. **- अशोक थोरात**

गांवकरी® ('गांवकरी प्रकाशन'चे व्यापारचिन्ह) गांवकरी प्रकाशन
संस्थापक संपादक : स्व. द.शं. तथा दादासाहेब पोतनीस
संपादक, मुद्रक, प्रकाशक : वंदन अ. पोतनीस
मुख्य कार्यालय : 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक-४२२००१. फोन : २३०५०८०, २३०५०८१, २३०५०८२, २५९४५४६
विभागीय कार्यालये :
सिन्नर : हिरालाल टॉवर्स, बसस्टँडजवळ. ०२५५१-२२२५७८.
मालेगाव : पांजरापोळ शॉपिंग कॉम्प्लेक्स, शिवाजी पुतळा. २५५४-२३४२००
दिंडोरी : गाळा नं. २५, मार्केट कमिटीजवळ, निळवंडी रोड. ०२५५७-२२२५५५.
'गांवकरी प्रकाशन'साठी 'गांवकरी भवन', टिळकपथ, नाशिक येथे मुद्रित व प्रकाशित.
e-mail Id :-
1. gavmaha123@gmail.com
2. advtgvk@rediffmail.com
RNI REG. No.1934/57

बाजार - कंपन्या - मनोरंजन



## अभिजितला 'अमोल' साथ, 'सुंदर मी होणार' नाटकात दोन दिग्गज अभिनेते

**मुंबई :** आपल्या विनोदी शैलीने मालिका आणि चित्रपटात मजेशीर रंग भरणारे अभिनेते अभिजित चव्हाण आता प्रथमच वेगळ्या सशक्त भूमिकेत दिसणार आहेत. 'सुंदर मी होणार' या नाटकातल्या महाराज (संस्थानिक) या महत्त्वपूर्ण भूमिकेतून अभिजित चव्हाण अनेक वर्षांनंतर मराठी रंगभूमीवर काम करणार आहेत. स्वतः ची विनोदी इमेज ब्रेक करत एक अत्यंत गंभीर आणि भावनिक पात्र साकारण्याचे शिवधनुष्य पेलणाऱ्या अभिजित यांना साथ करत अभिनेते अमोल बावडेकर यांचा ही अनोखा अंदाज या नाटकात पाहायला मिळणार आहे. महाराजांचा जावई म्हणजेच सुरेश या गायकाच्या भूमिकेत हरहुन्नरी अभिनेते अमोल बावडेकर दिसणार आहेत. अभिनय आणि गायन असे दोन्ही प्रांत गाजविणारे अमोल बावडेकर सुरेश या भूमिकेच्या माध्यमातून आपल्या आवाजातील आणि मनातील सुंदरतेचा शोध घेण्याचा प्रवास उलगडून दाखविणार आहेत. पुलंचे 'सुंदर मी होणार' हे नाटक तब्बल तीस वर्षांनी पुन्हा रंगभूमीवर येत आहे. 'सवाईगंधर्व' निर्मित 'अभिजात' प्रकाशित या नाटकाची दिग्दर्शकीय धुरा राजेश देशपांडे सांभाळणार आहेत. करण देसाई आणि आकाश भडसावळे निर्मित हे नाटक 'पुलं'च्या स्मृतिदिनी आणि ज्येष्ठ साहित्यिका सुनीताबाई देशपांडे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त १२ जूनला देखण्या नट संचात रंगमंचावर दाखल होणार आहे.

## 'मर्डर मिस्ट्री'समोर 'दृश्यम' फेल

**मुंबई :** आता मनोरंजन आपल्या हातात आलं आहे, असं म्हटलं तरी वावगं ठरणार आहे. ओटीटी प्लॅटफॉर्म्समुळे आता आपल्याला हवं तेव्हा, हवं तिथे आपण सीरिज पाहू शकतो. ना थिएटरमध्ये जाण्याची गरज, ना टीव्हीसमोर बसून राहण्याची गरज. त्यामुळेच सध्या डिजिटल प्लॅटफॉर्म्सची क्रेझ खूप वाढली आहे. यामुळेच काही निर्माते चित्रपट थेट ओटीटीवरही प्रदर्शित करतात. यामुळेच जर एखादा चित्रपट थिएटरमध्ये आला, तर तो १ ते दीड महिन्यांत ओटीटीवर येतो. ओटीटी प्लॅटफॉर्मवर प्रेक्षकांना सर्वाधिक पसंती मिळणाऱ्या चित्रपटांमध्ये क्राइम-थ्रिलर शैली अव्वल आहे. बॉलीवूड चित्रपट असो किंवा साऊथ मूव्ही, लोक ओटीटीवर आता सिनेमे पाहू लागले आहेत. अशातच आज आम्ही तुम्हाला एका जबरदस्त चित्रपटाबद्दल सांगणार आहोत, जो पाहिल्यानंतर तुम्ही हैराण व्हाल. इतकंच नाही तर या सिनेमाचा क्लायमॅक्स 'दृश्यम'सारख्या चित्रपटांना मागे टाकतो. हा एक थ्रिलर-सस्पेन्स चित्रपट आहे,



## अभिनेत्री भूमी पेडणेकरचा ग्लॅम लूक

**मुंबई :** 'दम लगाके हैशा' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये पदार्पण करणाऱ्या भूमीने आपल्या अभिनय कौशल्याच्या जोरावर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. भूमी पेडणेकरने पहिल्याच चित्रपटापासून प्रेक्षकांच्या मनावर वेगळी छाप पाडली आहे. भूमीने नेहमीच वेगळ्या विषयांना हात घालत विविध प्रकारच्या भूमिका साकारल्या आणि प्रत्येक भूमिकेला न्याय दिला आहे. लहान वयातच भूमीवरुन वडिलांचं छत्र हरपलं. भूमीचे वडील सतीश पेडणेकर महाराष्ट्राचे माजी गृहमंत्री होते. भूमी पेडणेकरने 'दम लगाके हैशा' चित्रपटातून बॉलिवूडमध्ये डेब्यू केला. भूमी पेडणेकरने या तिच्या पहिल्या चित्रपटासाठी सुमारे १२ किलो वजन वाढवलं होतं. या चित्रपटानंतर तिने स्वत:ला फिट ठेवण्यासाठी खूप कष्ट घेतले आणि वर्कआउटसह डाएट फॉलो करून सुमारे ३३ किलो वजन कमी केलं. भूमी पेडणेकरने बॉलीवूड तसेच फॅशन जगतात स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. भूमीने नुकताच तिचा हा नवा लूक शेअर केला आहे जो चाहत्यांचं लक्ष वेधून घेत आहे.

## रियलमीने भारतात रियलमी जीटी ७ सीरीज केली लाँच

**नाशिक :** भारतीय तरुणांमध्ये सर्वांत लोकप्रिय स्मार्टफोन ब्रँड असलेल्या रियलमीने काल पॅरिसमध्ये जागतिक लॉन्चसह रियलमी जीटी ७ मालिका भारतात सादर केली. त्यांचा सर्वांत रोमांचक स्मार्टफोन रियलमी जीटी ७ ड्रीम एडिशन आहे, जो ॲस्टन मार्टिन फॉर्म्युला वन टीमच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे, जो पहिला अधिकृत एएमएफ १ सह-ब्रँडेड स्मार्टफोन आहे.

रियलमी जीटी ७ मालिका अत्याधुनिक वैशिष्ट्यांसह आणि कार्यप्रदर्शन अपग्रेडसह भारतीय वापरकर्त्यांसाठी फ्लॅगशिप स्मार्टफोन अनुभवाचे रूपांतर करत आहे, जे रिअलमीचे आतापर्यंतचे सर्वात धाडसी पाऊल आहे.

शक्तिशाली ७००० एमएएच बॅटरी, १२० डब्ल्यू अल्ट्राचार्ज, आणि भारतातील पहिला मीडियाटेक डायमेन्सिटी ९४००ई चिपसेट, रियलमी जीटी ७ ८ जीबी + २५६ जीबी , १२जीबी + २५६ जीबी , आणि १५ जीबी + ५१२ जीबी व्हेरियंटमध्ये उपलब्ध आहे, सुरुवातीच्या किंमत ३४,९९९ रुपये.

ॲस्टन मार्टिन फॉर्म्युला वन टीमच्या सहकार्याने तयार केलेल्या रियलमी जीटी ७ ड्रीम एडिशनमध्ये प्रीमियम ॲस्टन मार्टिन रेसिंग ग्रीन फिनिश, एरोडायनामिक फ्लो



लाईन्स डिझाइन आणि एम्बॉस्ड सिल्व्हर विंग्स आहेत. त्याचा १६ जीबी + ५१२ जीबी व्हेरिएंट १३ जून २०२५ पासून सुरू होणाऱ्या पहिल्या सेलमध्ये ४९, ९९९ रुपयांना उपलब्ध होईल.

रियलमी जीटी ७टी मध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी ८४०० -मॅक्स चिपसेट, ७००० एमएएच बॅटरी आणि आइस सेन्स ग्राफीन बॅक आहे. त्याचे ८ जीबी + २५६ जीबी , १२ जीबी + २५६ जीबी आणि १२ जीबी + ५१२ जीबी व्हेरिएंट अनुक्रमे २८,९९९ रुपयांच्या सुरुवातीच्या किमतीत उपलब्ध असतील.

रियलमी बड्स इअर ७ प्रो मध्ये एआय लाईव्ह ट्रान्सलेटर, इंडस्ट्री-फर्स्ट एव्हिएशन अॅल्युमिनियम डिझाइन आणि ४८ तासांपर्यंत बॅटरी लाइफ आहे. हे ग्लोरी बेज, फायरी रेड, रेसिंग ग्रीन आणि मेटॅलिक ग्रे रंगांच्या पर्यायांमध्ये ४,९९९ रुपयांमध्ये उपलब्ध असेल.

# शेअर बाजारात तेजी आणि घसरणीचे सत्र सुरूच

### टॉप १० पैकी ६ कंपन्यांचं नुकसान, ७८१६६ कोटी रुपयांचा तोटा, रिलायन्सला सर्वांत मोठा फटका

**मुंबई : भारतीय शेअर बाजारात तेजी आणि घसरण सुरू असल्याचं पाहायला मिळालं. १९ मे ते २३ मेदरम्यान सेन्सेक्सवरील टॉप १० पैकी ६ कंपन्यांच्या स्टॉकमध्ये घसरण झाली. यामध्ये सर्वाधिक फटका रिलायन्स इंडस्ट्रीजला बसला आहे. शेअर बाजारातील कमजोर संकेतामुळं बीएसई सेन्सेक्स ६०९.५१ अंकांनी घसरला. तर, निफ्टी ५० मध्ये १६६.६५ अंकांची घसरण झाली.**

या पाच दिवसांच्या काळात रिलायन्स इंडस्ट्रीज, टीसीएस, आयसीआयसीआय बँक, भारतीय स्टेट बँक, इन्फोसिस, हिंदुस्तान यूनिलिव्हर या कंपन्यांचं बाजारमूल्य घटलं. त्याचवेळी एचडीएफसी बँक, भारती एअरटेल, बजाज फायनान्स, आयटीसीच्या बाजारमूल्यात वाढ झाली. रिलायन्सचं बाजारमूल्य ४०,८००.४ कोटींनी घसरून १९,३०,३३९.५६ कोटी रुपयांवर आलं. टाटा कन्सलटन्सी सर्व्हिसेसचं बाजारमूल्य ७,७१०.५४ कोटींनी घसरुन १२,७१,३९५.९५ कोटी रुपये झालं आहे.

**इन्फोसिसचं बाजारमूल्य घटलं**

इन्फोसिसचं बाजारमूल्य देखील घटलं आहे. इन्फोसिसचं बाजारमूल्य १०४८८.५८ कोटी



रुपयांनी घसरून ६४९८७६.९१ कोटी रुपयांवर आलं आहे. हिंदुस्तान यूनिलिव्हरचं बाजारमूल्य ५४६२.८ कोटींनी घसरून ५,५३,९७४.८८ कोटी रुपयांवर आलं आहे. आयसीआयसीआय बँकेचं बाजारमूल्य २,४५४.३१ कोटी रुपयांनी घसरून १०,३३,८६८.०१ कोटी रुपये झालं आहे.

स्टेट बँक ऑफ इंडियाचं बाजारमूल्य १२४९.४५ कोटी रुपयांनी ७०५४४६.५९ कोटी रुपये झाली आहे. दुसरीकडे भारती एअरटेलचं मार्केटमूल्य १०,१२१.२४ कोटी रुपयांनी वाढून १०,४४,६८२.७२ कोटी झालं आहे. बजाज फायनान्सचं बाजारमूल्य ४,५४८.८७ कोटी रुपयांनी घसरून ५,७४,२०७.५४ कोटी रुपयांवर आलं.

**'या' कंपन्यांना झाला फायदा**

आयटीसीचं बाजारमूल्य ८७५.९९ कोटी रुपयांनी वाढून ५४५९९१.०५ कोटी रुपयांवर आलं. एचडीएफसी बँकेचं बाजारमूल्य ३९९.९३ कोटी रुपयांनी वाढून १४,८०,७२३.४७ कोटी रुपये झालं. सर्वाधिक घसरण होऊनदेखील बाजारमूल्याच्या निकषावर रिलायन्स इंडस्ट्रीज सर्वांत मोठी कंपनी राहिली. त्यानंतर एचडीएफसी बँक, टीसीएस, भारती एअरटेल, आयसीआयसीआय बँक, भारतीय स्टेट बँक, इन्फोसिस, बजाज फायनान्स, हिंदुस्तान यूनिलिव्हर आणि आयटीसी असा क्रम आहे. येणाऱ्या आठवड्यात शेअर बाजारात कसा राहणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलंय.

## न्यू निस्सान मॅग्नाइट सीएनजी किटसह उपलब्ध

**नाशिक :** निस्सान मोटर इंडियाची लोकप्रिय एसयूव्ही न्यू निस्सान मॅग्नाइट आता सरकार-मान्यताप्राप्त सीएनजी रेट्रोफिटमेंट किटसह उपलब्ध असेल. सीएनजी किट देशाच्या नियामक मानकांनुसार मोटोझेन (तृतीय पक्ष) द्वारे पूर्णपणे विकसित, उत्पादित आणि गुणवत्ता हमीसह असेल. मोटोझेन किटमधील घटकांसाठी वॉरंटी देईल.

या उपक्रमातून ग्राहककेंद्रित उपाययोजना प्रदान करण्यावर भर दिला जाईल. या किट्सचे फिटिंग सरकारी मान्यताप्राप्त फिटमेंट केंद्रांवर केले जाईल. संपूर्ण रेट्रोफिटमेंट फक्त ७४,९९९ रुपयांच्या स्पर्धात्मक अतिरिक्त किमतीत उपलब्ध असेल. शाश्वततेबद्दल आणि पर्यावरणाविषयी जागरूक




ग्राहकांसाठी या पर्यावरणपूरक सीएनजी किट फिटमेंटची अंमलबजावणी देशभरात टप्प्याटप्प्याने केली जाईल. पहिल्या टप्प्यात निस्सानचे ग्राहक दिल्ली-एनसीआर, हरियाणा, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, केरळ आणि कर्नाटक या ७ राज्यांमधील निस्सान अधिकृत डीलरशिपद्वारे सीएनजी किट बसवून घेऊ शकतात. दुसऱ्या टप्प्याचा भाग म्हणून नंतर ते देशभरातील इतर राज्यांमध्ये विस्तारीत केले जाईल. सीएनजी किट पर्याय फक्त मॅन्युअल गिअरबॉक्स असलेल्या नवीन निस्सान मॅग्नाइट १.० लिटर नॅचरली एस्पिरेटेड पेट्रोल इंजिनसाठी उपलब्ध आहे.

निस्सान मोटर इंडियाचे व्यवस्थापकीय संचालक श्री. सौरभ वत्स म्हणाले : न्यू निस्सान मॅग्नाइट हे आमच्यासाठी एक अभूतपूर्व उत्पादन आहे आणि त्याने भारतात आमच्या यशाचे नेतृत्व केले आहे. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी निस्सान डीलर्स सरकार-मान्यताप्राप्त सीएनजी रेट्रोफिटमेंट किटच्या स्वरूपात पर्यायी इंधन पर्याय देतील. ते ग्राहकांसाठी अधिकृत फिटमेंट केंद्रांवर फिट केले जाईल. आम्हाला खात्री आहे की, यामुळे लोकप्रिय कॉम्पॅक्ट एसयूव्हीचे मूल्य आणि व्यावहारिकता वाढेल. न्यू मॅग्नाइट एसयूव्हीची बोल्ड आणि स्टायलिश डिझाइन, २०+ पहिली आणि सर्वोत्तम श्रेणीतील वैशिष्ट्ये आणि ५५+ सुरक्षा वैशिष्ट्ये यामुळे ती कॉम्पॅक्ट एसयूव्ही सेगमेंटमध्ये एक वेगळी निवड ठरते.

## स्टँडर्ड ग्लास लाइनिंग टेक्नॉलॉजीचे दमदार प्रदर्शन

**मुंबई :** औषधनिर्माण आणि रासायनिक उद्योगांसाठी भारतातील आघाडीच्या उच्च दर्जाच्या उपकरण उत्पादकांपैकी एक स्टँडर्ड ग्लास लाइनिंग टेक्नॉलॉजी लिमिटेड (एसजीएलटीएल)ने ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या चौथ्या तिमाहीचे आणि पूर्ण आर्थिक वर्षाचे लेखापरीक्षित आर्थिक निकाल जाहीर केले. १३.९% च्या मजबूत महसूल वाढीसह करोत्तर नफ्यात १४.२%ची वाढ नोंदवली आहे. स्टँडर्ड ग्लास ही औषध आणि रसायन क्षेत्रांसाठी एक संपूर्ण अभियांत्रिकी उपाय प्रदाता आहे. ही कंपनी फार्मा आणि केमिकलच्या उच्च दर्जाच्या प्रक्रिया उपकरणांसाठी एक सुपर ब्रँड आहे आणि दोन्ही उद्योगांसाठी एक संपूर्ण समाधान प्रदाता आहे. कंपनीने मजबूत महसूलवाढ, सुधारित नफा आणि महत्त्वाच्या धोरणात्मक घडामोडींमुळे चांगली कामगिरी केली आहे. यामुळे भविष्यातही कंपनीची वाढ सातत्यपूर्ण पद्धतीने होत राहील. आर्थिक वर्ष २५ मध्ये कंपनीचे एकूण उत्पन्न ६२६ कोटी रुपये राहिले ज्यात गेल्या वर्षीच्या तुलनेत १३.९% वाढ झाली आहे. कंपनीचा एबिटा १२० कोटी रुपये होता, जो गेल्या वर्षीच्या तुलनेत १८.६% ने वाढला आहे. एबिटा मार्जिनमध्ये सुधारणा होऊन तो १९.१% झाला आहे. कंपनीचा करपूर्व नफा ९४ कोटी रुपये झाला आहे.

## आगीच्या पार्श्वभूमीवर जोखीम, सुरक्षेसाठी कारखानदार अलर्ट

**नाशिक :** नाशिकमध्ये एका कारखान्याला नुकतीच लागलेली आग तब्बल ६० तास धुमसत होती. आगीमुळे झालेल्या प्रचंड नुकसानाने आजूबाजूच्या लघु व्यावसायिकांना सतर्क केले आहे.

सातपूर, अंबड, सिन्नर, इगतपुरी आणि विंचूर या भागांमध्ये उत्पादन कारखान्यांची संख्या लक्षणीय आहे. सिएट, सीमेन्स, एचएएल, महिंद्रा आणि अशा मोठमोठ्या कंपन्यांचे कारखाने या भागात आहेत. तरीही या औद्योगिक पट्ट्यातील हजारो लघु आणि मध्यम व्यवसायांनी अद्याप विमा संरक्षण घेतलेले नाही.

संरक्षणाची ही कमतरता ओळखून टाटा एआयजीच्या स्मॉल बिझनेस इन्श्युरन्स सोल्यूशन्सने अशा पॉलिसी आणल्या आहेत ज्या आग आणि संबंधित धोके, यंत्रसामग्रीतील बिघाड आणि व्यवसायात व्यत्यय आणणाऱ्या घटना (ज्यांचा समावेश विमा संरक्षणात आहे) इत्यादींसाठी विमा संरक्षण पुरवतात. उदाहरणार्थ, इलेक्ट्रिकल शॉर्टसर्किटमुळे लागलेली आग किंवा मुसळधार पावसामुळे आलेला पूर अशा काळात उत्पादन होऊ न शकल्याने होणारे नुकसान या पॉलिसीमध्ये कव्हर केले जाऊ शकते. त्यामुळे व्यवसाय वेगाने आपल्या पूर्ववत स्थितीला येण्यात मदत मिळते. लघु आणि मध्यम उद्योगांनी त्यांचे विमा संरक्षण पुरेसे आहे की नाही याचे मूल्यांकन करणे तितकेच महत्त्वाचे आहे, जेणेकरून दाव्याची रक्कम खरोखर झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात जुळून नुकसान भरून येऊ शकेल.

टाटा एआयजी जनरल इन्श्युरन्सचे ईव्हीपी आणि नॅशनल हेड - एसएमई, प्रणय शाह यांनी सांगितले, लघु व्यवसाय हे आपल्या अर्थव्यवस्थेचे आधारस्तंभ आहेत, तरीही जेव्हा काही समस्या उद्भवते तेव्हा त्यांना काहीच संरक्षण उपलब्ध नसते. टाटा एआयजीमध्ये आम्ही सुस्पष्ट आणि विश्वसनीय विमा योजना पुरवतो, ज्या फक्त संपत्तीचे रक्षण करत नाहीत तर व्यवसायाचे कामकाज सुरू राहील आणि त्यावर अवलंबून असलेल्या अनेक कुटुंबांची रोजीरोटी सुरक्षित राहील याचीदेखील काळजी घेतात.

TATA AIG INSURANCE
WITH YOU ALWAYS

## ॲमेझॉन फॅशनचा आजपासून 'वॉर्डरोब रिफ्रेश सेल'

**नाशिक :** ॲमेझॉन फॅशनने आज आपल्या १६व्या 'वॉर्डरोब रिफ्रेश सेल' (डब्ल्यूआरएस) ची घोषणा केली आहे. हा सेल ३० मे ते ४ जूनदरम्यान सुरू राहणार असून, यामध्ये ४ लाखांहून अधिक स्टाईल्ससह ॲमेझॉन फॅशनचा आतापर्यंतचा सर्वांत मोठा ब्रँड पोर्टफोलिओ सादर करण्यात येत आहे. यामध्ये कॅरटलेन, गॅप, वाइल्डक्राफ्ट आणि इतर २० हून अधिक ब्रँड्सच्या संग्रहांचा समावेश असलेले नवे रणनीतिक ॲडिशन्स करण्यात आले आहेत. यासोबतच जेन जेड साठी पुन्हा ब्रँड केलेले सर्व डेस्टिनेशन आणि प्रीमियम ब्रँड्ससाठी खास नवीन 'द प्रीमियम एडिट' हे डेस्टिनेशनदेखील सादर करण्यात आले आहे. या



एडिशनमध्ये ग्राहकांना ॲमेझॉनच्या विश्वासार्ह सेवा, सोयीस्कर खरेदी अनुभव आणि जलद डिलिव्हरीसोबत अविश्वसनीय पर्याय आणि टॉप ब्रँड्स उत्तम किमतीत खरेदी करण्याची संधी मिळणार आहे.

प्रीमियम फॅशनची आवड असलेल्या ग्राहकांसाठी गेस, अरमानी एक्स्चेंज, कालविन क्लेन, लॅकोस्टे, अलेक्झांडर ख्रिस्टी, मायकल कोर्स, मोकोबरा, टॉमी हिलफिगर, लुईज फिलिप, फॉजिल आणि इतर अनेक ब्रँड्सवरील आकर्षक पर्याय उपलब्ध असतील. फॅशन ट्रेंडला अनुसरून खरेदी करणारे ग्राहक अमेरिकन क्लासिक ब्रँड गॅप च्या नव्याने लॉन्च झालेल्या कलेक्शनचा आनंद किमान ३०% सवलतीसह घेऊ शकतात.या सेलमध्ये कॅरटलेन च्या फाईन ज्वेलरीचाही समावेश करण्यात आला असून, ग्राहकांना अमेझॉनच्या विश्वसनीय सेवेसह उत्तम कारागिरीचा अनुभव मिळणार आहे.

## व्हॅक्सफॅब एंटरप्राइजेसला ५९.३८ कोटी उत्पन्न

**नाशिक :** अहमदाबादस्थित व्हॅक्सफॅब एंटरप्राइजेस लि. ने मार्च २०२५ रोजी संपलेल्या मागील वर्षीच्या एकूण ९.२८ कोटी रुपये उत्पन्नाच्या तुलनेत वित्तीय वर्ष २०२४-२५ मध्ये ५९.३८ कोटी रुपयांचे उत्पन्न नोंदवले आहे. दरवर्षी उत्पन्नातील ही वाढ ५४० टक्क्यांची आहे. तर मागील वर्षीच्या याच कालावधीत ३.५७ कोटी रुपयांच्या निव्वळ तोट्याच्या तुलनेत वित्तीय वर्ष २०२४-२५ साठी कंपनीचा निव्वळ नफा ५८.४२ कोटी रुपये इतका नोंदवला गेला आहे. दरम्यान, कंपनीने मागील वर्षी १.३३ कोटी रुपयांच्या एकूण उत्पन्नाच्या तुलनेत २०२४-२५ या वित्तीय वर्षाच्या चवथ्या तिमाहीत ३.२३ कोटी रुपयांचे निव्वळ उत्पन्न नोंदवले आहे. दरवर्षी उत्पन्नातील ही वाढ १४३ टक्के आहे. कंपनीच्या गेल्या वर्षीच्या संबंधित कालावधीच्या ६१.४ लाख रुपयांच्या तुलनेत २०२४-२५ या वर्षातील चौथ्या तिमाहीतील नफा १.७८ कोटी रुपये आहे. त्यात दरवर्षी १९० टक्क्याने वाढ झाली आहे. तर कंपनीचा ईपीएस प्रती शेअर २.१२६ रुपये इतका होता.

१९८३ मध्ये स्थापित झालेली व्हॅक्सफॅब एंटरप्राइजेस लि. ही कंपनी शेती उत्पादनांच्या व्यापाराच्या व्यवसायात असून वस्त्रोद्योग आणि कपड्यांच्या व्यापार व्यवसायात विविधता आणण्याचा प्रस्ताव आहे. सर्व बाबी एकाच कॉर्पोरेट घटकाखाली ठेवल्या जातील. आमच्या नवीन विभागांमध्ये हे आमचे विविधीकरण सुलभ करील आणि या बदल्यात आम्हाला विविध क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात ग्राहकांना सेवा देण्यास सहाय्य करेल. कंपनीचा व्यवसाय दोन स्वतंत्र व्यवसायामध्ये विभागला गेला आहे, ज्यामध्ये शेती आणि कापड व कपड्यांचे व्यापार समाविष्ट आहे. २०२३ मध्ये कंपनीने खेळत्या भांडवली गरजांसह सामान्य कॉर्पोरेट हेतूंसाठी विस्तार योजनांना वित्तपुरवठा करण्यासाठी राइट इश्यूद्वारे १२.९६ कोटी रुपयांची उभारणी केली आहे.

VAXFAB ENTERPRISES LTD

## अकाली जन्मलेल्या बाळावर जसलोक हॉस्पिटलमध्ये यशस्वी शस्त्रक्रिया

**मुंबई :** जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरने एका दुर्मीळ आणि गंभीर प्रकरणात शस्त्रक्रिया आणि अतिदक्षता व्यवस्थापनाद्वारे ३० आठवड्यांच्या अकाली जन्मलेल्या १.३ किलोग्रॅम वजनाच्या आणि टाइप सी ट्रॅकिओ-इसोफॅजियल फिस्टुला (ढएक्र) या दुर्मीळ जन्मजात समस्येने ग्रस्त असलेल्या बाळावर यशस्वी उपचार केले. या जन्मजात समस्येमुळे श्वासनलिका आणि अन्ननलिकेमध्ये असामान्य जोड निर्माण होते, ज्यामुळे जास्त लाळ येणे, गुदमरणे तसेच फुफ्फुसांचा संसर्ग होण्याचा धोका वाढतो. वैद्यकीय टीमने एकाच टप्प्यातील शस्त्रक्रिया आणि नंतर इसोफॅजियल डायलटेशन केली. ही प्रक्रिया अशा नाजूक प्रकरणात प्रथमच यशस्वी झाली आहे. बहुविशेषज्ञ टीमच्या समन्वित प्रयत्नांमुळे बाळ आता स्थिर असून फक्त आईचे दूध घेत आहे. बाळाचे वजन १.८ किलो झाले आहे आणि लवकरच त्याला घरी पाठवण्यात येईल.

वापी, गुजरात येथे जन्मलेल्या या बाळाला या समस्येमुळे जीवघेण्या अडचणींना सामोरे जावे लागले. पालकांनी जसलोक हॉस्पिटलचे बालरोग विभागप्रमुख डॉ. फजल नबी यांच्याशी उच्चस्तरीय उपचारांसाठी संपर्क साधला. प्रकरणाच्या गंभीरतेचा विचार करून डॉ. नबी स्वतः वापीला गेले आणि बाळाला कृत्रिम श्वसनासह त्यांच्या देखरेखीखाली सुरक्षितपणे जसलोक हॉस्पिटलमध्ये आणले. बाळाला तत्काळ बालरोग अतिदक्षता विभागात दाखल करण्यात आले, जिथे डॉ. फजल नबी यांनी उपचारांची जबाबदारी घेतली. त्यावेळी बाळ व्हेंटिलेटरवर होते, इनोट्रोप्ससह हेमोडायनामिक स्टॅबिलायझेशन



करण्यात आले आणि सेप्सिसवरील उपचार सुरू करण्यात आले.

यानंतर प्रसिद्ध बालशल्यचिकित्सक डॉ. नार्गिश बारसिवाला यांच्याशी सल्लामसलत करण्यात आली. त्यांनी बाळ स्थिर झाल्यावर एकाच टप्प्यातील शस्त्रक्रिया करणे उचित असल्याचे सांगितले. तिसऱ्या दिवशी, डॉ. बारसिवाला यांनी फिस्टुला लिगेशन आणि इसोफॅजियल ॲनास्टोमोसिससह वन-स्टेज करेक्टिव्ह सर्जरी केली. त्यानंतर बाळाला पुन्हा अतिदक्षता विभागामध्ये हलवण्यात आले. शस्त्रक्रियेनंतरच्या काळात टीमला आतड्यांच्या हालचालींबाबत आणखी एक समस्याला सामोरे जावे लागले. प्रीमॅच्युरिटी आणि कमी वजनामुळे आतड्यांची हालचाल व्यवस्थित होत नव्हती. बाळाला एनजी ट्यूबद्वारे दूध देण्यात आले आणि काही प्रमाणात टोटल पॅरेन्टेरल न्यूट्रिशन दिले गेले. त्याला गिळण्यासही अडचण होत होती. साधारणतः एक महिना एनजी ट्यूबद्वारे फीड देण्यात आले आणि नंतर फीडिंग गॅस्ट्रोस्टोमीचा निर्णय घेण्यात आला व एनजी ट्यूब काढण्यात आली.

तथापि, एका महिन्यानंतरही बाळाला गिळण्यास अडचण येत होती. ही अडचण दूर करण्यासाठी गॅस्ट्रोस्टोमी प्रक्रिया करण्यात आली. रुग्णालयाच्या टीमने सर्वात छोटा उपलब्ध डायलटेर वापरून उच्च-जोखमीची इसोफॅजियल डायलटेशन प्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. ही नाजूक प्रक्रिया जसलोक हॉस्पिटलचे गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी सल्लागार डॉ. पंकज धवन यांनी पार पाडली. या प्रक्रियेमध्ये बालरोग अतिदक्षता विभागाचे प्रमुख डॉ. फजल नबी, डॉ. बारसिवाला आणि भूलतज्ज्ञ टीमचे महत्त्वपूर्ण सहकार्य लाभले. हळूहळू बाळ स्वतः गिळू लागले आणि अखेरीस एनजी ट्यूब काढण्यात आली.

डॉ. फजल नबी, संचालक, बालरोग विभाग, जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर म्हणाले, जेव्हा बाळ आले तेव्हा ते अत्यंत नाजूक आणि कमकुवत होते. त्याला तातडीच्या उपचारांची गरज होती. स्थिरीकरणापासून शस्त्रक्रियेनंतरच्या गुंतागुंतींच्या व्यवस्थापनापर्यंत, प्रत्येक पायरी काळजीपूर्वक नियोजित करावी लागली. इसोफॅजियल डायलटेशन हे विशेषतः आव्हानात्मक होते, पण आमच्या टीमने उत्तम समन्वयाने हे साध्य केले. आता बाळ स्वतः फीड घेत आहे आणि घरी जाण्यास तयार आहे.

डॉ. नार्गिश बारसिवाला, सल्लागार, बालशल्यचिकित्सा, जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर म्हणाल्या, १ किलोपेक्षा थोडे जास्त वजन असलेल्या अकाली बाळावर शस्त्रक्रिया करणे अत्यंत कठीण असते. ऊती अत्यंत नाजूक असतात, आणि चूक झाली तर जीव धोक्यात येऊ शकतो.



**कसं काय बरे, जेव्हा पाऊस पडतो तेव्हाच नेमकी कोणाची तरी खूप आठवण येते आणि कोणीतरी जवळचा हवा किंवा असायला हवा असे वाटायला लागते? याच वेळी बरे आपले जिभेचे चोचले पुरवले जावे, असा हट्ट धरला जातो.**

ऋतुजा अहिरे
नाशिक

# पाऊस आणि 'तो'



म्हणजेच माझ्या मैत्रिणीची गोष्ट बघा ना. असंच हॉस्टेलवर आमची चाय पे चर्चा वगैरे चालू होती आणि ही बया, मला बॉयफ्रेंड हवाय असं बोलून विषय कुठच्या कुठे घेऊन गेली. तेवढ्यात दुसरी उत्तरली, हो ना गं. काय हा मौसम मस्ताना पण गरज नसताना. आणि काय मग, आमची एकच हशा उडाला.

पाऊस, समोसा, कांदा भजी आणि सोबत फक्कड चहा! अहाहा! मग तर काही विचारूच नका. बाहेर थंडगार हवा आणि हातात गरमागरम चहा, सुख म्हणजे नक्की हेच असणार! आणि मग कमी असते ती फक्त गप्पांच्या मैफलीची. आणि अशा वेळी आपले हॉर्मोन्स पण अशा प्रकारे रिॲक्ट करतात की, आपल्याला एकटेपणा सहन होत नाही आणि म्हणूनच लोक आपल्या आजूबाजूला हवी असतात.

एकटेपणा आणि पाऊस याचा मला खूप जवळचा संबंध वाटतो. आपण कळत नकळतपणे आपल्या विचारात गुंग होऊन जातो. चित्रपटात दाखवता की, पाऊस आणि रोमान्स आपण आपल्या बाबतीत अनुभवू लागतो आणि मग हळूच रिॲलिटीची जाणीव होते आणि मग कोणीतरी हवे असे वाटू लागते.

चित्रपटांचा आपल्या विचारसरणीवर किती पगडा आहे हे यातून दिसून येते. जाहिरातींच्या बाबतीत देखील काहीसे असेच घडताना दिसते. चहा-पत्ती, बेसन, कॉफी किंवा चटपटीत असे काहीतरी खाण्याच्या पदार्थांची जेव्हा जाहिरात बनवली जाते, तेव्हा बऱ्याच अंशी पावसाचा संदर्भ वापरला जातो. आणि मग झाले! आपणदेखील पावसाच्या बाबतीत उंच उंच अपेक्षेचे डोंगर बांधतो, पण मुळात पाऊस आणि चिकचिक या जिव्हाळ्याच्या नात्याचा आपल्याला विसर पडतो. आणि म्हणूनच की काय, टीव्ही आणि खरे आयुष्य याचा काही ताळमेळ बसत नाही.

पण ते काहीही असो, सध्याच्या काळात, मोबाइल फोन, सोशल मीडिया, टीव्ही, जाहिराती यामुळे ऋतूंबद्दल समज थोडा बदलू लागला आहे. म्हणजे पावसात वाफाळलेल्या चहाचा किंवा कॉफीचा फोटो स्टोरी म्हणून अपलोड करणे म्हणजे मेंडेटरी गोष्ट झाली आहे. नाहीतर लोकांना फोमो होण्याची भीती असते. अहो, फोमो म्हणजे ते फीअर ऑफ मिसिंग आऊट वगैरे नसते का! आणि थंडीत कुठे तरी हिल स्टेशनवर जाऊन विंटर लव्ह ट्रॅव्हल ववैरे हॅशटॅग वापरून फोटो पोस्ट करावेच लागतात. हो, म्हणजे नियमच आहे तसा! बाकी, पाऊस आणि तो फील जरी एक असला तरी, 'पाऊस आणि तो' याची व्याख्या सगळ्यांसाठी वेगळी झाली आहे. पण खरी मजा यात आहे की, अजूनदेखील पाऊस आला तर तो (चहा) सगळ्यांनाच आठवतो, ही काळी दगडावरची रेघ म्हटले तरी वावगे ठरणार नाही! ■

## नोकरी

### पुणे महानगरपालिका भरती

- पद : पर्यावरण व्यवस्थापक, सिटी कोऑर्डीनेटर.
- एकूण रिक्त पदे : ०३ पदे.
- नोकरी ठिकाण : पुणे.
- अर्ज करण्याची पद्धत : ऑफलाइन.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख : ११ जून २०२५.
- अर्ज सादर करण्याचा पत्ता : आयुक्त पर्यावरण, पर्यावरण विभाग, पुणे महानगरपालिका, शिवाजीनगर, पुणे-४११००५
- वेबसाइट : https://www.pmc.gov.in/

### जिल्हा सिव्हिल हॉस्पिटल

- पदाचे नाव : आर्ट स्टाफ नर्स.
- एकूण रिक्त पदे : ०१ पदे.
- नोकरी ठिकाण : मालेगाव, जिल्हा नाशिक.
- शैक्षणिक पात्रता : बी.एस्सी नर्सिंग किंवा जीएनएम.
- वेतन/ मानधन : दरमहा रु. २१,०००/-.
- वयोमर्यादा : ६० वर्षांपर्यंत.
- अर्ज करण्याची पद्धत : ऑफलाइन.
- अर्ज प्रक्रिया सुरू होण्याची तारीख : २६ मे २०२५.
- अर्ज करण्याची शेवटची तारीख : ०९ जून २०२५.
- अर्ज सादर करण्याचा पत्ता: जिल्हा सिव्हिल सर्जन, जिल्हा सिव्हिल हॉस्पिटल, प्रशासकीय इमारत, त्र्यंबक रोड, गोल्फ क्लब ग्राउंडजवळ, नाशिक जिल्हा नाशिक पिन कोड ४२२००२.
- वेबसाइट :https://nashik.gov.in/

**पहिले लेक्चर ८.३० ला. डोळे अजूनही झोपाळलेले. पण तरीही टी-शर्ट आणि जीन्सचा मॅचिंग विचार केलाय! कारण कॉलेजमध्ये दिसणं म्हणजे फक्त पाहणं नाही, तर एक प्रकारचं स्टेटमेंट आहे.**



# कॉलेजमध्ये वेळेनुसार वॉर्डरोब

**सकाळचा साज - 'स्लीप से निकलते हुए सिंपल लूक'**

सकाळी ८.३० म्हणजे 'लेट उठलो पण तरी स्टाइल झळकलीच पाहिजे' असा टाइम स्लॉट. इथे बरेच 'नो मेकअप लूक' करणारे चेहरे दिसतात - पण खरे तर तेच खूप विचारपूर्वक ठरवलेले असतात. टायड अप बन्स, ओव्हरसाइझ शर्ट्स, कॅज्युअल स्नीकर्स - हे झालंच पाहिजे!

**दुसऱ्या लेक्चरनंतरचा स्वॅग - 'थोडा अजून जागा झालोय लूक'**

आता चेहऱ्यावर उत्साह येतो. तोच लूक अपडेट केला जातो. फुल स्लीव्हज रोल करून बनवणं, बॅगचं स्ट्रॅप थोडं वाकडं टाकणं आणि कानात अतरंगी टॉप्स - छोट्याशा गोष्टी पण मोठा फरक करतात.

**कॅन्टीन टाइम म्हणजे पर्सनल रॅम्पवॉक**

लंचचा ब्रेक म्हणजे पोटासाठी थोडं, पण स्टाइलसाठी खूप वेळ! ग्रुप फोटोसाठी परफेक्ट लूक लागतोच. इथे फ्रेंड्स एकमेकांच्या टी-शर्टवर कमेंट करताना हे कुठून घेतलंस? हा प्रश्न हमखास येतो. कधीकधी वाटतं - कॅन्टीनपेक्षा कॅटवॉक टीन असं नाव द्यावं.

**प्रॅक्टिकल क्लासेससाठी - 'ॲक्टिव्ह लूक विद ॲटिट्यूड'**

डेनिम जॅकेट, स्ट्रेट हेअर आणि बूट - कारण अर्धा वेळ स्टँडिंग आणि बाकी वेळ 'कूल' दिसण्यात जातो. क्लासमध्ये काहीही झालं तरी लूक अपग्रेड झालेला असतो. अर्थात, बघणाऱ्यांनी ओळखलं पाहिजे.

**वर्कशॉप, प्रेझेंटेशन आणि सडन सेमिनार - 'फॉर्मल पण फंकी'**

एक दिवस असतो जिथं लेक्चरमध्ये 'प्रोफेसर' तुमच्याकडं खरंच बघतात. कारण तुम्ही आलेले असता - शर्ट घालून, एखादी फॉर्मल स्कर्ट किंवा कुर्ता जीन्सवर. चेहऱ्यावर स्माइल आणि आतून टेन्शन असतं, पण लूकवरून ते कळत नाही. प्रोफेशनल+पॉवरफुल=कॅम्पस क्वीन वाइब.

**बिल्डिंगच्या जिन्यातली फॅशन गॅलरी**

क्लासेसमधल्या 'पॅसेजमध्ये' किंवा जिन्याच्या वळणावरून रोजच्या फॅशन पॅटर्न्सचा अंदाज घेतला जातो. कोणती फ्रेंड नवा बॅग स्टाइल घेऊन आली, कोणी ट्रेंडी मफलर घातला - कॉलेजचा हा न दिसणारा पण 'हिट रुटीन' आहे.

'मी आज काय घालणार?' - हा प्रश्न फक्त आरशात नाही, ग्रुपमध्येही चर्चेत!

Whatsapp ग्रुपवर 'आज काय?' हा प्रश्न इतकाच गंभीर असतो जितकं एखाद्या प्रोजेक्टचं डेडलाइन. कारण स्टाइल हे सेल्फ-एक्स्प्रेशन आहे आणि कॉलेज म्हणजे रोज स्वतःचं नवं रूप दाखवायचं व्यासपीठ!

**फॅशन म्हणजे ब्रँड नाही, अटिट्यूड!**

कधी बुटीकचे कपडे, कधी स्ट्रीट स्टाईल, तर कधी आईच्या जुना चुंदडीचा दुपट्टा - फॅशनचं बंधन नाही. जो आपल्या मूडला शोभेल, तो आजचा परफेक्ट लूक! काही जणींचा स्टाइल हा 'मूड ऑन डिस्प्ले' असतो - म्हणजेच तिचा दिवस तिच्या आउटफिटवरून कळतो.

**लास्ट लेक्चरचा 'लेट-इन' आणि 'लूक-आऊट' मूड**

शेवटचं लेक्चर असतं तेव्हा बऱ्याच जणींच्या चेहऱ्यावर थकवा आणि डोळ्यांत 'कट्टा वर जायचंय!' असं लिहिलेलं असतं. पण मग एखादं हेअर ॲक्सेसरी, ब्रेसलेट किंवा हुशार पर्सनॅलिटी टिप नजरेत भरते - आणि फॅशनचा हा सुंदर प्रवास दिवसभरात पूर्ण होतो. शेवटी... कॅम्पसवरचा प्रत्येक दिवस म्हणजे एक नवीन पान - ज्यावर स्टाईल, स्टोरी आणि स्वतःचं स्पेस एकत्र मांडलेलं असतं. फॅशन इथे 'कपड्यांपुरती' नसते - ती तरुणींच्या आत्मविश्वासाची, सर्जनशीलतेची आणि मैत्रीच्या धमाल क्षणांची गोष्ट असते! ■

# MPSC ची तयारी जॉब करतानाही करू शकता




दरवर्षी हजारो उमेदवार MPSC परीक्षेला बसतात. या सर्वांची घरची आणि वैयक्तिक परिस्थिती एकमेकांपेक्षा वेगळी असते. काही उमेदवार आपला पूर्ण वेळ MPSC परीक्षेच्या तयारीसाठी देऊ शकतात, तर काहींच्या स्वतःच्या जबाबदाऱ्या असता. असे बरेच लोक आहेत जे त्यांच्या पूर्णवेळ नोकरीसोबत नागरी सेवा परीक्षेची तयारी देखील करतात. जर तुम्ही नोकरीसोबतच MPSC परीक्षेचीही तयारी करत असाल तर आज आम्ही तुम्हाला अशा काही टिप्स देणार आहोत ज्यामुळे तुम्ही नोकरी आणि अभ्यास दोन्ही सांभाळून घेऊ शकाल. चला तर मग जाणून घेऊया. जर तुमचे संपूर्ण लक्ष फक्त तुमच्या परीक्षेकडे असेल तर तुम्ही पहिल्याच प्रयत्नात MPSC सहज क्रॅक कराल. असे अनेक उमेदवार आहेत ज्यांनी त्यांच्या पूर्णवेळ नोकरीसह MPSC परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्याच्या अभ्यासाच्या टिप्स तुमच्यासाठीही खूप प्रभावी ठरू शकतात.

**वेळेचे योग्य व्यवस्थापन आवश्यक :**

बहुतेक उमेदवार वेळ व्यवस्थापन हा अभ्यासाचा सर्वांत मोठा मंत्र मानतात. जर तुम्ही वेळेचे व्यवस्थापन करून अभ्यास केलात तर तुम्ही निश्चितपणे तुमची नोकरी आणि अभ्यास पूर्ण करू शकाल. वेळेचे व्यवस्थापन पाळण्याची सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे जेव्हाही तुम्ही वाचाल तेव्हा पूर्ण एकाग्रतेने वाचा आणि तुमचे लक्ष विचलित होऊ देऊ नका. तयारीच्या वेळी निकालाची काळजी करू नका. अभ्यासाच्या वेळी नोकरीचा विचार करू नका.

**वेळ वाया जाऊ देऊ नका :**

अनेक उमेदवार नोकरीसोबतच MPSC परीक्षेची तयारी करतात. जर दिवसातील १-१ मिनिटांचा योग्य वापर केला तर ही परीक्षा उत्तीर्ण होणे कठीण नाही. सकाळी ऑफिसला जाण्यापूर्वी आणि परत आल्यावरही अभ्यास करा. ऑफिस दूर असल्यास वाटेतही अभ्यास करता येईल. त्याचबरोबर ऑफिसच्या लंच टाइममध्ये लंच लवकर संपवून रिव्हिजनही करता येते. एकाग्रता ठेवा MPSC ची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांनी नेहमी त्यांचे लक्ष आणि एकाग्रता राखली पाहिजे. आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवा आणि नकारात्मक विचार आणि विचारांपासून दूर राहा.

**अभ्यास फोकस ठेवा**

MPSC परीक्षेच्या तयारीदरम्यान असे अनेक क्षण येतील, जेव्हा तुम्ही हार मानायला सुरुवात कराल किंवा स्वत:ला कमकुवत वाटू शकाल. या प्रकारच्या परिस्थितीत, अशा लोकांभोवती रहा जे तुम्हाला प्रेरित करू शकतात. तसेच, तुमच्या ध्येयावर लक्ष केंद्रित करा. ■

**कमी उंचीच्या मुलीही सौंदर्यात कोणाच्याहीपेक्षा कमी नसतात यात शंका नाही, पण अनेकदा त्यांच्या कमी उंचीमुळे त्यांना कमी आत्मविश्वासाला सामोरे जावे लागते. लोक त्यांची खिल्लीही उडवतात, पण जर तुमची उंची जास्त नसेल आणि तुम्हाला कॉन्फिडंट आणि स्टायलिश दिसायचे असेल. तुम्ही काही खास फॅशन टिप्स फॉलो करू शकता. त्यामुळे सर्वांच्या नजरा तुमच्यावर खिळून राहतील.**

ज्योती हांडगे
फॅशन डिझाइनर

# उंची आणि स्टाइल

## स्टायलिश दिसण्यासाठी हे करा

**१. गुडघ्याइतक्या लांबीचे स्कर्ट घाला**

कमी उंचीच्या मुली अनेकदा स्लिम असतात, त्यामुळे गुडघ्यापर्यंतचे स्कर्ट त्यांना शोभतात. मिडी स्कर्ट किंवा मॅक्सी परिधान करणे आपल्यासाठी वाईट निवड ठरू शकते, कारण यामुळे आपण आणखी तरुण दिसाल. त्याचबरोबर स्कर्ट तुमची उंची अधिक चांगल्या प्रकारे सादर करेल आणि क्यूटनेसही वाढवेल.

**२. अँकल बूट्स**


अँकल बूट आपल्याला मॉडर्न लूक देण्याचे काम करतात, हिवाळा असो वा उन्हाळा प्रत्येक ऋतूत हे बूट परिधान केले जाऊ शकतात. तर गुडघ्या इतक्या लांबीचे बूट फक्त हिवाळ्यातच परिधान केले जाऊ शकतात. अँकल बूट घालणे तितकेसे अवघड नाही, तसेच ते परिधान केल्यानंतर लोकांच्या नजरा तुमच्या उंचीवर कमी आणि पादत्राण्यांवर जास्त असतील.

**३. हार्ड-वेस्ट फ्लेयर जीन्स**

हा नेहमीच ट्रेंड राहिला आहे, ज्याला बेल बॉटम असेही म्हणतात. या प्रकारची जीन्स तुम्हाला स्टायलिश लूक तर देतेच, शिवाय अगदी कम्फर्टेबलदेखील आहे. हे परिधान केल्यानंतर तुम्ही हिरोईनपेक्षा कमी दिसणार नाही आणि तुमचे पाय लांब दिसतील. त्यासोबत हाय हील्स घातल्यास सौंदर्य चमकेल.



## माय क्लिक


निकिता सूर्यवंशी


प्रियंका निकुंभ


पूजा पगारे


वर्षा उगले


रोहिणी सूर्यवंशी

**माणसाचा स्वभाव गुणधर्म आहे की, त्याच्या मनासारखं झालं नाही की त्याला राग येतो, पण हा राग कधीकाळी माणसाचाच शत्रू ठरतो आणि माणसाचा सर्वनाश करून टाकतो. मग तो माणूस गरीब, श्रीमंत असा कोणताही भेद पाहत नाही. ज्या माणसाला राग येतो त्याची अगदी शरीर प्रकृती कृष असली तरी देखील तो बलाढ्य अशा योद्ध्यावर मात करू शकतो हे विसरता कामा नये.....**



# संयम..!

विलास पंचभाई
- स्ट्रेस कमी करा -
भाग क्रमांक ४१

आपण पाहतो की, रावणाने रामाला अगदी क्षुल्लक समजला पण त्या रामाने दशावतारी रावणाची दाणादाण उडविली. इतिहास यासाठीच असतो की त्यातून काही तरी बोध घ्यावा..

कालपरवा एका मित्राचा वाद झाला...पहिल्या मित्राने गंमत केली पण समोरच्या मित्राने शिव्यांची लाखोली वाहिली...ठरवलं असतं तर पहिल्या मित्राने पण शिवीगाळ केली असती, हात उचलला असता, पण त्याचं पर्यवसान भांडणात झालं असतं पण त्याने संयम ठेवला व सॉरी म्हटलं...म्हणजेच काय की, सॉरी या शब्दाने भडकणारी आग विझायला मदत झाली....

आपण पाहिले आहे की युनियन कामगार व्यवस्थापन यात ही संघर्ष होताना दिसतात..यामुळे मुंबईचा कामगार देशोधडीला लागला...का तर दोघांनाही आपला अहंकार महत्त्वाचा वाटला व गिरणी कामगार युनियन व उद्योग मुंबईच्या नकाशावरून गायब झाले...

कालपरवाच भारत आणि पाकिस्तानचे युद्ध झाले. पाकिस्तानने भारतावर कुरघोडी केली पण भारताने त्याची जागा दाखवून दिली व संयम राखला. नाहीतर पाकीस्तान राख झाला असता, पण त्याची क्षती भारतालाही पोहचली असती, पण पंतप्रधानांनी संयम व शहाणपण दाखवून जगासमोर आदर्श ठेवला...!

आजकाल घटस्फोटाचेही पेव मोठ्या प्रमाणात फुटले, कारण या मागे फक्त आणि फक्त वाढता अहंकार आणि संयम न ठेवल्यामुळे दोघांमधले अंतर वाढल्यामुळे प्रकरण विकोपाला जात आहे....हेच प्रकरण निरंतर संवादाने संपुष्टात येऊ शकतात, पण यासाठी निरंतर संवाद वाढला पाहिजे. एकमेकांना समजून घेतले पाहिजे.. म्हणजेच कोणीतरी एकाने राग गिळला पाहिजे...

राग हा खऱ्या अर्थाने स्ट्रेस निर्माण करण्याचे काम करतो. रागाला कंट्रोल करण्याचे रिमोट जर तुमच्याकडे असेल तर तुम्ही भाग्यवान आहात...!

आपण अनेक ठिकाणी पेपरमध्ये ही बातमी वाचतो की, घरगुती भांडणावरून दगडाने ठेचून याची हत्या, तिची हत्या, कारण काही फार मोठं नसतं. फक्त मनावर ताबा न मिळवल्यामुळे या गोष्टी घडतात.. पश्चात्ताप होतो पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो.. तो आयुष्यातून संपलेला असतो. हा आयुष्यातून उठलेला असतो..कारण काय तर म्हणे सिगारेट पेटवू दिली नाही... काही वेळा बोललं जातं फरक काय पडतो? तर नक्कीच पडतो न भाऊ..! तेव्हा जरा सबुरीने घ्या..

राग जिरवायला शिका ही मात्रा सर्वत्र लागू पडते. घर संसार, ऑफिस, राजकारण, राज्य, देश पातळीवर कुठेही... निर्णय नक्कीच घ्या पण त्यात आपले हित असले पाहिजे. फायदा-तोट्याचा विचार करता आला पाहिजे, नाहीतर उचलला बॉम्ब टाकला...असे नको.. सल्लामसलत करा, चित्त शांत ठेवा, त्याग करा. पहिल्या अनुभवाने शहाणे व्हा...!

राग हा कधी येतो.. तर दोघांतील अंतर वाढलं तर, संवाद नाहीसा झाला तर, अहंकार वाढला तर, स्वतः:चा लोभ वाढला तर, दोघांत तुलना केली तर ... कुणाला ही कमी समजू नका..

यावर उपाय एकच सतत प्रयत्न करा, अभ्यास करा, संवाद वाढवा, सातत्य ठेवा, सकारात्मक रहा.. आत्मविश्वास ठेवा..! आत्मविश्वास गमावलेली माणसं कधीच विजयापर्यंत पोहोचू शकत नाही... मित्रांनो, मूठ आवळण्यात मर्दानगी नाही तर खरी मर्दानगी आहे राग जिरवण्यात..! ■

# निफाडच्या 'केजीएस' प्रकरणी ईडीची छापेमारी

## नाशिक, मुंबई व शिर्डी येथून कोटींची स्थावर, जंगम मालमत्ता जप्त

**निफाड : तालुका प्रतिनिधी**

तालुक्यातील पिंपळगाव निपाणी परिसरात असलेल्या केजीएस शुगर अँड इन्फ्रा कार्पोरेशन लिमिटेडच्या नाशिक, मुंबई व शिर्डी येथील स्थावर आणि जंगम मालमत्तेवर अंमलबजावणी संचालनालयाने अर्थात ईडीने छापे टाकले. या छाप्यात ईडीच्या अधिकाऱ्यांनी ७०.३९ लाखांची रक्कम, १.३६ कोटींचे सोन्याचे दागिने, आलिशान बीएमडब्ल्यू कार व दहा लाख रुपयांचे डिमॅट खाते शेअर्स हार्ड डिस्क बेनामी ३२ संबंधित कागदपत्रे आणि रेकॉर्ड जप्त केले आहे.

सविस्तर वृत्त असे की, केजीएस साखर कारखान्याने तत्कालीन काही राष्ट्रीयीकृत बँकांकडून साडेतीनशे कोटी रुपये कर्जरूपी घेऊन त्याची परतफेड न केल्याचे बोलले जात आहे. तसेच बनावट कागदपत्रांच्या आधारे ३५० कोटींहून अधिकची कर्जे मिळून नंतर ही रक्कम स्वतः च्या वैयक्तिक फायद्यासह मालमत्ता खरेदीसाठी वळून बँकेची फसवणूक केल्याप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने मेसर्स केजीएस शुगर अँड इन्फ्रा कंपनी संचालकांच्या नाशिक, कोपरगाव, ठाणे येथील व्यावसायिक आणि निवासी ठिकाणांवर छापे टाकले. शेतकरी संघटनेचे दिवंगत नेते प्रल्हाद पाटील कराड यांच्या पुढाकारातून केजीएस शुगर अँड इन्फ्रा कंपनीची स्थापना झालेली आहे. संचालक मंडळात आदित्य आणि त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश असल्याचे दिसून येते. कंपनीचे संचालक दिनकर बोडके व इतरांविरुद्ध जालना जिल्ह्यातील पोलीसठाण्यात दाखल फसवणुकीच्या गुन्ह्याच्या आधारे ईडीने तपास सुरू केला. त्यात केजीएस शुगरने कॅनरा बँकेच्या नेतृत्वाखालील बँकांच्या संघाकडून फसवणुकीने सुमारे ३५० कोटी रुपयांचे कर्ज मिळवले, त्यानंतर संशयितांनी विविध संस्थांच्या माध्यमातून तो निधी पळवला. वेगवेगळे व्यावसायिक व्यवहारांच्या नावाखाली अपहर केल्याचे निष्पन्न झाले. मनी लॉन्ड्रिंग प्रतिबंधक कायद्यान्वये सक्तवसुली संचालनालयाच्या मुंबई विभागाने कंपनीशी संबंधित संचालकांच्या नाशिक, कोपरगाव, ठाणे येथील व्यावसायिक आस्थापना व निवासस्थानांवर छापे टाकत काही कागदपत्र जप्त केले आहे. ईडीने ही छापेमारी २३ मे रोजी केली होती, असे समजते.

### निफाडची कारखानदारी संपुष्टात

एकेकाळी साखर कारखानदारीत निफाड तालुक्याची ओळख होती. निफाड साखर कारखान्यात दिवंगत नेते प्रल्हाद पाटील कराड अनेक वर्षे संचालक, तसेच चेअरमन राहिलेले होते. सहकाराची उत्तम जाण आणि दांडगा जनसंपर्क यामुळे त्यांनी तालुक्यातून भागभांडवल जमा करत पिंपळगाव निपाणी परिसरात कादवा, गोदा साखर कारखान्याची निर्मिती केली होती. साहजिकच तालुक्यात तीन तीन साखर कारखाने तयार झाल्याने ऊसटंचाई भासू लागली. कमी ऊस गाळपामुळे कारखान्यांवर कर्ज वाढत गेले. त्यामुळे प्रारंभी निसाका, त्यानंतर रासाका वाढत्या कर्जामुळे बंद पडला. केजीएसचीदेखील तशीच अवस्था झाली. सध्या तालुक्यात एकही कारखाना सुरु नाही. त्यातच या तीनही साखर कारखान्यांकडून ऊस पुरवठा करणारे शेतकरी, कामगार, ठेकेदारांनी घेणे आहेत. आजच्या परिस्थितीत हे तीनही कारखाने सुरू होणे अवघड बनले आहे.

## महत्त्वाचे



### सुरगाणा, देवलदरीत नेत्रतपासणी शिबिर

**सुरगाणा : प्रतिनिधी** धरमपूर येथील रामचंद्र हॉस्पिटलच्या सहकार्याने सुरगाणा तालुक्यातील सुरगाणा, देवलदरी व भदर येथे नेत्र व रक्त तपासणी शिबिर झाले. शिबिरात शेकडो नागरिकांनी सहभाग नोंदविला. नेत्र तपासणीदरम्यान गरजूंना मोफत चष्मे देण्यात आले. दरम्यान, व्यापारी राजेंद्र कानडे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन झाले. निबा बागूल, नितेश सूर्यवंशी, मयूर सूर्यवंशी, विनायक जंगम, रवी वाघ, छोटू आहेर प्रमुख पाहुणे होते. नगरसेवक रमेश थोरात मित्रपरिवार व नगरसेवक विजय कानडे यांच्या संयुक्त पुढाकाराने हे शिबिर झाले.

### मालेगाव तलाठी संघटना अध्यक्षपदी पालवे



**मालेगाव : प्रतिनिधी** मालेगाव तलाठी संघटनेच्या अध्यक्षपदी राजेंद्र पालवे, तर सरचिटणीसपदी गोविंद तिडके यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. संघटनेची नूतन कार्यकारिणीच्या निवडीसाठी बुधवारी (दि.२८) सर्वसाधारण सभा घेण्यात आली. सभेत अध्यक्ष व उपाध्यक्षांसह अन्य पदाधिकाऱ्यांची एकमताने निवड केली. यावेळी उपाध्यक्षपदी ज्ञानेश्वर कारंड, महेश गडाख, संघटकपदी प्रकाश चव्हाण, ज्येष्ठ मार्गदर्शक म्हणून वसंत खोटरे, सहसरचिटणीसपदी चेतन दळवी, खजिनदारपदी ज्ञानेश्वर देशमुख, महिला प्रतिनिधी म्हणून उज्ज्वला नंदन, आरती गोपाळे, मनीषा पवार यांची निवड करण्यात आली. कार्यकारिणी सदस्यांमध्ये दशरथ अहिरे, राहुल बिडगर, उमेश पाटील यांचा समावेश आहे.



### मुंजवाडला सभापती, उपसभापतींचा सत्कार

**खमताणे : प्रतिनिधी** मुंजवाड ग्रामपंचायत व ग्रामस्थांतर्फे ग्रामपंचायत कार्यालयात सटाणा कृषी उत्पन्न बाजार समिती नवनिर्वाचित सभापती, उपसभापती व संचालक मंडळाचा नुकताच सत्कार करण्यात आला. बाजार समितीच्या नवनिर्वाचित सभापती सिंधुताई सोनवणे, उपसभापती हरी अण्णा जाधव व संचालक मंडळाचा शाल-श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सभापती व उपसभापतींनी शेतकऱ्यांच्या हितासह शेतमालाला योग्य भाव मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू, असे सांगितले. उपसभापती हरी जाधव शेतकऱ्यांच्या सुखा-दुःखात खंबीरपणे उभे राहतील. असाच आशीर्वाद राहिला तर ते सटाणा कृषी उत्पन्न बाजार समिती सभापती होऊ शकतात, असे सांगण्यात आले.

### दिंडोरी-उमराळे रस्ता दुरुस्तीच्या प्रतीक्षेत

**उमराळे बुद्रुक : वार्ताहर** दिंडोरी तालुक्यातील दिंडोरी ते उमराळे बुद्रुक रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. मात्र, संबंधित यंत्रणा या रस्त्याकडे डोळेझाक करीत आहे. या रस्त्यावरून वाहनांची मोठी रेलचेल सुरू असते. रस्त्यावर छोटे-मोठे खड्डे पडले आहेत. रस्त्याची डागडुजी करावी, अशी मागणी आहे. उमराळे बुद्रुक ते दिंडोरी रस्त्यावरून वणी, पिंपळगाव बसवंत या मार्गे गुजरात-पेठ राष्ट्रीय महामार्गावरून जाण्यासाठी जड वाहनांची गर्दी असते. राज्य सरकारने सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी मंजूर केलेल्या रस्त्याचे काम २०२७ पर्यंत पूर्ण केले जाईल, असे सांगण्यात येते. या रस्त्याचे काही ठिकाणी डांबरीकरण, तर काही ठिकाणी खड्डे बुजवण्यात आले. जांबुटकेजवळ उमराळे बुद्रुक येथे सिमेंट काँक्रिटीकरण केले. मात्र, ते निकृष्ट दर्जाचे झाल्याने वाहनधारकांना कसरत करावी लागते. दिंडोरी ते उमराळे बुद्रुक या रस्त्यावरून पावसाळ्यात चालणेही अवघड होते. सार्वजनिक बांधकाम विभाग, खासदार व लोकप्रतिनिधींनी लक्ष घालून, रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी मागणी आहे.



### चिंचावडवासीयांचे स्नेहसंमेलन उत्साहात

**मालेगाव : प्रतिनिधी** तालुक्यातील चिंचावड येथील मात्र रोजगारानिमित्त नाशिक येथे स्थायिक झालेल्या नागरिकांचे स्नेहसंमेलन नुकतेच त्र्यंबकेश्वर रोडवरील हॉटेल संस्कृतीमध्ये उत्साहात झाले. गावाबाहेर राहूनसुद्धा आपापसातील नाळ घट्ट ठेवण्याच्या उद्देशाने आयोजित या संमेलनात सुमारे ६५ रहिवाशांनी सहभाग घेतला. प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीला ज्येष्ठांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन केले. उपस्थितांनी ओळख करून देत आपण नाशिकमध्ये कधी आलो, तसेच व्यवसाय व परिवाराविषयी ओळख करून दिली. यापुढे आयुष्यात शैक्षणिक, सामाजिक, व्यावहारिक आणि सुख-दुःखात एकमेकांना मदत होईल, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले. एकाच शहरात राहूनसुद्धा अनेक लोकांना आपण ओळखतही नाही, ही तोंडओळख होणे गरजेचे आहे, असे प्रा. प्रतीक बच्छाव यांनी प्रास्ताविकात विशद केले. प्रा. राजेश बेदमुथा यांनी सूत्रसंचालन केले. संमेलन यशस्वितेसाठी राजेंद्र चव्हाण, प्रा. राजेश बेदमुथा, प्रा. प्रतीक बच्छाव, जशवंत पाटील, साहेबराव पवार, अमृत पवार आदींनी परिश्रम घेतले.

### भाजपाच्या रहाणेंचा वाढदिवसानिमित्त सत्कार



**येवला : प्रतिनिधी** शहरातील ऐतिहासिक शिवजयंती उत्सव समितीतर्फे येथील भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते पुरुषोत्तम रहाणे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा करण्यात आला. शहरातील पाटोळे गल्लीमध्ये हा सोहळा झाला. समितीचे अध्यक्ष सुभाष पाटोळे यांच्या हस्ते रहाणे यांचा यथोचित सत्कार झाला. याप्रसंगी किशोर सोनवणे, सुरेश जोरी, संजय नागडेकर, शरद राऊळ, संजय नागडेकर, अनिल हलवाई, गणेश सोनवणे, अमित मेहता व कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, येथील अजिंक्यतारा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष प्रकाशराव कोल्हे यांच्या हस्ते पुरुषोत्तम रहाणे यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.हुडको कॉलनीतील अजिंक्यतारा कॉम्प्लेक्समध्ये हा कार्यक्रम झाला. याप्रसंगी शिवसेना नेते किशोर सोनवणे, युवा नेते गणेश सोनवणे, ज्येष्ठ पत्रकार विलास पगारे, अजिंक्यतारा शिक्षण प्रसारक मंडळाचे संचालक गणेश कोल्हे आदींसह असंख्य नागरिक उपस्थित होते.

# गाजरवाडी शिवारात नऊ किलो गांजा जप्त

## निफाड पोलिसांची कारवाई; संशयित मुद्देमालासह ताब्यात

**निफाड : प्रतिनिधी**



तालुक्यातील गाजरवाडी शिवारात अवैध गांजाची विक्री करणाऱ्या तरुणास निफाड पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून ९ किलो २६३ ग्रॅम गांजा जप्त करीत त्याच्याविरुद्ध निफाड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सविस्तर वृत्त असे की, निफाडचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, गाजरवाडी येथील शिंदे वस्ती परिसरात अवैधरीत्या गांजाची विक्री करत असलेल्या शिरीष शरद शिंदे (वय २२) या तरुणास पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याच्याकडून एक लाख ८५ हजार २६० रुपये किमतीचा नऊ किलो २६३ ग्रॅम गांजा जप्त केला. बेकायदेशीर मानवी मनावर विपरीत परिणाम करणारा गांजा नावाचा अमली पदार्थ कब्जात बाळगून विक्री करताना मिळून आल्याने शिरीष शिंदेविरुद्ध निफाड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. ग्रामीणचे पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, ग्रामीणचे उपविभागीय पोलीस अधिकारी हरीश खेडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी नीलेश पालवे यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निफाडचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, सपोनि ईश्वर पाटील, अनिल शेरेकर, कपालेश्वर ढिकले, भास्कर पवार, सोनाली शिंदे, विनोद जाधव, राजेंद्र दराडे, विक्रम लहाने, रंगनाथ सानप, हेमंत गिलबिले, प्रदीप बहिरम यांच्या पथकाने ही कामगिरी करीत अवैध गांजा विक्री करणाऱ्यासह मुद्देमाल ताब्यात घेतला.

# ऑनलाइन अकरावी प्रवेशाची हेळसांड थांबवा

## प्रा. मोरे यांची मागणी, रजिस्ट्रेशनसाठी गर्दी, वेबसाइड हँग

**मालेगाव : प्रतिनिधी**



राज्यात दहावीच्या एकूण निकालाची टक्केवारी ९४.१० टक्के असल्याने अकरावी प्रवेशासाठी गर्दी होणार आहे. यावेळी ऑनलाइन पद्धतीने प्रवेश देण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. असा प्रवेश पहिल्यांदाच घ्यावा लागत असल्याने विद्यार्थ्यांसह पालकांची होत असलेली हेळसांड थांबवावी, अशी मागणी कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेचे मालेगाव तालुकाध्यक्ष प्रा. रवींद्र मोरे यांनी केली आहे.

प्रा. मोरे यांनी सांगितले की, सध्या महाविद्यालयात येऊन रजिस्ट्रेशनसाठी विद्यार्थी व पालकांची गर्दी होत आहे. ग्रामीण भागातील पालक अवकाळी पावसाने त्रस्त आहेत. शेती मशागतीची कामे महत्त्वाची असतानाही ती सोडून आपल्या पाल्याच्या प्रवेशासाठी येताना दिसत आहे. यापूर्वी २१ ते २८ मेदरम्यान रजिस्ट्रेशनसाठी मुदत होती. मात्र, एकाचवेळी रजिस्ट्रेशनसाठी झुंबड उडत असल्यामुळे वेबसाइटवर लोड पडत आहे. परिणामी, ती हँग होत असून, लवकर सुरू होत नाही. शासनाने २६ मे ते ३ जून अशी नवीन मुदत दिली आहे. प्रत्यक्षात अर्ज दाखल करताना पार्ट एक भरल्यानंतर पार्ट दोन दिसत नसल्यामुळे विद्यार्थी व पालकांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. पार्ट दोन दिसत नसल्यामुळे दहा महाविद्यालयांची नावे निवडता येत नाही. शिवाय, ऑनलाइन पेमेंटदेखील लवकर होत नसल्याने दोन दोन दिवस त्याची वाट पाहावी लागत आहे. अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थी व पालक हवालदिल झाले आहेत. प्रवेशाचे रजिस्ट्रेशन करताना अशा वारंवार उद्भवणाऱ्या अडचणीमुळे मुदतीत रजिस्ट्रेशन व प्रवेशप्रक्रिया शक्य होईल, असे वाटत नाही. त्यामुळे शासनाने ज्या महाविद्यालयांना विद्यार्थी संख्या परवानगी दिली आहे तेवढीच घेण्याचे बंधनकारक करून ऑफलाइन प्रवेशप्रक्रियेसदेखील परवानगी द्यावी. विद्यार्थी व पालकांची होणारी हेळसांड थांबवावी व प्रवेश निश्चित करावा, अशी मागणी प्रा. मोरे यांनी केली आहे.

# मनमाडला दोन लाखांच्या बकऱ्या चोरीला

## पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह?

**मनमाड : प्रतिनिधी**

मनमाड शहरातील श्रावस्तीनगर भागातील भावेश सोनवणे यांच्या घरासमोर असलेल्या पत्र्याच्या शेडमधून सुमारे दीड ते दोन लाख रुपये किमतीच्या सतरा-अठरा बकऱ्या चोरट्यांनी पळवून नेल्या. चोरट्यांनी प्रारंभी परिसरातील घरांच्या बाहेरून कड्या लावल्या. त्यानंतर मोर्चा गोठ्याकडे वळवला. सर्व बकऱ्या पळवून नेल्या. यापूर्वीही याच भागातील मोकाट जनावरांना चोरट्यांनी लक्ष केले होते. मात्र, तेव्हाही चोरटे पळून जाण्यात यशस्वी झाले होते. आता त्यांनी आपला मोर्चा बकऱ्याकडे वळवला. या घटनेमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे..?

मनमाड शहरातील श्रावस्तीनगर भागात राहणाऱ्या भावेश सोनवणे यांचा घरामसोर पत्र्याचा गोठा आहे. गोठ्यात सुमारे लहान-मोठ्या २० बकऱ्या होत्या. बुधवारी रात्री एक ते दीडदरम्यान पिकअप गाडीमधून काही चोरटे आले. त्यांनी या भागातील सर्व घरांना बाहेरून कड्या लावून सरळ पिकअप गाडी गोठ्याजवळ लावली व राजरोसपणे सर्व बकऱ्या गाडीत घालून पळवून नेल्या. बकऱ्यांचा आवाज आल्याने सोनवणे कुटुंब जागे झाले. त्यांनी बाहेर येण्यासाठी प्रयत्न केला. मात्र, बाहेरून दरवाजा लॉक असल्याने त्यांना येता आले नाही. त्यांनी घरांतूनच आरडाओरडा केला, मात्र इतरांनाही बाहेर येता आले नाही. यानंतर भावेश सोनवणे यांनी मागील दरवाजा खोलून बाहेर आले व पिकअप गाडीचा पाठलाग केला. मात्र, चोरटे पळून गेले. परिसरात चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून, पोलिसांनी रात्रीची गस्त बंद केल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.

> श्रावस्तीनगर भागातील मोकाट जनावरे चोरून नेण्यात आली. याशिवाय, एक-दोन घरफोड्यादेखील करण्याचा प्रयत्न झाला होता. पोलिसांनी या भागात गस्त वाढवावी, याबाबत निवेदन दिले होते. मात्र, दखल घेतली नाही. आता पुन्हा चोऱ्या सुरू झाल्या. यामुळे श्रावस्तीनगर, शांतीनगर भागात गस्त वाढवावी.
>
> **- अनिता इंगळे, जिल्हा सरचिटणीस, भाजपा**



# त्र्यंबकेश्वरला सुट्टीमुळे भाविकांत लक्षणीय वाढ

## वाहतूक कोंडी नित्याची; वाहनांच्या संख्येतील वाढ ठरतेय तापदायक

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

उन्हाळी सुट्टीचा अंतिम आठवडा सुरू झाला आहे. सुट्टीचा पर्वकाल साधण्यासाठी दर्शनार्थी भाविकांच्या सोबतीनेच नारायण नागबली पूजा विधीसाठी येणारे भाविकदेखील लक्षणीय संख्येने येथे दाखल होत आहेत. त्यामुळे शहरात ठिकठिकाणी वाहतूक कोंडी तापदायक ठरत असल्याचे चित्र आहे.


गत वर्षीच्या तुलनेत यंदा भाविकांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे नजरेस येत आहे. भाविकांना निवास सुविधा, भोजनादी खाद्यपदार्थ, खासगी प्रवासी सेवा यांसारख्या व्यवसायांना बरकत लाभली आहे. वाढलेल्या गर्दीचा फायदा नगर परिषद प्रशासनाला वाहन प्रवेश फी, वाहनतळ फी तसेच नो पार्किंग दंड, चप्पल स्टँड या माध्यमातून दांडगे उत्पन्न मिळत आहे. भाविकांच्या माध्यमातून नगर परिषद प्रशासनाला ठोस उत्पन्न मिळत आहे. देवस्थान ट्रस्टला लाडू प्रसाद आणि २०० रुपये दर्शनाचे तिकीट यांचे उत्पन्न मिळत आहे.

प्रवेश बंद मार्गाने जाणारी वाहन, नो पार्किंगमध्ये वाहन उभे करणे अथवा भररस्त्यात वाहनाचा ठिय्या, यामुळे समस्या निर्माण होत आहेत. शहराच्या प्रवेशद्वारी संत गजानन महाराज संस्थानच्या समोर होत असलेली वाहतूक कोंडी आता नेहमीचीच झाली आहे. येथे वाहन प्रवेश फी घेण्यासाठी वाहन उभे राहते. त्यापाठोपाठ वाहनांच्या रांगा लागतात. काही भाविक पैसे देण्याबाबत हुज्जत घालतात, त्यात शहराबाहेर पडणारी वाहने समोरून येतात. याचा एकत्रित परिणाम म्हणजे या त्रिफुलीवर वाहतूक कोंडी होते. शहरात पार्किंगच्या जागा मर्यादित आहेत. नव्याने बांधकाम करताना त्यामध्ये पार्किंग आवश्यक असताना त्याचे सर्रास उल्लंघन झालेले दिसून येते. प्रत्येक चौकात रहदारीला अडथळा निर्माण झाल्याने दिवसभरात अनेक वेळा कोंडी निर्माण होते. सकाळी दारात येणारी घंटागाडी पोहचत नाही. साहजिकच सर्वत्र अस्वच्छता निर्माण झाली आहे. मेन रोडला तर सोमवारच्या त्र्यंबकेश्वराच्या पालखीलाद-`खील रस्ता राहत नसल्याची दिसते. याबाबत संबंधित यंत्रणांनी केलेला कानाडोळा वादास कारण ठरत आहे.

# सत्यप्रत बियाणे आता 'साथी'वर नोंदणीनंतरच मिळणार!

## कृषी विभाग : शेतकऱ्यांची फसवणूक, गैरप्रकारांना चाप बसणार

**निफाड : विशेष प्रतिनिधी**



शेतकऱ्यांची अनेकदा बियाणे खरेदीतून फसवणूक होत असते. काही बियाणे उगवून न आल्यास शेतकऱ्यांच्या तक्रारी येतात. त्यामुळे त्यांची फसवणूक होऊन खूप आर्थिक नुकसान होते. बियाणे विक्रीतील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कृषी विभागाकडून देण्यात येणारे सत्यप्रत बियाणे आता साथी पोर्टलवर नोंदणी करूनच दिले जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक आणि गैरप्रकारांना चाप बसणार आहे.

निफाड तालुक्यात ३६ हजार ४०० हेक्टर क्षेत्र लागवडयोग्य आहे. शेतकऱ्यांनी बियाणे खरेदी करताना त्यांची फसवणूक झाल्याच्या अनेक तक्रारी यापूर्वी कृषी विभागाकडे दाखल झाल्या आहेत. यावर नियंत्रण मिळविण्यासाठी कृषी विभागाकडून अनेक उपाययोजना आखल्या जात आहेत. त्याद्वारे नियंत्रण आणण्यास यशही आले. मात्र, काही ठिकाणी बियाणे बोगस असल्याच्या तक्रारी येऊच नये, यासाठी कृषी विभागाने प्रणाली कार्यान्वित केली आहे. सर्व प्रकारचे बियाणे साथी पोर्टलवरूनच विक्री करण्याचे बंधन कृषी विभागाने सर्व कंपन्यांना घातले आहे. त्याद्वारे सत्यप्रत असलेलेच बियाणे विक्री करता येईल. त्यामुळे शेतकऱ्यांची फसवणूक कमी होण्यास मदत होणार आहे.

### बियाणे कंपन्यांसाठी बंधन

कृषी विभागाने बियाण्यांसाठी काही बंधने घातली आहेत. त्यासाठी काही गुणवत्ता निकष लागू केले आहेत. त्या निकषांची पूर्तता केली असावी. बियाण्यांची उगवण क्षमता, टक्केवारी, शुद्धता ही कृषी विभागाने निश्चित केलेल्या मानांकनानुसार असणे आवश्यक आहे. बियाण्यांसाठी आवश्यक माहितीचे लेबलिंग करणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांना देण्यात येणारे सत्यप्रत बियाणे पोर्टलवर नोंदणी करूनच दिले जाणार आहे. कंपनीत तयार झालेल्या बियाण्यापासून ते शेतकऱ्यांपर्यंत पोहोचण्यापर्यंतच्या प्रक्रियेवर कृषी विभागाचे नियंत्रण असेल. त्यासाठीची सिस्टिम कृषी विभागाने तयार केली आहे. त्यामुळे अनधिकृत, बोगस आणि मुदत संपलेल्या बियाण्यांची विक्री करणे शक्य होणार नाही.

> शेतकऱ्यांना देण्यात येणारे सत्यप्रत बियाणे साथी पोर्टलवरून नोंदणी करून दिले जाणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची बियाणे खरेदी करताना फसवणूक होणार नाही. याबाबत शंका असल्यास शेतकऱ्यांनी कृषी विभागाकडे संपर्क साधावा.
>
> **-सुधाकर पवार, कृषी अधिकारी, निफाड**

## संक्षिप्त

### आ. आशुतोष काळेंची राज्याच्या युवा धोरण समितीच्या सदस्यपदी निवड



**वावी :** राज्याचे सुधारित युवा धोरण ठरविण्यासाठी क्रीडा व युवक कल्याण मंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेल्या राज्याच्या युवा धोरण समितीच्या सदस्यपदी आ. आशुतोष काळे यांची निवड करण्यात आली. महायुती शासनाने बुधवारी राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. दत्तात्रय मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली युवा धोरण समिती स्थापन केली आहे. यामध्ये उच्च शिक्षित, युवा नेतृत्व व राज्यात आपल्या विकास कामांच्या कामगिरीच्या जोरावर सर्वाधिक मताधिक्यात क्रमांक पाचने निवडून आलेल्या आ. आशुतोष काळे यांना स्थान देण्यात आले आहे. काही महिन्यांपूर्वीच आ. आशुतोष काळे यांची महाराष्ट्र विधिमंडळाच्या मराठी भाषा समितीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. त्यानंतर पुन्हा एकदा राज्याच्या अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या युवा धोरण समितीच्या सदस्यपदी निवड करण्यात आली आहे.

### दस्त नोंदणी शुल्क माफ करून महायुतीचा शेतकऱ्यांना दिलासा : आ. आशुतोष काळे

**वावी :** महायुती शासनाने राज्यातील शेतकऱ्यांसाठी शेतजमिनीच्या वाटणीपत्राच्या दस्तास लागणारी नोंदणी फी माफ करण्याचा घेतलेला निर्णय संपूर्ण राज्यातील शेतकऱ्यांसाठी आनंदाचा आणि दिलासादायक आहे. राज्य मंत्रिमंडळाच्या पार पडलेल्या बैठकीत याबाबतचा निर्णय जाहीर करण्यात आला असून शेतकऱ्यांना फायदा व्हावा, यासाठी सरकारने दस्त नोंदणी शुल्क माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. सर्वसामान्य जनतेच्या हिताचा विचार करणाऱ्या महायुती शासनाने शेतकऱ्यांसाठी देखील दस्त नोंदणी शुल्क माफ करण्याचा अत्यंत महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन शेतकऱ्यांना मोठा दिलासा दिला असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले.



### पंचाळे विद्यालयात सावरकरांना अभिवादन

**सिन्नर :** तालुक्यातील पंचाळे येथील सिन्नरभूषण सूर्यभानजी गडाख विद्यानिकेतन विद्यालयात हिंदुत्वाचे जाज्वल्य प्रतीक, महान क्रांतिकारक, प्रखर राष्ट्रवादी, प्रभावी वक्ते, लेखक, कवी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना जयंती दिनी अभिवादन करण्यात आले. माध्यमिक लोक शिक्षण मंडळाचे सेक्रेटरी राजेश गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्याध्यापक विलास पवार, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गडाख, प्राथमिक मुख्याध्यापक नवनाथ थोरात, उच्च माध्यमिक विभागप्रमुख प्रवीण शेलार, प्रा. काजल वायकर, प्रा. वृषाली चासकर, ऋषिकेश कोकाटे, अवि कोकाटे, अजय डुंबरे, संपत गडाख आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### ठाणगावला स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी

**ठाणगाव :** येथील जनसेवा सेवाभावी संस्थेतर्फे स्वातंत्र्यवीर सावरकर जयंतीनिमित्त कार्यक्रम झाला. अटल फाउंडेशन जिल्हाध्यक्ष रामदास भोर, माजी सरपंच उत्तम शिंदे, ग्रामपंचायत सदस्य मोहन आव्हाड, हभप मच्छिंद्र महाराज शिंदे, सामाजिक कार्यकर्ते के. एल. शिंदे, नाना शिंदे यांच्या हस्ते प्रतिमापूजन करण्यात आले. स्वातंत्र्यासाठी शस्त्र हातात धरण्याशिवाय पर्याय नाही. हे ठासून सांगणारे स्वातंत्र्यवीर सावरकर नाशिकसह देशाचे भूषण आहे. वीर सावरकर भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील आघाडीचे सेनानी आणि प्रखर राष्ट्रवादी नेते होते. जन्मठेपेची शिक्षा हसतमुखाने स्वीकारणारे सावरकर स्वातंत्र्य योद्ध्यांची प्रेरणा होते. मातृभूमीला आई मानून तिच्या स्वातंत्र्याचा त्यांनी ध्यास घेतला होता. परदेशात गेल्यावर आईशी झालेली ताटातूट त्यांना व्याकुळ करत असे. 'ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला' असे ते सागराला विनवित असत. प्रखर हिंदुत्व जाणणारे आणि मानणारे सावरकर अशी त्यांची ओळख असली, तरी हिंदुत्वामागील त्यांचा विचार व्यापक होता. त्यांना जातपातरहित हिंदुत्व अपेक्षित होते. म्हणूनच त्यांनी रत्नागिरी येथील 'पतितपावन मंदिरात' सर्व जातीबांधवांना प्रवेश मिळवून दिला. सहभोजन केले आणि माणसाने माणसांना माणुसकीने वागवले पाहिजे, ही शिकवण घालून दिली. आजही ते आणि त्यांचे विचार तरुणांसाठी प्रेरणास्थान असल्याचे भोर म्हणाले. यावेळी अण्णासाहेब शिंदे, मोहन शिंदे, जनसेवेचे सदस्य सचिन रायजादे, दिलीप रेवगडे, दत्तू शिंदे, नारायण भागवत, भास्कर वालझाडे, भानुदास शिंदे, अरुण शिंदे, अशोक शिंदे, नंदू गुंड, पुंजा शिरसाट यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

### पाटोळे शिवारात एसटी बसचालकाला मारहाण

**सिन्नर :** रस्त्यात उभी असलेली गाडी बाजूला घ्या, असे सांगितल्याचा राग येऊन एसटी बसचालकाला मारहाण केल्याची घटना मंगळवारी (दि. २८) सकाळी पावणेबाराच्या सुमारास घडली. याप्रकरणी योगेश शंकर नवाळे (३०, रा. चिंचोली, ता. सिन्नर, जि.नाशिक) याच्याविरोधात सिन्नर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. ज्ञानेश्वर सूर्यभान शिंदे (४६, रा. सोनारी, ता. सिन्नर, जि. नाशिक) हे राज्य परिवहन महामंडळात बसचालक म्हणून सेवेत आहेत. मंगळवारी (दि.२८) सकाळी पावणेबाराच्या सुमारास राज्य परिवहन महामंडळाची रामनगर ते सिन्नर बस (एमएच-१४, बीटी-२३१९) रामनगरहून सिन्नरकडे येत असताना पाटोळे शिवारात समृद्धी महामार्गाच्या पुलाजवळ नवाळे यांची रस्त्यात उभी असलेली गाडी बाजूला घ्या, असे सांगितल्याने नवाळे याने बसचालक ज्ञानेश्वर शिंदे यांना शिवीगाळ केली. हाताच्या चापटीने मारहाण करून सरकारी कामात अडथळा आणला. याप्रकरणी शिंदे यांच्या फिर्यादीवरून सिन्नर पोलिस ठाण्यात योगेश नवाळे याच्याविरोधात सरकारी नोकरावर हल्ला व सरकारी कामात अडथळा आणला म्हणून गुन्हा दाखल करण्यात आला. तपास हवालदार वराडे तपास करीत आहेत.

### सिन्नरला वाहनाच्या धडकेत पादचारी ठार

**सिन्नर :** सिन्नर-बारागावपिंप्री रस्त्यावर कुटे मळ्याजवळ अज्ञात वाहनाच्या धडकेत पादचारी ठार झाला. ही घटना गुरुवारी (दि.२२) रात्री ९.३० च्या सुमारास घडली. राधेश्याम शंकरराव मांजरेवार (वय३२, रा. लिंगा, ता. वरूड, जि.अमरावती, हल्ली रा.गणेशनगर, सिन्नर) असे मृताचे नाव आहे. राधेश्याम हे बारागावपिंप्री रस्त्याने पायी येत असताना कुटे मळ्याजवळ बारागावपिंप्रीकडून सिन्नरकडे भरधाव अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. या अपघातात राधेश्याम यांना डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यांचा मृत्यू झाला. याप्रकरणी सेवकराम शंकरराव मांजरेवार (रा. लिंगा, ता. वरुड, जि.अमरावती, हल्ली रा.गणेशनगर, सिन्नर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सिन्नर पोलिस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरोधात अपघाताचा गुन्हा दाखल करण्यात आला. हवालदार शिंदे तपास करीत आहेत.

# ऐतिहासिक रंगमहालाच्या संवर्धनावर भर

## मान्यवरांचे मत; चांदवडला अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव उत्साहात

**चांदवड : वार्ताहर**

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सवानिमित्त जागर होळकरशाहीचा आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सन्मान सोहळा गुरुवारी (दि. २९) चांदवडच्या ऐतिहासिक रंगमहाल (होळकरवाडा) येथे उत्साहात आणि दिमाखात साजरा झाला. या सोहळ्याला होळकर राजघराण्यातील प्रमुख व्यक्ती, राज्याचे मंत्री आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती लाभली. ज्यामुळे चांदवडनगरीत अहिल्यादेवींच्या महान कार्याचे स्मरण पुन्हा एकदा ताजे झाले. या सोहळ्यासाठी चांदवड परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**

**मंगलमय प्रारंभ, मिरवणूक**

कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक म्हणून आमदार डॉ. राहुल आहेर, चांदवड नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव समितीचे पदाधिकारी उपस्थित होते. प्रारंभी श्री रेणुकादेवी मंदिरात महाआरती आणि जलकुंभ भूमिपूजन करून झाली. त्यानंतर हनुमान मंदिर, बाजारपेठ येथून मंगल कलश मिरवणूक काढण्यात आली. ही मिरवणूक चांदवड बाजारतळापासून सोमवार पेठ, शिवाजी चौक, श्रीराम रोडमार्गे अहिल्यादेवी होळकर रंगमहाल वाड्यापर्यंत ढोल-ताशांच्या गजरात वाजत-गाजत पोहोचली. मिरवणुकीत मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते. ज्यामुळे चांदवडच्या रस्त्यावर चैतन्याचे वातावरण निर्माण झाले. राजगादी पूजन, ऐतिहासिक बारव पाहणी आणि ऐतिहासिक मुद्रांक-शस्त्र प्रदर्शनाचे आयोजन केले होते.

आमदार डॉ. आहेर यांनी प्रभावी प्रास्ताविकातून कार्यक्रमाची रूपरेषा स्पष्ट केली. विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्कारांचे वितरणही झाले. ज्यामुळे कर्तृत्ववान व्यक्तींचा गौरव झाला. चांदवडचे माजी नगराध्यक्ष भूषण कासलीवाल यांनी आभार मानून सोहळ्याचा समारोप केला.



**मान्यवरांचे विचार, घोषणा**

जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी अध्यक्षीय मनोगतात आजचा दिवस चांदवडच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी लिहिला जाईल, असे प्रतिपादन केले. त्यांनी गेल्या पंधरा दिवसांपासून पडत असलेल्या बेमोसमी पावसामुळे झालेल्या नुकसानीची दखल घेतली. भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांना केवळ एक नाव नसून, ते एक युग असल्याचे नमूद केले. ज्या काळात स्त्रिया चूल आणि मूल यापुरत्या मर्यादित होत्या, त्या काळात अहिल्यादेवींनी राज्याचा कारभार एकहाती सांभाळला, असे त्या म्हणाल्या.

युवराज श्रीमंत यशवंतराव महाराज होळकर यांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचा वारसा जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले की, चांदवडच्या या पवित्र भूमीत अहिल्यादेवींच्या ३०० व्या जयंतीनिमित्त आपण सर्वजण एकत्र येणे हे अभिमानास्पद आहे. त्यांनी लोककल्याणासाठी जे कार्य केले, ते केवळ त्या काळासाठीच नव्हे, तर आजच्या आणि भविष्यातील पिढ्यांसाठीही प्रेरणादायी आहे. शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी चांदवड येथील रंगमहालाचे जतन करण्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून द्यावा, अशी महत्त्वपूर्ण मागणी केली. ''या ऐतिहासिक स्थळाला धार्मिक आणि सांस्कृतिक महत्त्व प्राप्त होऊन ते अधिक लोकांपर्यंत पोहोचेल,'' असे ते म्हणाले. आगामी कुंभमेळ्याच्या आराखड्यात रंगमहालाचा समावेश करण्याची आणि विद्यार्थ्यांच्या सहली रंगमहालात काढण्यात याव्यात, अशी सूचना त्यांनी केली. मंत्री जयकुमार रावल यांनी चांदवड येथील रंगमहालसारख्या ऐतिहासिक वास्तूंचे जतन करण्याची जबाबदारी सर्वांवर असल्याचे सांगितले. ''ही केवळ एक वास्तू नाही, तर तो गौरवशाली इतिहासाचा आणि अहिल्यादेवींच्या महान कार्याचा साक्षीदार आहे,'' असे ते म्हणाले. भव्य सोहळ्याचे यशस्वी आयोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जन्मोत्सव समिती, चांदवड यांनी केले होते. या सोहळ्यामुळे होळकरशाहीच्या इतिहासाचे आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या कार्याचे स्मरण पुन्हा एकदा ताजे झाले. यावेळी चांदवड भाजप तालुकाध्यक्ष मनोज शिंदे, संदीप काळे, देवळा भाजप तालुकाध्यक्ष किशोर आहेर, राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष रघुनाथ आहेर, शिवसेना तालुकाप्रमुख नीलेश ढगे यांच्यासह जनसमुदाय उपस्थित होता.

**सोहळा, मान्यवरांचे मार्गदर्शन**

**कार्यक्रमाचा मुख्य भाग रंगमहाल (होळकरवाडा) येथील व्यासपीठावर सुरू झाला. मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने सोहळ्याचे उद्घाटन झाले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष जलसंपदामंत्री गिरीश महाजन, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे वंशज महाराज श्रीमंत शिवाजीराव होळकर, महाराज श्रीमंत यशवंतराव होळकर (द्वितीय यांचे नातू), युवराज श्रीमंत यशवंतराव होळकर (तृतीय), श्रीमंत सुभेदार मल्हारराव होळकरांचे मामाश्री जहागीरदार भोजराज बारगळ यांचे वंशज श्रीमंत अमरजीतराजे बारगळ जहागीरदार, शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे, पणनमंत्री जयकुमार रावल, आमदार राम शिंदे, आमदार दिलीप बनकर, आमदार नितीन पवार, भाजप नेत्या चित्रा वाघ, जयश्री आहेरराव, भाऊसाहेब चौधरी, जिल्हाध्यक्ष शंकरराव वाघ, सुनील बच्छाव, नीलेश कचवे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.**

# प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्या वापरा

## ओझर नगर परिषदेचे प्लास्टिक बंदीबाबत आवाहन

**ओझर : प्रतिनिधी**

शासन आदेशानुसार ओझर शहरात नगर परिषद प्रशासनाद्वारे २२ मेपासून ५ जूनपर्यंत पर्यावरण जनजागृतीबाबत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअनुषंगाने २८ मे रोजी ओझर नगर परिषदेमार्फत शहरात प्लास्टिक बंदी प्रभावीपणे राबविण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण बैठक झाली. बैठकीत मुख्याधिकारी किरण देशमुख, संबंधित विभागाचे अधिकारी, स्थानिक व्यापारी संघटना, तसेच सामाजिक संस्थांचे, मंगल कार्यालय प्रतिनिधी उपस्थित होते.



बैठकीत एकल वापराच्या प्लास्टिकच्या वापराबाबत चिंता व्यक्त केली. नागरिकांचे आरोग्य व पर्यावरणावर होणाऱ्या नकारात्मक परिणामांची माहिती उपस्थितांना देण्यात आली. शहरात प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी कापडी पिशव्यांचा वापर करण्याचे आवाहन नगर परिषदेद्वारे करण्यात आले.

मुख्याधिकारी देशमुख यांनी सांगितले की, प्लास्टिकमुक्त ओझर शहर ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. नगर परिषद यासाठी कटिबद्ध आहे आणि नागरिकांनीदेखील यामध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. तसेच २९ मे रोजी प्लास्टिक संकलन मोहीम राबविण्यात येऊन प्लास्टिक न वापरण्याबाबत व्यापारी, भाजीपाला विक्रेते, किरणा दुकानदार, दूधविक्रेते, फळविक्रेत्यांना आवाहन केले. तसेच घरोघरी जाऊन नागरिकांकडून त्यांच्याकडे असलेले प्लास्टिक उत्स्फूर्तपणे देण्याबाबत आवाहन केले. नागरिकांनी या आवाहनाला प्रतिसाद देत घरातील प्लास्टिक पिशव्या तसेच वस्तू संकलन पथकाकडे देत या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला. यापुढेही असाच प्रतिसाद नागरिकांनी द्यावा, असे आवाहन करण्यात आले.

# जय बाबाजी भक्त परिवारातर्फे काशी येथे १ जूनपासून जपानुष्ठान

**ओझर : वार्ताहर**

निष्काम कर्मयोगी जगद्गुरू जनार्दन स्वामी मौनगिरीजी महाराज यांच्या संकल्पानुसार उत्तराधिकारी जगद्गुरू स्वामी शांतिगिरीजी महाराज यांनी निर्माण केलेल्या श्रीक्षेत्र काशी येथील आश्रमात १ जूनपासून आठवडाभर जपानुष्ठान सोहळ्याचे आयोजन केले आहे. सोहळ्यात नाशिकसह राज्यातील विविध जिल्ह्यांतील भाविक सहभागी होणार असल्याची माहिती आयोजन समितीने दिली. काशी येथील आश्रमात १ जून ते ८ जूनदरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांसह ओम जगद्गुरू जनशांती धर्म सोहळ्याचे आयोजन केले आहे. या सोहळ्यादरम्यान जपानुष्ठान, महायज्ञ, हस्तलिखित नामजप, अखंड नंदादीप, महाश्रमदान, मातृ-पितृ मिरवणूक आदी कार्यक्रम होणार आहेत. सोहळ्यादरम्यान जगद्गुरू स्वामी शांतिगिरी महाराज यांचे विशेष भागवत मार्गदर्शनही होणार आहे. सोहळ्याच्या सांगतेनंतर १५ जुलै ते २२ जुलैदरम्यान तिरुपती बालाजी येथेही आठवडाभर धर्म सोहळा होणार आहे. त्यात सहभागी होण्यासाठी अधिकृत बुकिंग करावी.

# कोपरगाव-सावळीविहीर रस्त्याच्या कामाला गती द्या



## अन्यथा ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करणार : आ. आशुतोष काळे

**वावी : वार्ताहर**

कोपरगाव शहराच्या जवळून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग ७५२ जी या महामार्गाचे काम रखडले आहे. शिवाय संबंधित ठेकेदार कोणत्याही प्रकारचे नियोजन करता अत्यंत धीम्या गतीने काम करीत आहे. त्यामुळे वाहतुकीला येत असलेला अडथळा व त्यामुळे होणारे अपघात टाळण्यासाठी सुरू असलेले सावळीविहीर फाटा ते कोपरगाव रस्त्याचे काम योग्य नियोजन करून कामाला गती द्या; अन्यथा ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचा इशारा आ. आशुतोष काळे यांनी दिला.

राष्ट्रीय महामार्ग ७५२ जी या महामार्गावरील कोपरगांव सावळीविहीर रस्त्याच्या कामासाठी आ. आशुतोष काळे यांनी १९१ कोटी निधी मंजूर करून आणला आहे. परंतु या महामार्गाचे काम सुरु झाल्यापासून आजतागायत या महामार्गाचे काम संबंधित ठेकेदार अत्यंत संथगतीने करीत असल्यामुळे सदर कामाची मुदत संपली असतानादेखील या महामार्गाचे काम पूर्ण होऊ शकले नाही. तसेच काम करीत असताना नियोजनाचा अभाव असल्यामुळे या महामार्गावर रहदारीला येणाऱ्या अडथळ्यामुळे अपघाताचे प्रमाण देखील वाढलेले असून, नागरिकांना आपले प्राण गमवावे लागलेले आहे. त्यामुळे या रस्त्याने प्रवास करतांना नागरीकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे.

कोपरगाव मतदारसंघात मागील काही दिवसांपासून सातत्याने पडत असलेला पाऊस व या महामार्गावर असलेले तीर्थक्षेत्र, महाविद्यालय, तसेच मोठ्या प्रमाणात विवाह सोहळे होत असल्यामुळे रहदारीचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. संबंधित ठेकेदाराने योग्य नियोजन न करता सर्व्हिस रोड पूर्ण करण्यापूर्वीच उड्डाणपुलाचे काम हाती घेतल्यामुळे रहदारीच्या अडचणी अधिक प्रमाणात वाढल्या असून, रहदारीस वारंवार अडथळे निर्माण होत आहेत. परिणामी वेळोवेळी रहदारी थांबली जाऊन त्याचा फटका अत्यवस्थ रुग्णाला रुग्णालयात घेऊन जाणाऱ्या रुग्णवाहिकांना देखील बसत असून, त्यामुळे वेळप्रसंगी रुग्णांचा जिव जाण्याचा धोका देखील नाकारता येवू शकत नाही. या सर्व बाबी गंभीर असून अपघाताचे प्रमाण वाढून जीवित हानी देखील होत आहे. परंतु याबाबत सबंधित ठेकेदार आणि अधिकारी देखील गंभीर नसून ठेकेदाराची कामाची मुदत संपलेली असतानादेखील अद्याप कामात सुधारणा झालेली नाही. त्यामुळे सुरू असलेले सावळीविहीर फाटा ते कोपरगाव रस्त्याचे काम योग्य नियोजन करून लवकरात लवकर पूर्ण करावे.

# शिधापत्रिकाधारकांना उत्पन्न हमी पत्रासाठी १५ दिवसांचा अल्टिमेटम

## कागदपत्रे जमा न केल्यास शिधापत्रिका होणार बंद

**सिन्नर : प्रतिनिधी**

शिधापत्रिका नियमित सुरू राहण्यासाठी शिधापत्रिकाधारकांनी आपल्या उत्पन्नाचे हमीपत्र आणि तपासणी फॉर्म भरून १५ दिवसांच्या आत आपापल्या स्वस्त धान्य दुकानात जमा करण्याचे आवाहन सिन्नरचे तहसीलदार सुरेंद्र देशमुख, पुरवठा निरीक्षण अधिकारी विवेक जमधडे यांनी केले आहे. मुदतीत उत्पन्न हमीपत्र आणि तपासणी फॉर्म भरून न देणाऱ्या शिधापत्रिका निलंबित करण्यात येणार आहे.

एप्रिल २०२५ पासून सिन्नर तालुक्यात अपात्र शिधापत्रिका शोध मोहीम सुरू आहे. तालुक्यातील अंत्योदय, प्राधान्य कुटुंब, एन.पी.एच., केशरी व शुभ्र शिधापत्रिकाधारकांनी उत्पन्नाचे हमीपत्र व आवश्यक कागदपत्रासह शिधापत्रिका तपासणी फॉर्म शिधापत्रिका ज्या स्वस्त धान्य दुकानास जोडलेली आहे त्या दुकानात भरून देणे अनिवार्य आहे. मात्र असे असूनही अद्याप बऱ्याच शिधापत्रिकाधारकांनी तपासणी फॉर्म भरून स्वस्तधान्य दुकानात जमा केलेला नाही. जवळपास ७५ ते ८० टक्के शिधापत्रिकाधारकांनी हे दस्त जमा केले आहेत. मात्र अद्यापही २० ते २५ टक्के शिधापत्रिकाधारक बाकी आहेत. अपात्र शिधापत्रिका शोध मोहीम हा कालबद्ध कार्यक्रम असल्याने शिधापत्रिकाधारक कागदपत्र जमा करण्यासाठी शेवटची संधी देण्यात येत आहे. त्यानुसार पुढील १५ दिवसांत उत्पन्नाचे हमीपत्र व आवश्यक कागदपत्रांसह शिधापत्रिका तपासणी फॉर्म भरून संबंधित स्वस्त धान्य दुकानात जमा करणे अनिवार्य राहील, अन्यथा सदर शिधापत्रिका निलंबित केली जाईल, असा इशारा तहसील कार्यालयाच्या वतीने देण्यात आला आहे.

**ग्राम महसूल अधिकाऱ्यांना नोटीस बजावण्याचे आदेश**

**पुरवठा विभागाने वारंवार आवाहन करूनही ज्या शिधापत्रिकाधारकांनी उत्पन्नाचे हमीपत्र आणि तपासणी फॉर्म भरून स्वस्त धान्य दुकानात जमा केले नाही, अशा शिधापत्रिकाधारकांना तत्काळ नोटीस बजाविण्याचे आदेश ग्राम महसूल अधिकाऱ्यांना काढण्यात आले आहे. या संदर्भात तहसीलदार सुरेंद्र देशमुख यांनी तालुक्यातील सर्व ग्राम महसूल अधिकाऱ्यांना आदेश पारित केले आहेत.**

# जिल्हा परिषद प्रशासन आणि ग्रामसेवकांचा संघर्ष शिगेला

## दप्तर तपासणीसाठी आलेले अधिकारी रिकाम्या हाती परतले

**सिन्नर : प्रतिनिधी**

**संघटनेच्या निर्णयाशी बांधील राहून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी तपासणीसाठी आलेल्या गटविकास अधिकाऱ्यांना दप्तरच उपलब्ध करून न दिल्याने ग्रामपंचायतीची तपासणी न करताच या अधिकाऱ्यांना रिकाम्या हाती माघारी परतावे लागले. ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरून प्रशासन आणि ग्रामसेवक संघटनेत सुरू असलेला हा संघर्ष शिगेला पोहोचला आहे.**

गेल्या आठवड्यात ग्रामसेवकांच्या झालेल्या बदल्यांवरून ग्रामसेवक संघटना आणि प्रशासन यांच्यात वादाची ठिणगी पडली आहे. प्रशासनाने चुकीच्या पद्धतीने बदली केल्याचा आरोप करत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ही प्रक्रिया अमान्य केली आहे.

विशेष म्हणजे, यात ग्रामसेवक संघटना आक्रमक झाल्याने जिल्हा परिषद प्रशासनानेही नमते घेण्याऐवजी ग्रामपंचायत दप्तर तपासणीची मोहीम हाती घेत ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. प्रत्येक तालुक्यात दोन ग्रामपंचायतींची स्वत:चा तालुका वगळता इतर पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांमार्फत ही तपासणी सुरू केली आहे. त्यानुसार गुरुवारी (दि.२९) सिन्नर तालुक्यातील वडांगळी आणि विंचूरदळवी येथील ग्रामपंचायतीचे दप्तर तपासणीचे नियोजन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये करण्यात आले होते. या दोन्ही ग्रामपंचायतींच्या दप्तर तपासणीसाठी मालेगाव येथील गटविकास अधिकारी सी. सी. साबळे यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनी दोन्ही ग्रामपंचायतींना भेट देऊन ग्रामसेवकांकडे दप्तराची मागणी केली. मात्र दोन्ही ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी ग्रामसेवक संघटनेच्या निर्णयानुसार दप्तर तपासणीसाठी उपलब्ध करून देण्यास नकार दिला.

त्यावर जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे आदेश तुम्ही डावलत असल्याचे या अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले. मात्र, ग्रामसेवक संघटनेचा निर्णय शिरसावंद्य मानून दप्तर तपासणीसाठी देण्यास ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी स्पष्ट शब्दात नकार दिला. त्यामुळे नेमलेल्या गटविकास अधिकाऱ्यांना दप्तर तपासणी विनाच रित्या हाती परतावे लागले. इतर तालुक्यांतही असाच प्रकार घडला आहे.

चुकीच्या पद्धतीने केलेल्या बदल्यांचे विरोधात आवाज उठवल्याने प्रशासन दप्तर तपासणीच्या नावाखाली त्रास देत असल्याचा आरोप ग्रामसेवक संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला आहे.

**शेरा मारून अधिकारी परतले**

**ग्रामसेवक संघटनेच्या निर्णयानुसार ग्रामसेवकांनी दप्तर तपासणीसाठी दप्तरच उपलब्ध करून दिले नाही. त्यामुळे दप्तर तपासणी करता आली नाही. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या आदेशाचा हा अवमान असल्याचा शेरा दप्तर तपासणीसाठी आलेल्या गटविकास अधिकाऱ्यांनी वडांगळी आणि विंचूर दळवी ग्रामपंचायतीच्या शेरे बुकात नोंदवला. त्यामुळे तपासणीसाठी दप्तर उपलब्ध न करून देणाऱ्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर प्रशासनाने कारवाईचा बडगा उगारल्यास हा वाद आणखी टोकाला पोहोचण्याची शक्यता आहे.**